**मिरा भाईंदर महानगरपालिका**

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २०/०१/२००७

आज दि. २०/०१/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दुपारी ०३.०० वाजता सभा सुचना क्र. ११ दि. १०/०१/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ५) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| ६) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ७) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ८) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ९) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| १०) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ११) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| १२) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १३) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १४) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १६) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १७) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| १८) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १९) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| २०) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| २१) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| २२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| २३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| २४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| २५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| २६) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| २७) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| २८) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २९) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| ३०) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| ३१) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| ३२) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| ३३) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| ३४) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| ३५) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| ३६) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३८) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३९) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ४०) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४१) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ४२) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| ४३) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ४४) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| ४५) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| ४६) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४७) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| ४८) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४९) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| ५०) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| ५१) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| ५२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ५३) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ५४) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ५५) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| ५६) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ५७) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ५८) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ५९) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ६०) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ६१) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ६२) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ६३) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ६४) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ६५) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ६६) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ६७) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ६८) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ६९) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ७०) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ७१) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| २) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| ३) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ४) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| ५) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ६) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ७) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ८) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ९) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| १०) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| २) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |

**मा. महापौर :-**

सचिवजी सभेला सुरुवात करावी.

(राष्ट्रीयगीत ''वंदे मातरमने'' सभेला सुरुवात करण्यात आली.)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्याला अशी एक सुचना करावीशी वाटते की, काही चुकीचे असेल तर माफ करावे किंवा कोणाला जास्त माहिती असेल तर मला द्यावी. माझ्या माहितीनुसार 'राष्ट्रगीत' हे जन गण मन आहे आणि ''वंदे मातरम'' हे राष्ट्रीय गीत आहे. तेव्हा बोलताना सचिवांनी राष्ट्रीय गीत असा उल्लेख करावा आणि सभागृहाला अशी सुचना आहे की, आपण ''वंदे मातरम'' राष्ट्रीय गीत बोलत असताना पुल्लक सुमिता द्रभदल गृहशोभिनी असे आहे. इथे नेहमी काहीतरी चुकीचे बोलले जाते. कदाचित सगळ्यांच्या लक्षात येत असेल पण आपण कृपया सगळ्यांनीच, माझी विनंती आहे की, आपण ते शब्द सुधारावेत.

**मा. महापौर :-**

नमस्कार २० जानेवारी, २००७ रोजीची मा. महासभा, महानगरपालिकेच्या सभागृहात उपस्थित असलेले उपमहापौर चंद्रकांत वैतीजी, आयुक्त सुदामराव गायकवाड साहेब, सभागृह नेत हॅरल बोर्जीस साहेब, स्थायी समिती सभापती स्टिवन मेंडोंसा साहेब, विरोधी पक्षनेते परशुराम पाटीलजी, सर्व प्रभाग समितीचे अध्यक्ष, सर्व समित्यांचे सभापती, उपस्थित असलेले सर्व पक्षाचे गटनेते, सर्व सन्मा. नगरसेवक, नगरसेविका, महापालिकेचे सचिव हरेश पाटील, सर्व सन्मा. उपायुक्त, पदाधिकारी, वृत्तपत्राचे प्रतिनिधी, प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलेले सर्व प्रेक्षक बंधु आणि भगिनीनो, आपल्या मिरा भाईंदर शहरात बऱ्याच खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार प्राप्त करुन आपल्या मिरा भाईंदर शहराचे नाव लौकिक वाढविलेला आहे. आज ही आपण भाईंदर येथे नवघर फाटकासमोर राहणारे श्री सुधीर श्रीकांत वंजारी ह्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवर जपान येथे कराटे या स्पर्धेत फोर्थ डिग्री ब्लॅक बेल्ट पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांचा आज आपण सत्कार करणार आहोत. व मिरा भाईंदर शहरातील बऱ्याच विद्यार्थ्यांना ते कराटे विषयक प्रशिक्षण देत आहेत. याचा आपणा सर्वांना अभिमान आहे. आजच्या मा. महासभेत सदर व्यक्तीचा आपण सत्कार आयोजित केलेला आहे. मा. महासभेमध्ये विषयपटलावर असलेल्या विषयातील सर्वांनी खेळीमेळीच्या वातावरणात चर्चा करुन सभा पार पाडावी. अशी सर्वांना विनंती. धन्यवाद.

(नगरसचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

आजच्या मा. महासभेत मा. महापौरांनी घोषीत केल्याप्रमाणे श्री. सुधीर वंजारी ह्यांचा सत्कार आयोजित केलेला आहे. कराटेपट्टु, फोर्थ डिग्री ब्लॅक बेल्ट ते अजून आलेले नाहीत.

**प्रभात पाटील :-**

मला बोलायचे आहे. जेवण होते.

**नगरसचिव :-**

होय.

**प्रभात पाटील :-**

किती सदस्य जेवले हे मला माहिती नाही. परंतु, जे सदस्य येथे उपस्थित होते त्या किती जणांना जेवण मिळाले हा वादाचा मुद्दा येथे उपस्थित होउ शकतो.

**मुक्ता रांजणकर :-**

मॅडम, हा नेहमीचाच प्रकार आहे. ८० नगरसेवकांचे जेवण येते व ८० नगरसेवकांमधील काही सदस्य तर जेवायला घरीच जातात. मग हे जेवण जाते कुठे?

**नगरसचिव :-**

जे उपस्थित असतात........

**मुक्ता रांजणकर :-**

आज तर निम्मे नगरसेवक घरी गेले होते. मग जेवण गेले कुठे?

**सुनिता पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही जेवलो पण फक्त चपाती आणि भाजी. भात नाही, लोणचं नाही, पापड नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

जाने दो छोड दो।

**सुनिता पाटील :-**

छोडनेकी बात नही है। इतना बडा मुद्दा भी नही है।

**प्रभात पाटील :-**

मोठा मुद्दा नाही. परंतु, तुम्ही जर त्यांची सोय करता, त्यांची तजवीज करता मग त्यांना जेवण मिळाले किंवा नाही किंवा कुठे गेले याचा आपण सारांश घेतला पाहिजे. बहुतेक लोक बाहेरुन खाउन आले. सन्मा.

सदस्या श्रीम. सुनिता पाटील यांच्या ताटामध्ये मी बघितले तर एक भाजी आणि दोन चपात्या होत्या. इतके नित्कृष्ट किंवा इतके खायला कोणी इकडे येत नाही. तुम्ही याची दखल घ्या. एवढेच माझे म्हणणे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी जी खंत व्यक्त केली पुढच्या वेळेस आपली ह्या विषयाची खंत दूर होईल. आज जी घटना घडलेली आहे. मा. सचिवांना मी त्या पध्दतीची सुचना देते की, पुढच्या वेळेस असे घडणार नाही. सर्व सदस्यांची जेवणा बाबतची काळजी घेतली जाईल.

**मिलन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. मागच्या वेळेला तुम्ही रुलिंग दिली होती की, सरकारी परिपत्रके तर ह्या वेळेला सुध्दा त्या सरकारी परिपत्रकाचे आलेले नाही. ते का आले नाही? ह्याचा सचिवांनी खुलासा करावा.

**हंसुकुमार पांडे :-**

सचिव साहब, अपनी यह मा. महासभा है। तो यह आठ दिन पहिले वृत्तपत्र मे आना चाहिए। लेकिन अगर आपने यह न्युज पेपर मे दिया है तो कौनसे न्युज पेपरमे दिया है इतका खुलासा करिए।

**नगरसचिव :-**

दो पेपर मे दिया है। जनमुद्रा और सुरजप्रकाश मे दिया है।

**हंसुकुमार पांडे :-**

आपके पास उसकी कॉपी है क्या?

**नगरसचिव :-**

ऑफिस मे कॉपी उपलब्ध है।

**मिलन पाटील :-**

हे लोकल आहे ना.

**नगरसचिव :-**

होय, स्थानिक वृत्तपत्र आहे.

**मिलन पाटील :-**

लोक वृत्तपत्रामध्ये, कुठल्या तरी मोठ्या वृत्तपत्रामध्ये द्यायला पाहिजे. सकाळ, लोकमत.

**नगरसचिव :-**

स्थानिक पेपरला द्यावे अशी तरतुद आहे. स्थानिक पेपर रजिस्ट्रेशन आहे त्यामध्ये देतो. प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. मला असा खुलासा पाहिजे होता की ..........

**मिलन पाटील :-**

मॅडम, मी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा द्या ना. ह्यावेळेला ही सरकारी परिपत्रामध्ये का आले नाही आणि आम्हाला का दिली नाही.

**नगरसचिव :-**

सरकारी परिपत्रके आली व ती सचिव कार्यालयात उपलब्ध केली तरच ती अजेंड्यावर घेतली जातात. सचिव कार्यालयात प्रशासनाकडून द्यावी लागतात त्यानंतरच ती अजेंड्यावर घेतली जातात.

**मिलन पाटील :-**

ते तुमच्या कामाचे आम्ही कोणाला सांगायचे, ह्याचे, त्याचे?

**नगरसचिव :-**

सचिव कार्यालयात द्यावी लागतात.

**मिलन पाटील :-**

पण ते कोण देईल.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून द्यावी लागतात.

**मिलन पाटील :-**

तुम्ही त्यांच्याकडून ते मागवा. तुम्ही आम्हाला गेल्यावेळेला आश्वासन दिले होते की, येईल असे. ते आमचे थोडेच काम आहे. मा. महापौरांनी याबाबत आदेश दिलेले आहेत. संबंधित खात्याला मा. महापौरांनी आदेश द्यायचे असतात. आम्हाला त्याच्याशी काय घेणं देणं आहे? आम्ही कशाला बघु ते प्रशासन देईल की, कोण देईल.

**नगरसचिव :-**

प्रशासनाने मागायची नाहीत. सचिवांनी मागायची नाही, सचिवांकडे जमा करायची अशी तरतुद आहे.

**मिलन पाटील :-**

मग गेल्यावेळेस आपण का बोलला नाहीत. मा. महापौरांनी रुलिंग दिले होते ना. म्हणजे मा. महापौरांच्या रुलिंगचे काही अर्थच नाही का?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांनी प्रशासनाला रुलिंग दिले होते.

**मिलन पाटील :-**

ते प्रशासनानेच बघायचे आणि पुढच्या वेळेला येईल का नाही ते तुम्ही सांगा. मॅडम, आत्ताच तुम्ही करुन घ्या व कोणाला रुलिंग द्यायची असेल तर ती द्या. पुढच्या वेळेला परिपत्रकाप्रमाणे हे येणार की नाही? कायद्याने यायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

पुढच्या वेळेस विषयपत्रिकेवरील येईल.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, शाळेमध्ये खडूने नोटिस बोर्ड लावायचा आणि तो पुसायचा म्हणजे रुलिंग आज दिली व पुन्हा उद्या रुलिंग द्यायचे अशी पध्दत आहे का? रुलिंग म्हणजे काय? सभागृहामध्ये पिठासीन अधिकारी बसलेले असतात, तर रुलिंगचा अर्थ काय? त्याची कार्यवाही झाली पाहिजे. याबाबत आपण विचारणा केली पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण यांना प्रश्न विचारा ना.

**मोहन पाटील :-**

असा विषय होउ शकत नाही. आपण अनेक रुलिंग सभागृहामध्ये दिलेल्या आहेत.

**परशुराम पाटील :-**

याच्यामध्ये सचिवांना काही दोष नाही. प्रशासनाकडे आपण याचा जाबजवाब विचारायला पाहिजे. मा. महापौर साहेब, ह्याचा गंभीर विचार करायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण गेल्याच मिटींगमध्ये, आता रुलिंगचा प्रश्न आला म्हणून मी विचारते बरेच रुलिंग झाले. मागच्यावेळेला तो एक रस्ता उखडून काढावा किंवा खर्च वसुल करावा म्हणून एक रुलिंग दिले होते. एक महिन्यामध्ये त्याचे काय झाले? इंद्रलोकमधला एक रस्ता त्याचे पैसे वसुल करावा असे आपण प्रशासनाला रुलिंग दिले होते.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयाचा प्रशासनाने ह्या विषयावरती खुलासा करावा.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आमच्या विभागातील एक प्रश्न आहे. जवळ जवळ आमच्याकडे विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून सी.ई.झेड. नावाचा, S.E.Z. नावाचा प्रस्ताव गर्व्हमेंटकडून आलेला आहे आणि तशा तऱ्हेचे परिपत्रक किंवा........

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये एक विषयावर चर्चा होत असताना आपण एका गोष्टीचे प्रशासनाला खुलासा करण्याचा निर्देश दिला तर कृपया तो प्रश्न आधी मार्गी लावा. त्याच्यानंतर इतर विषयावर आपण भाष्य करा. मी सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी जो विषय याठिकाणी सभागृहात उपस्थित केलेला आहे. त्याबाबतीमध्ये मा. महापौरांनी सभागृहाला प्रशासनाला निर्देश दिलेले आहेत त्याबाबतीमध्ये खुलासा करण्याकरिता.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, या नंतरच्या प्रश्नानंतर मी माझा प्रश्न उपस्थित करतो. तो प्रश्न तुम्ही घ्या. मला आता तशी परवानगी द्या.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी कधीपासून उभा आहे. जसजसे प्रश्नांची उत्तरे जातील तसतसा माझाही प्रश्न घ्यायचा आहे. मी प्रशासनाला एक पत्र दिलेले आहे. अधिकाऱ्यांनी त्या काही राग मानु नये. माझा विषय आहे की, मा. सभेच्या वेळेस सभागृहात स्टेजवर, व्यासपिठावर अधिकाऱ्यांना बसण्यास मज्जाव करणे बाबतचा विषय होता. तर नक्की कोण कोण बसू शकतो. ते जाणून घेण्यासाठी मी पत्र दिलेले आहे त्याचे काय झाले? आज सर्व अधिकारी व्यासपिठावर बसलेले आहेत. त्याबाबत काय झाले त्याचे मला उत्तर पाहिजे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदया, फ्रंट सिटपर कौन कौन बैठ सकते है। जहा जहा हम लोगोने देखा है वहा सिर्फ तीनही चेअर रहती है। उसके पिछे कोई नही होता है। ठिक है, मदत करने के लिए लोग सक्षम अधिकारी की, अपनी मदत चाहिए इसलिए उसके पिछे लोगोंको बिठाए लेकिन फ्रंट सिटपर भी कौन कौन

बैठते है उनकी सेक्रेटरी महोदया पुरी तरह जानकारी दिजीए और अगर ऐसा ही करना है तो पुरी तरह से कायदासे बिठाइए। आप बुक मे देखिए क्या है? फ्रंट सिट पर और कौन कौन बैठ सकते है। और अगर पिछे नही बैठ सकते है तो फ्रंट सिट को भी सही करिए। यह एक तरह बहुतसे कायदे कानून कन्व्हेन्शन पर चलते है। चलो रितीरिवाज है। अपने यहा चल रहा है तो चल रहा है। अगर ऐसा ऑब्जेक्शन है तो आप फ्रंट सिट की विवेचना किरिए। सेक्रेटरी महोदय जानकारी दिजीए। आपकी बुक मे क्या क्या लिख है। कौन कौन फ्रंट सिटपर बैठ सकता है।

**दिपक खांबित :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलतो की, मागच्यावेळी जे रुलिंग दिले होते की, डी.पी. रस्त्याचे पैसे वसुल करण्याबाबत. तर सदरचे रस्ते हे मा. स्थायी समितीची प्रशासकीय आर्थिक मंजुरी घेउन निविदा काढल्या होत्या आणि कुठलेही डी.पी. रस्ते हे महानगरपालिकेमार्फतच करण्यात येते आणि जी काही कामे झाली, रस्त्याचे काम झाले त्याला आपण स्थायी समितीची प्रशासकीय निविदा मंजुरी घेउनच त्याप्रमाणे आपण ते काम दिलेले आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महापौर महोदया, प्रश्न असा नाही. काम कायदेशीर केलेले आहे. कायद्यात बसून केलेल आहे. परंतु, आपण रुलिंग दिले होते त्या रुलिंगचे काय झाले? म्हणून मी बोललो की, आपण चॉकने बोर्डावर लिहले व पुन्हा बोर्ड पुसला असे होता कामा नये. पिठासीन अधिकारी म्हणून आपण रुलिंग होती त्या रुलिंगचे काय झाले? हे उत्तर आम्हाला प्रशासनाने त्यावेळी दिले होते.

**मा. महापौर :-**

नाही दिले होते.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला कुठले उत्तर दिले.

**हॅरल बोर्जीस :-**

मॅडम, ह्या विषयावर मा. प्रफुल्ल पाटील साहेबांनी हा मुद्दा उपस्थित केला त्याच्यानंतर सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी त्या गोष्टीवर आवाज उठवला. आपण ज्यावेळेला प्रशासनाला आदेश दिले त्यावेळेला सभागृहाच्या चर्चेमध्ये हा विषय कुठे ही आलेला नव्हता की, संबंधित रस्त्याच्या कामाच्या विषयी जी काय कार्यवाही झालेली आहे ती नियमाप्रमाणे झालेली आहे आज जे सभागृहामध्ये वक्तव्य होत आहे ते वक्तव्य त्यावेळेला सभागृहामध्ये झालेले नव्हते.

**प्रकाश दुबोल :-**

मा. महापौर मॅडम, सभागृह नेते त्यावेळेला मी बोललो नव्हतो, हे सभागृह नेते खोटी माहिती देत आहेत.

**शशिकांत भोईर :-**

तेव्हा हाउस ऑफ डिसहाउसचा, बेघरांना घर देण्याचा विषय होता. त्या संदर्भात सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी तो विषय घेतला होता. त्यावेळेस प्रत्येक, कोणताही बिल्डर त्याने त्याचे रस्ते बनवून द्यायचे आहे. गटारे त्यांनी बनवून द्यायची आहेत. पण आपण सर्वश्री नगरपालिका बनवून देते. हे चुकीचे आहे असे त्यांनी वक्तव्य केले होते. म्हणून सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील यांनी त्याच्यावर आक्षेप घेतला की ते रस्ते जो खर्च झाला रस्ते, पाईप लाईन वगैरे तो त्यांच्याकडून वसुल करुन घ्यावा. मा. महापौर मॅडम यांनी त्याच्यावर रुलिंग दिले की, ताबडतोब त्याच्यावर अंमलबजावणी व्हावी. त्याचे काय झाले असे आमचे सन्मा. सदस्या प्रभात पाटील मॅडम विचारत आहेत.

**प्रभात पाटील :-**

प्रशासन एकदम बरोबर आहे. कारण त्यांनी ते कायद्याच्या चौकटीत बसून ते रस्ते केले. डी.पी. रोड करणे हा आपल्या प्रशासनाचा भाग आहे. हे आपल्या महापालिकेचे काम आहे आणि ते म्हणतात की, आम्ही आर्थिक, प्रशासकीय मंजुरी घेतली आहे आणि त्याला टेंडरसुध्दा मी मंजुर करुन घेतले तर त्यांनी ते सगळं काही कायद्यात बसून केलेले आहे. राहिला मुद्दा असा की, आपल्या रुलिंगचे काय? आपण रुलिंग मागे घेणार किंवा आमच्या सभागृहासमोर जर त्याला मान्यता दिली किंवा स्थायी समितीने मान्यता दिली तर ते एकदम बरोबर आहे. तर तुम्ही करणार कुठे काय? तुम्हाला तुमचे रुलिंग मागे घ्यावे लागेल किंवा काहीतरी चुकीचे होत आहे हे तरी आपल्याला कबुल करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये डी.सी. रुल्समध्ये नक्की काय लिहले आहे ते बघा. इमारतींच्या परवानगी देताना त्या इमारतीच्या आजुबाजुचे रस्ते, तिथले गटार हे त्या विकासकाने केले पाहिजे हा नियम आहे. ती निविदा कोणी काढली? ते नियमात आहे की नाही हा विषय नाही. इमारतीचा विकास करताना विकासक मागणीप्रमाणे जेव्हा प्लान पास करतो. तेव्हा त्या विकासकाने ह्या गोष्टी केल्या पाहिजेत असा नियम आहे आणि विकासकाने त्या गोष्टी केलेल्या नाहीत. आम्ही एवढा प्रचंड खर्च का करावा? जनतेच्या पैशांचा हा दुरुपयोग आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

याबाबत वारंवार मी श्री. दिपक खांबित ह्यांना बोललो आहे.

**जयंत पाटील :-**

आम्ही कोणत्या विकासकाची बाजु घेतो ह्याच्यातून हा अर्थ निघतो.

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांनी जे सांगितले की, प्लॅन सॅन्शन करताना विकासकाच्यावर ज्या अटी टाकल्या जातात की, त्याने रस्ते करावे, गटारे करावेत पण ती कोणती? ती त्यांच्या स्कीममधली किंवा त्यांच्या इमारतीच्या सभोवतालच्या असतील तर. येथे जी चर्चा चालली आहे ती डी.पी. रोडबद्दल तर मी आयुक्त साहेबांना विचारेन की, डी.पी. रोड हे कॉर्पोरेशननेच करायला पाहिजे. ते महापालिकेचे काम आहे किंवा ह्याच्यापेक्षा दुसऱ्या कोणाचे काम आहे ह्याचा आपण खुलासा केला तर बरे होईल.

**मा. आयुक्त :-**

विकास आरखड्यातील रस्ते जे विकसित करायचे आहेत ते महापालिकेनेच विकसित करायचे आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

महापालिकेने विकसित केले पाहिजे ह्या तुमच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे. पण दुसरी गोष्ट मी त्या पलिकडे जावून सांगतो. जिथे लोक रस्त्यापासून वंचित आहेत. लोकांना रस्ते नाहीत. बिल्डींग बांधलेली आहे त्याची सोय करण्याऐवजी इतर ठिकाणी रस्ते केले जाते. त्याबाबत कोण बोलत नाही. तिथे फक्त शेत आहे आणि आपण फक्त शेतासाठी रस्ता करतो का? पावसाळ्यात शेतातून मासे येणार त्यासाठी आपण रस्ते करतो का? आमचे म्हणणे असे आहे की, डी.पी. चे रस्ते महानगरपालिकेनेच केले पाहिजे. पण जिथे लोकवस्ती आहे तिथे पहिल्यांदा प्राधान्य दिले पाहिजे. अन्यथा कुठेही प्राधान्य देवू नये.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम यांना मी विनंती करतो की, ज्यादिवशी या सभागृहात ..........

**तुळशीदास म्हात्रे :-**

तसेच डी.पी. च्या रस्त्यावर एका माणसाने कम्पाउन्ड घालायला घेतलेले आहे. त्याला आपण परमिशन दिलेली आहे का? तर नाही. ते बंद करायला पाहिजे का, नाही. मघाशी तुम्ही संबंधित खात्याच्या अधिकाऱ्याला बोलावले होते. श्री. अजित पाटील यांना बोललो होतो. की, ते काम बंद करून टाका. डी.पी.च्या रस्त्यात कोणीही भिंत बांधली तर चालेल का? म्हणजे डी.पी. च्या रस्त्याचा अर्थच राहिला नाही? मी प्रामाणिक पणे सांगतो, गोल्डन नेस्टचा रस्ता मी माझ्या जागेमधून दिलेला आहे. तो अद्यापपर्यंत वर्ग केलेला नाही. नगरपालिकेला कधी कामात आक्षेप आणू दिला नाही. माझ्या मालकीची जागा आहे माझ्या नावावर उतारे सर्व आहेत. रजिस्टर आहे. उद्या जर तुम्ही अशा बाबींवर लक्ष देत नसाल तर मी माझा तो रस्ता बंद करून टाकेल. जे.सी.बी. लावून बंद करून टाकेल. तोडून टाकेन. नेहमी नेहमी एकाच विषयावर काय बोंलायचे? डी. पी. रस्ते कोणी बंद करून टाकेल तर कळेल का?

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, आत सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब बोलले की, डी.पी. रस्ते बंद व्हायला नको. गोल्डन नेस्टमध्ये जाणारा एक रस्ता आहे तो दिपक हॉस्पीटलला ज्वॉईंन्ट होतो. गेली तीन - चार वर्षापासून तो बंद आहे. साहेब, आपण जेव्हा स्थायी समितीचे अध्यक्ष होतो तेव्हा आपल्याला कळले नाही का, तिथे डी.पी. सारखा एवढा मोठा रस्ता केला तो रस्ता आपण ओपन करायला पाहिजे होता ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी ऑर्डर देवून......

**नितीन ठाकूर :-**

ऑर्डर काय? साहेब आपण ते ओपन करायला पाहिजे होते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ओपन केला होता.

**नितीन ठाकूर :-**

फक्त बोलू नका आपण कार्यवाही करून दाखवा ना.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मागच्या सभेमध्ये ही ह्या विषयावर बोललो होतो.

**नितीन ठाकूर :-**

कुठे बोलून काय केले? तुम्ही रस्ता ओपन करून दाखवा. तेव्हा तुम्ही स्थयी समितीचे चेअरमन होता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आपण त्या खात्याच्या अधिकाऱ्याला विचारा मी एकदा तोडायला लावले होते.

**नितीन ठाकूर :-**

तुम्ही वर्षभर केले काय?

**तुळशीदास म्हात्रे :-**

आयुक्त साहेब, या विषयावर मी तुमच्या सोबत कीती बोललो? एकदा भिंत काढली परत बांधली आणि दिपक खांबित साहेब बोलतात की, त्याच्यावर स्टे आहे. स्टे घेतलेला आहे असे ह्यांचे म्हणणे आहे. आपण ते बघितले नाही. स्टे चा अर्थ काय, कोणी कुठे ही मेन रस्त्यावर स्टे आणला तर चालेल का?

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आता सन्मा. सदस्य म्हात्रे साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे आणि गेल्या चार दिवसापासून माझ्याकडे हे गाऱ्हाणे येत आहे. ते मी आपणाकडे ही आणणार होतो. पण एखाद्याची जर शेती असेल व एखाद्या माणसाने तिथे समोर बांधकाम केले व तो रस्ता बंद केला तर पाठीमागचा माणूस कुठे जाईल? थोडक्यात अशी गोष्ट आहे की, जिथे डम्पींग ग्राउन्ड बनते त्याबाबत साहेबांना सांगितले आयुक्त साहेबांनी तो रस्ता बाजूने केला आहे असे मला वाटते. तर पाठीमागच्या लोकांनाही जायला रस्ता आहे असे मला वाटते. तर पाठीमागच्या लोकांनाही जायला रस्ता पाहिजे. नियम असा आहे की, जर तुम्हाला कंपाउन्ड बांधायचे असेल तर तुम्ही महानगरपालिकेची योग्य ती परवानगी घ्या आणि त्याला तुम्ही पाच फुट, आठ फुट किंवा दहा फुट सोडा म्हणजे तिथे ऑटोमेटीक दहा फुटाचा रस्ता तयार होतो. त्यापद्धतीने आपण परमिशन न घेता आणि वॉलकप म्हणून त्या बांधावर टाकले तर पाठीमागच्या लोकांनी काय करायचे. मला याचे उत्तर द्या. काय करायचे ते सांगा मग असेच जर चालत असेल तर माझ्या जागेतुन बरेचसे रस्ते गेले आहेत. हे श्री. अजित पाटील साहेब यांना माहित आहे. संपुर्ण जागेतून ते गटार गेलेले आहेत. रस्ते गेलेले आहेत. त्याबाबत आता सन्मा. सदस्य म्हात्रेंनी सांगितले की, जे.सी.बी. लावून डी.पी. रस्ता उद्यापासून खोदू का? बाळाराम पाटील रस्ता खोदू का बोला? सगळे आमच्या खारीगांवाच्या जमिनी आहेत. आम्हाला त्याचा टी.डी.आर. काय दिलेला आहे? डी.पी. प्लानमध्ये आहे आणि डी. पी. प्लानमध्ये असताना ही हे कसे चालेल? हे योग्य नाही. नाहीतर, मग आम्हाला हातात कायदा घ्यावा लागेल. जर तुम्ही प्रशासनाने काही केले नाहीतर, आम्हाला एकाची काळजी नाही तर आम्हाला हजारो लोकांचे बघायचे आहे. आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून ते आमच्याकडे येतात व आम्हाला त्यांना उत्तर द्यावे लागते. आम्ही मा. उपमहापौर साहेबांकडे ही गेलो होतो. तिथे सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब सगळे होते. बऱ्याचशा बायका तिथे आल्या तर त्यांनी जायचे कुठून? ते तरी तुम्ही आम्हाला सांगा. रस्त्यासाठी कोणाचाही दबाव येतो. हे योग्य आहे का? जर हे असेच होत असेल तर या रस्त्यासाठी किंवा कोणत्याही कामाकरिता माझी परवानगी राहणार नाही. सहमतीसुद्धा देणार नाही. माझा प्रत्येक कामाला विरोध राहिल. ह्याच्यावर गंभीरपणे विचार करावा. आतासुद्धा ते बांधकाम चालू आहे. तुम्ही बांधकाम करा ना. आम्ही तुम्हाला नाही म्हणत नाही. पण तुम्ही योग्य ती परवानगी घ्या आणि पाच फूट जागा सोडा म्हणजे त्या पाच फूटामध्ये लोकांचे येणं-जाणे होईल.

**नितीन ठाकूर :-**

मा. महापौर मॅडम, विरोधी पक्षनेते श्री. परशूराम पाटील ह्यांनी चांगला मुद्दा मांडला. सगळ्यांचे व्यवस्थित प्लान पास करायला पाहिजे. रोडची जागा सोडली पाहिजे. पण हे फार उशिर झालेला आहे. हे तेव्हा बोलले असते तर कदाचित आपले भाईंदर ईस्ट मिरा रोड सर्व व्यवस्थित डेव्हलप झाले असते. पण काय कूणास ठाउक? तिथे एकदम गडबड झाली.

**परशुराम पाटील :-**

सन्मा. नगरसेवक नितीन ठाकुर आपल्याला कल्पना नाही. या सभागृहामध्ये बसता ते या गिल्बर्ट मेन्डोंसा साहेब आणि परशुराम पाटील यांच्या आर्शिवादाने बसता. जर या लोकांनी बांधकामाला परमिशन दिली नसती तर आज हे दिवस आले नसते.

**नितीन ठाकूर :-**

परशुराम पाटील साहेब, गिल्बर्ट मेन्डोंसा साहेब आणि तुमच्यावर कोणाचा आर्शिवाद आहे हे तुम्हाला माहित आहे का? मला सभागृहामध्ये बोलायला लावू नका.

**परशूराम पाटील :-**

तुम्ही काय म्हणता?

**नितीन ठाकूर :-**

कोणाचा आर्शिवाद कोणावर आहे हे तुम्हाला माहित आहे का?

**परशूराम पाटील :-**

म्हणून तर तुम्हाला आम्ही बोललो ना.

**नितीन ठाकूर :-**

जे बोलायचे आहे ते बोला. तुम्ही विषयाला धरून बोला.

**परशूराम पाटील :-**

बरोबर आहे ना. तुम्ही कसे म्हणता डेव्हलपर्स झाले नसते तर महानगरपालिका झाली असती का?

**नितीन ठाकूर :-**

तुम्हाला मी सांगतो ना.

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्य आपण चर्चा करा. पण वैयक्तिक बोलू नका. आपण सभागृहामध्ये चर्चा करा.

**नितीन ठाकूर :-**

तेच आहे ना. तुम्ही विषयावर बोला ना. काय बोलायचे आहे ते.

**हॅरल बोर्जीस :-**

वैयक्तिक बोलायला प्रतिबंधक आहे.

**नितीन ठाकूर :-**

आता बोलले की, प्लान पास करायला पाहिजे. रस्ता सोडायला पाहिजे. बरोबर आहे. पण जेव्हा रहिवासी तो फ्लॅट घेतो ते डोळे बंद करून फ्लॅट घेत नाही. तो प्लॉन बघतो. ज्या बिल्डरने बिल्डिंग बांधली असेल. त्याच्यामध्ये रोड दाखविला असेल की, नाही? तो रोड कुठे गेला? आपली महानगरपालिका करते काय? नगररचना विभाग आहे जे बिल्डींग बांधतात ते बिल्डींग कसे बांधता? कसा प्लान पास करतात? ह्याची पहिल्यांदा माहिती मागवा आणि मग त्या रहिवाश्यांची बाजू घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, गेल्या दहा वर्षापासून जो रस्ता आहे तो बंद आहे करा. पायवाट असली तरी कोणी बंद करु शकत नाही. लोक दहा वर्षापासून जातात.

**नितीन ठाकूर :-**

तुम्ही दहा वर्षे झोपले होते का? महानगरपालिकेतून रस्ता पास करुन का घेतला नाही. तुम्ही चेअरमन होता ना. दहा वर्षापासून तेथून लोक जातयेत होती तर तुम्ही दहा वर्षापसून झोपले होते का?

**तुळशीदास म्हात्रे :-**

तिथे डी.पी. चा रस्ता होता.

**नितीन ठाकूर :-**

ते सोडा. डी.पी.ओ. मागत होता. ती मधली बिल्डींग तोडा. तुम्ही ती बिल्डींग तोडली नाही. तुम्ही त्या वर्षी सभापती होता ना.

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, तो रस्ता डी.पी. प्लानमध्ये आहे. आपण तो प्लान बघा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य नितीन ठाकूर, तुळशीदास म्हात्रे साहेब आपण असून घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

येथे कोणाला काय बोलायचे आहे, तुम्ही योग्यतो न्याय द्या. तुम्ही न्याय द्यायला बसला आहात ना. आम्ही सरपंच झालो, नेता म्हणून भले वेडेवाकडे केले असेल पण तरीसुध्दा तुम्हाला सांगतो त्यावेळेस बदलापूर सोडून लोक भिवंडीमध्ये राहत होते. त्याच्यामधला कायदा कुठे गफलत केला. त्याच्या हद्दीत बिल्डींग बांधतात ते काय सोडतात का? दहा वार जागा असेल तर शंभर वार बिल्डींग बांधतात. हे तुम्ही जावून बघा. चला दाखवतो. असे तुम्हाला किती बिल्डींग दाखवू. बोलायला गेलो तर पुष्कळ बोलता येईल. आम्ही मोर्चा आणू शकत नाही. आम्ही मोर्चा आणला तर हालत खराब करुन टाकेन. आम्ही सत्ताधारी बसलो आहोत. आम्हाला जाणीव आहे. प्रशासन कसे चालते, काय चालते. आम्हाला फार बोलता येते पण आम्ही का बोलत नाही? तर प्रशासनाचे आपण आणि आपले प्रशासन आहे. ह्याचा अर्थ असा होत नाही की, तुम्ही आम्हाला काहीतरी उत्तर देणार. आपण काहीतरी रुलिंग दिली पाहिजे ना. तो रस्ता लोकांनी बंद करायचा का? बेकायदेशीर बिल्डींग होत आहेत त्याचा तुम्ही जो तुम्ही टॅक्स घेता तो घ्यायला नको होता ना.

**परशुराम पाटील :-**

त्यांचे टॅक्स चालू आहे. त्यांचे रजिस्ट्रेशन चालू आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

आम्हाला कायदेशीर बाबींचा विचार करावा लागतो.

**याकुब कुरेशी :-**

सन्मा. सदस्य आपण मघाशी उभे राहून सांगितले की, टाईम वेस्ट करायला आम्ही येथे आलो आहोत का आणि आता तुम्ही उगाच तुमचे किस्से सुनवायला लागलात. तुम्ही उत्तर देवू नका ना. अधिकारी उत्तर देतील ना. तुम्ही कशाला टाईम वाया घालवता.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पण हे सर्व सांगायला नको का?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेबांनी विचारलेला जो प्रश्न आहे त्या संबंधी विभाग प्रमुखांनी खुलासा करावा.

**अजित पाटील :-**

सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे यांनी जी सुचना केलेली आहे. त्या संदर्भात काल गोडदेव गावच्या मागे चाळीचा जाण्याचा रस्ता बंद काल बंद करण्यात आला आहे. या संदर्भात तक्रार आल्यानंतर आम्ही तिथे त्वरीत काम बंद करण्याकरिता मनुष्य पाठविला. काम बंद केले. वस्तुस्थिती अशी आहे की, जी बिल्डींग झालेली आहे त्याच्यामध्ये ती बिल्डींग १०-१२ वर्षापासून आहे आणि जी जागा आहे ती पंढरीनाथ ठाकूर ह्यांची जागा आहे. त्या रस्त्यातून लोक दहा वर्षापासून जातात. परंतु, जागा ही खाजगी मालकीची आहे. वस्तुस्थिती अशी आहे. त्या जागेतून ते इमारतवाले रहिवासी जातात. ही वस्तुस्थिती आहे. रस्ता म्हणून ऑफिशियली बिल्डींगला तिथे दिसत नाही. पण मालकीची जागा खाजगी आहे. त्यांची वहिवाट दहा वर्षापासून आहे. ते कंपाउंड वॉल घालत असताना लोकांचा रस्ता बंद झाला. सन्मा. सदस्य तुळशीदास म्हात्रे साहेब आणि परशुराम पाटील साहेब ह्यांनी तक्रार दिल्यानंतर काम बंद केलेले आहे आणि संबंधितांनीही रस्ता बंद केल्याची तक्रार, संबंधित मुळ मालक आणि इतर रहिवाशी ह्यांची साहेबांसमोर बैठक बोलावून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

**परशुराम पाटील :-**

आता आपण उत्तर दिलेले आहे. तर, प्रत्यक्षात आपण दोन वेळा गेलात तेव्हा बांधकाम बंद झाले आणि ते परत चालू आहे. आता मला फोन आला होता आणि तुम्हालाही आला असेल. बरोबर आहे ना. पण माझे मत तसे नाही. जर त्यांना आपल्याला रस्ता द्यायचा नाही तर त्या सोसायटी बरोबर आपण मिटींग करा आणि तुम्हाला जमिनीचा जो काही मोबदला पाहिजे असेल ते पण तुम्ही सांगा. तेही ते द्यायला तयार आहेत. तुम्ही मोबदला सांगा.

**नितीन ठाकूर :-**

प्लान पासचे पेपर मागवा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य एकेकाने बोला.

**नितीन ठाकूर :-**

अजित पाटील साहेब, आपण मला हे सांगा की, आपण जागेवर गेला होता. तिथे कंपाउंड आहे की नाही?

**अजित पाटील :-**

त्या जागेला कंपाउंड आहे आणि त्यांचा जो वहिवाट रस्ता होता त्यांची ती बॉर्डर आहे. त्यांनी ते कंपाउंड घातले आहे. पूर्वीच्या जागेला कंपाउंड नव्हते.

**नितीन ठाकूर :-**

माणूसकीच्या दृष्टीकोनातून त्यांच्या करिता जागा ओपन ठेवली होती. त्यांचे तुम्ही इलेक्शन आले आहे म्हणून भांडण करु नका. सभापती साहेब तुम्ही होता आणि विरोधी पक्ष नेता म्हणून आपण गेल्या चार वर्षापासून आहात. तुम्ही चार वर्षामध्ये कधी मुद्दा काढला नाही. दहा वर्षापासून वहिवाट आहे म्हणून बोलता तर घरची वहिवाट तुम्ही करता का?

**परशुराम पाटील :-**

कोणाच्या घरची वहिवाट नाही. मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, ज्या माणसाची जमिन आहे त्याच माणसाचे तिथे तीन फ्लॅट होते आणि ते तीन फ्लॅट विकले गेले आणि फ्लॅट होते तिथपर्यंत त्या सोसायटीच्या लोकांना सांगितले की, तुम्ही ह्याच्यावर खर्च करा आणि तुम्ही रॅबीट वगैरे टाकून रस्ता करा आणि त्यांच्यावर ३६ हजार व ३५ हजार रुपयांचे मेन्टेनन्स होते. तर म्हणे मी असा आहे., तसा आहे. मला माफ करा. तर त्या बिचाऱ्याने ते माफ केले आणि ते फ्लॅट विकले. फ्लॅट विकल्यानंतर ते फ्लॅटवाले कुठे जातील हे तुम्ही मला सांगा? जे मेन्टेनन्स होते तेही त्यांनी माफ केले आणि त्याच्यानंतर हा रस्ता बंद केला. हे योग्य आहे का? आज तिथे २४५ ते २५० फ्लॅट आहेत तर त्यांना रस्ता नको का? आपली सुविधा काय, तर गटार पाहिजे, रस्ता पाहिजे, पाणी पाहिजे, इलेक्ट्रीसिटी पाहिजे ह्या चार सुविधांशिवाय आपण त्यांच्याकडे पैसे मागायला जातो का? त्याचपध्दतीने आपण तिथे सुविधा केली पाहिजे.

**मा. महापौर :-**

संबंधित सभागृहाची भावना लक्षात घेता सर्व सदस्यांना या विषयावर बोलायचे आहे. परंतु, सभेला सुरुवात ही झाली नाही आणि इतर विषयावर चर्चा सुरु आहे. तर सचिवांना मी असे आदेश देते की, सभेला सुरुवात करावी. ज्या विषयपटलावरील विषयावर सभा बोलावली आहे ते सर्व विषय झाल्यानंतर अर्धा तास आपण सर्व विषयावर चर्चा करु.

**रोहिदास पाटील :-**

मघाशी आपण मला बोलायला परवानगी दिली होती आणि मग बसायला सांगितले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) आपण बसून घ्या. नंतर आपल्याला सगळ्या विषयावर चर्चा करण्याकरिता सभा संपल्यानंतर पूर्ण अर्धा तास देते.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे सायं. ७.०० वा. नंतर.

**मा. महापौर :-**

सभा संपल्यानंतर. आपण सहकार्य केले तर सायं. ७.०० च्या अर्धा तास सभा संपेल.

**रोहिदास पाटील :-**

आज हे धर्मयुध्द चालू झाले आहे ते लगेच संपेल असे वाटत नाही.

**नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे ह्यांचा प्रश्न आहे.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आपण मला बोलला होता की, नंतर तुम्हाला बोलायला देणार.

**मा. महापौर :-**

आपल्याला बोलायला नंतर वेळ देणार.

**अनंत पाटील :-**

आता चर्चेमध्ये खुलासा केला असता ना.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे आपला प्रश्न आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर इन्होने जो प्रश्न पुछा था, उसका क्या हुआ?

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने उपप्रश्न विचारते की, पदोन्नती बाबत आलेले आक्षेप कोणते आहेत? त्याबाबत कोणती कार्यवाही केली व ते मा. महासभेसमोर का आणले नाहीत? पदोन्नती देताना सेवाजेष्ठता यादी विचारात घेतली आहे का? सेवाजेष्ठता असलेल्या कर्मचाऱ्यांना वगळून पदोन्नती रिक्त आहे का? सेवाजेष्ठता यादीवरील हरकती आल्या आहेत का? त्यावर आपण काय कार्यवाही केली? बारा वर्ष एकाच पदावर काम करित असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली नाही. त्यांना वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी दिलेली आहे का? याचा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे यांनी विचारलेल्या प्रश्नांचा संबंधित अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, पदोन्नतीच्या विषयी, सेवाजेष्ठताप्रमाणे पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यावर कोणीही आक्षेप घेतलेले नाही आणि आक्षेप घेतले आहेत त्यांना प्रत्येकांना वैयक्तिक सुनावणी देण्यात आलेली होती.

**संगिता म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर ह्यांना माझ्या प्रश्नाचा खुलासा करायला अधिकार देते.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्यांचा प्रश्न असा आहे की, पदोन्नतीबाबत आलेले आक्षेप कोणते आहेत त्याचे पहिल्यांदा स्पष्टीकरण करा. एक एक प्रश्नाचे उत्तर द्या म्हणजे सर्वांना माहित पडेल.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

आक्षेप तुम्हाला येथे सरसकट देता येणार नाही. तुम्हाला पहायला मिळतील. त्याचे बरेचसे आक्षेप आले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

का आले? तुम्ही बोलता की, सेवाजेष्ठतेनुसार जर पदोन्नती दिली तर आक्षेप का आले?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

वेगवेगळे आक्षेप आले आहेत ना.

**शशिकांत भोईर :-**

ह्याचा अर्थ सेवाजेष्ठतेनुसार जी पदोन्नती दिली ती योग्य नाही. जर आक्षेप आले असते तर.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

आलेल्या आक्षेपावर आम्ही निर्णय घेतलेला आहे. त्यांना सुनावणी करुन माहिती दिलेली आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

जेव्हा आक्षेप आलेले त्यावेळेस ते मा. महासभेच्या निदर्शनास आणायला पाहिजे होते ना की, अशा अशा लोकांना पदोन्नती दिली. तर जेव्हा आपण पदोन्नती देतो, पदोन्नती दिल्यानंतर, मा. महासभेमध्ये ह्यांना पदोन्नती दिली असा ठराव आपण पारित करतो. तद्नंतर मा. महासभेला त्यांचे आक्षेप आले हे कळविले नाही का?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

आलेल्या आक्षेपाची गठीत समितीपुढे देवून त्यांनी जो निर्णय दिलेला आहे तो निर्णय संबंधितांना दिलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महासभेला देणं हे उचित नाही का?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

ज्या पदान्नती द्यायच्याहोत्या त्या दिल्यानंतर मा. महासभेसमोर अवलोकनाकरिता विषय आणलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

सन्मा. सदस्यांच्या प्रश्नाचा उपप्रश्न असा आहे की, ज्यावेळेस त्यांनी आक्षेप घेतला. तुम्ही ज्याप्रमाणे सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती दिली. त्यांचे विषय आमच्या मा. महासभेत आले. मग आक्षेप घेतलेले विषय का आले नाही? तुमच्या समितीने गठीत केलेले निर्णय योग्य आहेत का? मग आमच्या मा. महासभेसमोर येण्याचे कारणच नाही, त्यांना पदोन्नती देण्याकरिता.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

ज्यांनी आक्षेप घेतले होते त्यांच्या हरकतीवर सुनावणी देण्यात आली होती व त्यांनी ते एक्सेप्ट केले. त्याच्यांनंतर ही प्रोसीजर झाली ना.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी त्यांचे आक्षेप एक्सेप्ट केले का?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

त्यांना दिलेली सुनावणी त्याच्यावर त्यांनी पुढे दिले नाही म्हणजे त्यांनी ते एक्सेप्टच केले ना.

**रोहित सुवर्णा :-**

ज्यांचा प्रश्न आहे त्यांनी बोलावे.

**शशिकांत भोईर :-**

त्यांनी तसा अधिकार दिलेला आहे आणि सन्मा. सदस्या लिला पाटील मॅडम होत्या त्यांना त्यांच्या प्रश्नाचे उत्तर बरोबर समजले नव्हते. तेव्हा मीच बोललो होतो. त्यांची जर इच्छा असेल तर ते करु शकतात ना.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, मी मध्ये इंटरअप करत आहे. आमच्या जे सन्मा. सदस्य बसले आहेत. त्यांनी १ करोड ४० लाख रुपयाचा बोर्ड येथे सभागृहासमोर दाखवत आहेत. तर हा काय प्रकार आहे? ह्या सभागृहामध्ये १ करोड ४० लाख रुपयाचा बोर्ड आणून ठेवला आहे. ह्याचा खुलासा करा. आम्ही सर्व सदस्य आहोत.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास संपू द्या.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे ह्यांनी सेवाजेष्ठता संदर्भामध्ये जो मुळ प्रश्न विचारलेला आहे आणि त्यानंतर त्यांनी काही उपप्रश्न विचारले. यामध्ये हे स्पष्ट व्हायला पाहिजे की, कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता आणि कर्मचाऱ्यांची वेतनवाढी आपल्या आस्थापना विभागाकडे मोठ्या प्रमाणामध्ये कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीमध्ये अन्याय झाल्याचे दिसत आहे. वेतनवाढ देताना सलग सेवा हा जो निकष आहे तो डावलण्यात आलेला आहे. नागपूर खंडपिठाने ह्याच्यावर निर्णय दिलेला आहे की, प्रमोशन देताना सेवाजेष्ठता हा मुळ मुद्दा विचारात घेतला पाहिजे. असा हा मुळ मुद्दा ..........

**मा. महापौर :-**

सभागृहामध्ये चर्चा चालू असताना, सदस्य एखाद्या गंभीर विषयावर बोलत असताना कृपया करुन आपण सर्वांनी लक्ष द्यावे आणि सभागृहात शांतता पाळावी.

**लिओा कोलासो :-**

हा जो मुळ मुद्दा आहे सलग सेवेबरोबर वेतनवाढ अशा वेतनवाढी बऱ्याचशा कर्मचाऱ्यांना आपल्या महापालिकेने दिलेल्या नाहीत आणि त्यांच्यावर अन्याय झालेला आहे. म्हणून मागे मी ''ज'' स्वरुपामध्ये आपल्याला प्रश्न विचारलेला होता आणि आपण त्यावेळेला सभागृहामध्ये आम्हाला आश्वासित केले होते. ह्याच्यावर सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल ह्यांचा प्रश्न होता. मी त्याच्यावर माझी भुमिका मांडली की, जर हा प्रश्न मा. महापौरांच्या दालनात, महापौर सोडवित असतील तर आम्ही तो विड्रा करतोय. पण त्याबद्दलल आपण अद्याप काही मिटींग घेतलेली नाही. तर मी विनंती करतो की, जेव्हा या महापालिकेचे सर्व कर्मचारी, हुद्देदार कर्मचारी वरच्या वरच्या हुद्याला जातात. मोठमोठी वेतन घेतात आणि ह्या सगळ्या प्रोसेसमध्ये कोणीतरी आस्थापना विभागातला किंवा कोणीतरी प्रशासनातला एखादा अधिकारी आपल्या दृष्टबुध्दीने, आपल्या त्या कर्मचाऱ्याला त्रास देण्याच्या उद्देशाने टारगेट करतो आणि अशावेळी त्याच्यावर अन्याय होतो. हा

अन्याय होउ नये. आयुक्त साहेब, वी आर अ ओपन, आम्ही सर्व खुल्या दिलाचे आहोत. एखाद्या माणसावर, एखाद्या कर्मचाऱ्यावर कशासाठी आपण अन्याय करायचा? आज आपण कर्मचाऱ्याची बाजू घेत आहोत. ज्या ज्या कर्मचाऱ्यांच्या मागण्या आल्या. प्रमोशन द्या. त्याला सर्व्हिसमध्ये ॲबसॉप्ट करुन घ्या. त्याची मंत्रालयातून मंजुरी आणा. आपण ५३८ कर्मचाऱ्यांना कायम केले. आपण इंजिनिअर कायम केले. हे असे करत असताना प्रशासनाने दृष्ट बुध्दीने राहू नये. असे या सभागृहाचे मत आहे असे माझे आपणाला स्पष्ट सांगणे आहे. म्हणून आपण या प्रश्नाचे संपूर्णपणे पुन्हा रिन्यु घ्यावा. सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे मॅडम ह्यांनी जो प्रश्न विचारला तो जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. त्यांना तो मांडता आला नसेल. सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेबांनी बोलताना त्याच्यामध्ये थोडस बरोबर मांडलेले आहे. परंतु, मी आपल्याला पुन्हा एकदा या सभागृहाच्यावतीने विनंती करतो की, कुठल्याही कर्मचाऱ्यावर सेवाजेष्ठता आणि वेतनवाढीबद्दलचा अन्याय होउ नये. याबद्दल आपण आपल्या दालनात एखादी सभा बोलावली तर आम्ही आपले आभारी राहू.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आता आम्हाला ह्याच्यावर बोलावेच लागेल. कारण हे फक्त वेळ काढून सभागृह नाही. आम्ही जेव्हा तुम्हाला बोलायला उभे राहिलो, तुम्ही सांगता नंतर बोलू या. तुम्ही रुलिंग देता.

**मा. महापौर :-**

आपण उभे राहिलात आणि बोलायला सुरुवातही केली आहे. आपल्याला आता ज्या विषयावर बोलायचे आहे त्याच विषयावर बोला.

**रोहिदास पाटील :-**

आपण एकून घ्या ना, तेच सांगतो ना. तुम्ही जे रुलिंग देता त्याचे ही इम्प्लीमेन्टेशन होते की, नाही. हे जर विचारायचे नसेल आणि सवडीनंतर विचारायचे ही प्रथा नाही. सभेच्या कामकाजाचे शास्त्र आहे की, ज्या विषयावर तुम्ही त्यावेळी अर्धा पाउण तास घोळ घातला होता. इंद्रलोकच्या येथील कार्यकारी अभियंत्याने सहज उत्तर दिले आणि सगळ्या सभागृहाला पटले. तेवढे दुधकुळे आम्ही नाही. त्यावेळी ते का नाही बोलले? त्यावेळी त्यांना बोलायला पाहिजे होते की, हा नक्की डी.पी. रोड आहे. ह्याच स्थायी समितीमध्ये मंजुरी झालेली आहे. या मा. महासभेत मंजुर झालेले आहे. जर ते गप्प राहिले आणि तुम्ही रुलिंग दिले की, त्यांच्याकडचा सगळा पैसा वसुल करुन घ्या. निटनेटके उत्तर दिले होते. मग तुमचे अज्ञान, त्यांचे अज्ञान की, आमचे अज्ञान. आम्ही म्हणतो की, तिथे माणूस राहत नाही. त्या डी.पी. रोडवर तुम्ही खर्च केलाच कसा? जर तुम्ही अशापध्दतीने लिहून कुठेतरी सांगत असाल. आम्ही सर्व्हिस रोड ......

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, विषयाचे विषयांतर होत आहे. म्हणून आपण एक-एक विषय पूर्ण करणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

विषय पुढे जोडणार नाही म्हणून सांगतो ना. आम्ही तुम्हाला सर्व्हिस रोडचे बोललो.

**मा. महापौर :-**

आता दुसरा विषय चालू असताना पुन्हा नविन विषय चालू झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही किती मा. महासभा करणार आहात की, जेव्हा नंतर उत्तर देणार.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपल्याला काय बोलायचे आहे ते नेमकं विषयाला धरुन बोला.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, आपण सर्व्हिस रोडबद्दल काय बोललात. तर काहीच नाही बोलले. ते सांगा ना. आम्ही तुम्हाला प्रश्न विचारला. तुम्ही सांगितले रुलिंग दिले, काहीच नाही. कशासाठी, काही नाही. सभागृहाला एकतरी विषयाचे तुमच्या राजवटीत पुर्तता करा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्याला किती विषयावर बोलायचे आहे ते विषय तयार ठेवा. सभा पूर्ण विषयावर संपली आहे. आजच्या विषयपटलाला प्रथम प्राधान्य देउ या. हे विषय संपल्यानंतर आपल्याला बोलायला संधी दिली जाईल.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे ह्यांचा त्या प्रश्नावर जो दुसरा उपप्रश्न आहे. जर आपण सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती दिली असेल आणि ज्यांच्यावर अन्याय झाला असेल त्यांनी आक्षेप घेतला असेल तर अशा किती लोकांची पदोन्नती आपल्याजवळ रिक्त आहे. आपण सेवाजेष्ठतेनुसार जेव्हा पदोन्नती दिली आणि काहीकांनी आक्षेप घेतला, सेवाजेष्ठतेनुसार आक्षेप घेतला तर त्यांची काहीतरी पदोन्नतीची पदे असतील ना. असे रिक्त पदे किती आहेत असा त्यांचा प्रश्न आहे.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

सेवा नियमाप्रमाणे आपण सेवाजेष्ठता आणि मेरिट ह्याच्यावर पदोन्नती दिलेली आहे.

**शशिकांत भोईर :-**

जर तुम्ही मेरीटप्रमाणे दिले असेल तर सेवाजेष्ठतेबाबतच्या हरकती, आक्षेप कशा आल्या?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

त्यावेळेला त्यांचे जे आक्षेप आले त्याप्रमाणे त्यांना सुनावणी दिलेली आहे ना.

**शशिकांत भोईर :-**

मग त्या लोकांचे समाधान झाले आहे का?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

समाधान झाले, म्हणूनच ते पुढे आले नाहीत ना.

**शशिकांत भोईर :-**

त्याच्याबद्दल दुसरा उपप्रश्न विचारतो .........

**रतन पाटील :-**

साहेब, कोर्टामध्ये कोण गेलेले आहेत का?

**शशिकांत भोईर :-**

बोला, आता त्यांनी विचारले. त्यांचा प्रश्न तसाच आहे. मी फक्त वाचत होतो.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

कोर्टामध्ये गेलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

असे किती लोक गेलेले आहेत?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

आठ लोक गेलेले आहेत.

**शशिकांत भोईर :-**

ह्याचा अर्थ त्यांचे समाधान झालेले नाही. तुम्ही पदोन्नती देताना सेवाजेष्ठता वगळून पदोन्नती दिलेली आहे.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

कोर्टात सात ते आठ लोक गेलेले आहेत. आम्ही दिलेल्या सुनावणीने त्यांचे समाधान झाले नसेल म्हणून ते कोर्टात गेले असतील.

**शशिकांत भोईर :-**

म्हणजे आपण सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती दिली ते आक्षेपार्ह होती ते योग्य आहे.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

ते आक्षेपार्ह आहे आपण असे कसे म्हणता? आक्षेपार्ह म्हणता येणार नाही ना.

**शशिकांत भोईर :-**

मग ते कोर्टात गेले कसे काय?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

कोर्टात जायला त्यांच्याकडे दुसरे कोणतेही कारण असेल ना.

**शशिकांत भोईर :-**

जे बारा वर्ष एकाच पदावर आहेत. जेव्हा सेवा बारा वर्षानंतर कुंठीत करायला पाहिजे होते. अशा लोकांना तुम्ही पदोन्नती का दिली नाही?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

बारा वर्षाची सेवा दिल्यानंतर त्यांना वेतनवाढ आणि कालबध्द पदोन्नती दिलेली आहे.

**लिओ कोलासो :-**

गोखले साहेब, त्यांना वेतनवाढ दिलेले नाही. आमच्याकडे असे पुरावे आहेत.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

वेतनवाढ देण्यात आलेली नाही. सन्मा. सदस्य बरोबर बोलत आहेत. आमच्याकडे असे पुरावे आहेत. आपण चुकीची माहिती देवू नका.

**लिओ कोलासो :-**

आपण सभागृहामध्ये माहिती नसेल तर सांगु नका. परंतु, चुकीची माहिती प्लीज सांगु नका. बारा वर्ष सलग अनेक प्रकरण आहेत की, ज्यांना वेतनवाढ आपण दिलेली नाही. जर आपण ह्या दृष्टीकोनातून ते स्विकारत नसाल की, त्यांची सिनियरिटी प्रमोशनसाठी पात्र नाही. तरी वेतनवाढ तर आपण त्यांना दिली पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

पदोन्नतीच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये जी चर्चा सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेली आहे. त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सभागृहाने जे काही सेवा नियम मंजूर केलेले आहेत. त्याचप्रमाणे जे काही प्रचलित नियम आहेत, सेवाजेष्ठतेचे म्हणा किंवा पदान्नतीचे नियम असतील त्याप्रमाणे आपल्या कार्यालयामध्ये

सुरुवातीपासूनच सेवाजेष्ठता ही प्रत्येक वर्षी आपण कर्मचाऱ्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करतो आणि त्याच्यावर हरकती सूचना वगैरे मागवतो. ज्यांच्या ज्यांच्या हरकती आलेल्या आहेत त्या हरकतींवर आपण त्यांना सुनावणी देतो आणि त्याप्रमाणे जर त्यांची बाजू योग्य असेल तर त्याप्रमाणे आपण सेवाजेष्ठतेमध्ये बदल करतो. आपण आता याठिकाणी जे काही मुद्दे उपस्थित करत आहात. त्या संदर्भामध्ये मला फक्त एवढेच सांगावेसे वाटते की, शासनाने जी काही लागू केलेली कालबध्द पदोन्नती आहे किंवा सेवाजेष्ठतेबद्दल जे कर्मचारी कोर्टात गेलेले असतील किंवा ज्यांना पदोन्नती मिळालेली नाही किंवा कोणाला काही वेतनवाढी मिळालेली नाहीत अशा कर्मचाऱ्यांची जर आपल्याकडे, कोणाकडे तक्रार आलेली असेल तर त्या तक्रारी माझ्यापर्यंत पोहचवाव्यात त्याच्यावर मी एक आठवड्याभरामध्ये निर्णय घेईल.

**शशिकांत भोईर :-**

ठिक आहे. धन्यवाद.

**रिटा शाह :-**

मॅडम, सेवाजेष्ठतेमध्ये मला जाणीव पाहिजे की, क्लास -१ आणि क्लास -२, त्यांची तुम्ही सेवाजेष्ठता कशी निर्धार करणार? एका महानगरपालिकेची सेवाजेष्ठता की, सर्वांकडून ट्रान्सफर करुन आलेले आणि त्यांनी जे काम केले त्या कामाची सेवाजेष्ठता? जसे आपण कमिशनर म्हणून आमच्याकडे आलात. त्याच्यापुढे आपण कुठे चीफ ऑफिसर असाल. तुमचे स्टेप बाय स्टेप प्रमोशन झाले असेल. मग तुम्ही इतर महानगरपालिकेत केलेल्या कामाची तुमच्या सेवाजेष्ठतेमध्ये इन्क्लूड करता की, फक्त मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये केलेल्या कामाची ती सेवाजेष्ठता होते. वर्षे इन्क्लूड होतात. सेवाजेष्ठता म्हणजे नक्की काय? तुम्ही त्याचा निकष काय लावता?

**चंद्रकांत वैती :-**

मा. महापौर मॅडमच्या परवागनीने बोलत आहे. आयुक्त साहेब आपण सांगितले की, सेवाजेष्ठता धरुन आपण पदोन्नती दिली. परंतु, आपण परत माहिती घ्या. सेवाजेष्ठतेला अनुसरुन आपण पदोन्नती दिलेल्या नाहीत. आपण सेवाजेष्ठता धरताना त्याच्यामध्ये एम.एस.-सी.आय.टी. वगैरे असे निकष लावले आणि त्याच्यामध्ये सेवाजेष्ठता हा नियम डावलला गेला आणि त्याच्यासाठी आधारभूत प्रचलित पद्धती आपण पकडली की, मधल्या काळामध्ये एक दोन पदोन्नती दिल्या होत्या आणि कोर्टातून एक ऑर्डर आली होती. त्याला आधारभूत धरलेले आहे. आपण जे सांगता की, सेवाज्येष्ठता निकष धरुन आपण पदोन्नती देत आहोत किंवा कालबद्ध पदोन्नती देत आहोत. त्या दोन्ही गोष्टी करत नाही. आपण फक्त बोलतो. प्रत्यक्षात सेवाज्येष्ठता आधारभूत धरलेलीच नाही. आपण पुन्हा एकदा माहिती घ्यावी ह्याचा रिव्हयू घ्यावा. मी आपल्याशी या बाबतीत चर्चा केली होती आणि बऱ्याच कर्मचाऱ्यांशी चर्चा झाली होती. त्यामुळे एक गोष्ट निश्चित आहे की, सगळ्याच कर्मचाऱ्यांना आपण पदोन्नती देवू शकत नाही. जेवढया जागा आहेत तेवढयाच पदोन्नती आपण देवू शकू. त्यांची वेतनवाढ १२ वर्षाच्या सेवेनंतर आपण त्यांना देत असतो. वेतनवाढ देत असतो. त्या द्यायच्या असे ही श्री. खतगावकर साहेबांबरोबर चर्चा झाली होती. परंतु, ह्याच्यामध्ये काहीच निष्पन्न झाले नाही. आता महापालिकेत एक गोष्ट नक्की झालेली आहे की, प्रत्येक कर्मचारी असे समजतो की, मला येथे न्याय मिळणार नाही. म्हणजे ज्याला मिळाले तो गप्प बसतो. ज्याला वाटले मला न्याय मिळणार नाही तो कोर्टात जातो. तर कोर्टात कर्मचारी वारंवार जातात. ह्याच्यावर देखिल आपला अंकुश पाहिजे. सगळ्याच गोष्टी जर आपण कोर्टामधून करणार असू तर मग प्रशासनाचा नेमका रोल काय राहणार आहे किंवा आपण त्यांच्यावर एवढे तज्ञ अधिकारी बसवल्यानंतर त्यातून काय निष्पन्न होते? याबाबत आयुक्त साहेब आपण पुन्हा एकदा रिन्यु घ्यावा. सगळी माहिती घ्यावी. कशाप्रकारे आपण पदोन्नती दिलेली आहे? कशा वेतनवाढी दिलेल्या आहेत? किती लोकांच्या रखडलेल्या आहेत? कारण काही लोक अजून त्याच जागेवर आहेत आणि फरक अशासाठी की, कर्मचाऱ्यांमध्ये थोडीशी उदासिनतेची भावना महापालिकेच्या कर्मचाऱ्यांवर आहे की, नव्याने आलेले कर्मचारी हे आमच्या हाताखाली असताना आमच्यावर बसले. ही त्यांच्यामध्ये भावना आहे. ही भावना, हा न्युनगंड झाला असेल. त्याच्यामुळे कामावर फरक झाला असेल तर त्यांच्यातली ती भावना कशी दूर करता येईल किंवा कशाप्रकारे समाधान करता येईल असे करुन महापालिकेच्या कामकाजाचा आणि कार्याची कार्यक्षमता वाढवावी. आपण महापालिकेमध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती किंवा जाणारे कर्मचारी आहेत. बऱ्याच वेळेला, आपल्याला अधिकारी / कर्मचारी जागेवर सापडत नाहीत. अशावेळेला येणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याने पंचिंग कार्ड पंच करुनच आले पाहिजे आणि जातानाही त्यांनी आपण कुठे गेलो याची नोंद करुन जायला पाहिजे. ह्याविषयी देखिल आपण पुन्हा एकदा विचार करुन सभागृहासमोर हा विषय आणावा.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सगळ्यांनी सगळेच मुद्दे बोलून घेतले आहेत. मला बोलण्या सारखे काहीच नाही. फक्त एक मुद्दा मी वारंवार उपस्थित करेन की, मागच्या दोन सभांमध्ये ''ज'' च्या प्रस्तावाद्वारे सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाण ह्यांनी कोण श्री. मेश्राम नावाच्या व्यक्तीचा प्रस्ताव आणला. तर कधी सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांना आणला तर सन्मा. सदस्या संगिता म्हात्रे ह्यांनी हाच प्रश्न प्रश्नोत्तराच्या तासामध्ये उपस्थित केला. हे सगळं आपल्याला दाखवतय तर काय, पदोन्नतीमध्ये कुठेतरी काहीतरी गडबड आहे आणि हे आपल्याला मान्य सुध्दा करावे लागेल. एक मुद्दा सांगते. काही लोकांना पदोन्नती देताना आपण निकष लावले

की, पदवीधारक असावे, तर काहींना एल.एस.जी.डी. चे नियम लावले गेले. आज अशी कित्येक लोक आहेत की, त्यांना कोर्टात धाव घ्यावी लागते. हे सभागृह कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये नेहमीच, सुरुवातीपासून १९९२ पासून आजपर्यंत कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये एकदमच म्हणजे सॉफ्ट कॉर्नर राहिलेला आहे. असे असताना इथल्या कोणत्याही कर्मचाऱ्याला मग तो मोठा वरचा अधिकारी असो किंवा खालचा छोटा कर्मचारी असो. त्यांना कधीही न्यायालयापर्यंत जाण्याची गरजच नको होती. जर तुमचे सभागृह येथे सक्षम आहे. त्यांच्या सर्व काही मागण्या मान्य करण्यापासून इव्हन तुमचे सानुग्रह अनुदान असो किंवा कोणताही कार्यक्रम असो. कर्मचाऱ्यांच्या बाबतीमध्ये मी या सभागृहाला मी गेले तीन टर्म काम करते. येथे कधीही असे नियम आखले नाहीत की, जेणेकरुन कर्मचाऱ्यांना त्रास होईल. असे असताना जर आपले कर्मचारी न्याय मागण्यासाठी जर न्यायालयात जात असतील तर निश्चितपणे या सभागृहाच्या दृष्टीने मानहानीकारक आहेत. कमिशनर साहेबांनी म्हटले की, मी आठ दिवसांमध्ये त्यांना नक्की न्याय देईन. मी अपेक्षा करते तुमच्या कडूनही न्याय मिळेल. त्याही पलिकडे जावून मी असे म्हणेण की, जर कधी असे मुद्दे उपस्थित झाले तर कमिशनर साहेब मी मा. महापौरांच्या माध्यमातून तुम्हाला सांगेन की, किमान आपले १-२ जेष्ठ नगरसेवक आहेत किंवा मा. महापौर साहेबा आहेत किंवा उपमहापौर साहेब आहेत आपण स्वतः आहात तर ह्या कर्मचाऱ्यांना कृपया या इमारतीच्या बाहेर न्याय मागण्यासाठी जायला लावू नये आणि आपल्या घरी त्यांना न्याय मिळावा. प्रत्येकाची प्रकरणे निकाली काढावी. अशी मी संपूर्ण सभागृहाच्यावतीने आपल्याला विनंती करते. कृपया ह्याच्यापुढे तो तिथे पोहचला त्याला पदोन्नती मिळाली, त्याला वेतनवाढ मिळाली आणि मी तिथेच आहे. हा न्युनगंड कोणाच्याही मनात राहता कामा नये अशी मला एकंदर तुम्हाला विनंती करावीशी वाटते.

**रिटा शाह :-**

साहेब, माझा एक प्रश्न होता की, आपण सेवाजेष्ठतामध्ये काय निकष लावता? म्हणजे एका महानगरपालिकेत कंन्टीन्यु केलेले काम ते सेवाजेष्ठता की, इतर महापालिकेमध्ये चार वर्षे आणि नंतर आपल्या महापालिकेमध्ये पाच वर्षे काम केले. मग त्याचे पुढचे चार वर्षे आपण इन्क्ल्यूड करणार की, बाद करणार ते सेवाजेष्ठता क्लास -१ आणि क्लास -२ करिता.

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

सेवाजेष्ठतेला नेमणूकीची तारीख पकडली जाते.

**रिटा शाह :-**

नेमणूकीची तारीख इतर नगरपालिकेमध्ये असेल तिथे चार वर्षे काम केले मग नंतर त्यांची ट्रान्सफर होउन मिरा भाईंदर महानगरपालिकेत आले. इथे आता ते परमनन्ट झाले. मग तुम्ही त्याची सेवाजेष्ठता कशी धरणार? त्याने मागे केलेल्या चार वर्षाचा अनुभव तुम्ही घेणार नाही का?

**संजय गोखले (सहा. आयुक्त) :-**

नोकरी लागण्याची तारीख आणि ..........

**रिटा शाह :-**

नोकरी लागण्याची तारीख म्हणजे, कुठल्याही नगरपालिकेमध्ये. बरोबर आहे ना. मग तुमचे सेवाजेष्ठताचे जर तुमचे काही मॅटर पेन्डीग आहेत त्याच्यामध्ये तुम्ही काढून बघा. क्लास -१ आणि क्लास -२ मेन, ते तुमच्याकडे ट्रान्सफर होउन आलेले आहे. त्यांच्या मागचा जो ४-५ वर्षाचा जो हिशोब आहे तो तुम्ही ह्याच्यामध्ये इन्क्ल्यूड केलेला आहे आणि आपल्या या महानगरपालिकेचे असे दुर्देव आहे की, आपल्योड बी.ई. सिव्हील इंजिनिअर आहेत, सिव्हील इंजिनिअर आहेत, डिप्लोमाधारक आहेत ती लोक १२ वी पास, १५ वी पास असे त्यांच्या हाताखाली काम करतात आणि आपले सिव्हील इंजिनिअर नुसते रिपोर्ट बनवितात. ही दुर्देवाची गोष्ट आहे. कारण कशाला तर प्रशासनाला काम करण्याची आणि आस्थापना डिपार्टमेंटने क्लास -१ आणि क्लास -२ मध्ये काहीच बघितलेले नाही.

**रोहिदास पाटील :-**

श्री. संतोष पाटील व श्री. देविदास पाटील हा विषय आणला होता. या सभागृहाला ही माहिती देवू इच्छितो की, तुमचे ही लक्ष वेधतोय. जो १४ वर्षे नोकरी करतो. आयुक्त साहेबांनी सांगितले होते. (काका) माझ्याकडे पाठवा मी त्यांना न्याय देईन. न्याय काय दिला? सिलेक्शन कमिटने त्यांना कायम करण्याचे दोन ओळींचे पत्र दिले. या तारखेपासून म्हणून १४ वर्षे त्यांची सेवा खंडीत झाली म्हणून असे समजायचे की, काय करायचे? मॅडम, साधारण महानगरपालिकेत काम करणारा कर्मचारी हा महापालिकेत असू दे, नगरपालिकेत असू दे, किंवा कोणत्या खाजगी संस्थेत असू दे. जो नोकरी करतो त्याचे सगळे कुटूंब त्याच्यावर अवलंबून असते. आपण कोणत्या नियमात, कसे देतो? साहेब तुम्ही तो विषय मनाला लावून घेत नाही. तुम्ही लगेच दुसऱ्यावर सोपवता आणि त्यांच्यांकडून तो विषय नीट हाताळला जात नाही असे मला सभागृहाला दाखवायचे आहे. ज्याने १४ वर्ष नोकरी केली त्या माणसाला आता कायमस्वरुपी केलेले आहे असे उत्तर दिले. म्हणजे आपण काय न्याय दिला? त्याला काय समजायचे? तो आजच्या दिवसापासून कायम स्वरुपी झाला? १४ वर्षापासून झाला? आम्ही तर तुमच्याकडे मागत होतो की, त्याला १४ वर्षाची पदोन्नती त्याचे काही इन्क्रीमेंट ह्या सवलती त्याला मिळाव्यात. ह्यासाठी आम्ही सारखे विनंती करत आहोत. सगळ्यांनी आपआपल्या परिने विषय मांडलेले आहेत. अत्यंत पोटतिडकीचे विषय आहेत. कामगारांमध्ये, अधिकाऱ्यांमध्ये ह्याच्यामध्ये उगाच

दुजाभाव होत आहे. कोणाला तरी न्याय मिळतो तर कोणाला न्याय मिळत नाही. कोणाला असे वाटते की, कोणाचे हात फार लांब आहेत. कोण इकडून चिठ्ठी घेउन येतोय तर कोण तिकडून चिठ्ठी घेउन येतोय आणि एखाद्या कामात उगाच कुठेतरी ''ज'' चा प्रस्ताव येउन एखाद्याची नोकरी कायम होते. ही कोणती नविन तऱ्हा चालली आहे. एखाद्याचे भले होते म्हणून सभागृह ही बोलत नाही. पण ''ज'' च्या प्रस्तावाने कोणाची नोकरी कायम होत नाही. मॅडम, आम्हालाही तेवढे समजते. पण एखाद्याला नोकरी मिळते म्हणून आम्हीही बोलत नाही. त्याचे बिचाऱ्याचे कल्याण होउ दे. पण त्याचे कल्याण होते वेळी दुसऱ्या कोणाचे कल्याण झाले आहे का? असा ही इतरांना संशय येतो. त्यामुळे एका पध्दतीने आपण नोकरी देतो किंवा कायम करतो किंवा नगरपालिकेत काम करणारा तो सफाई कर्मचारी असू दे किंवा कोणी एक्झीकेटीव्ह ऑफीसर असू दे. त्याला आपण न्याय देतो असे होणे गरजेचे आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या पदे व पदोन्नतीबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा घडवून आणली. आयुक्त साहेबांबरोबर ह्या विषयावर चर्चा केली असता ते म्हणाले मी आठ दिवसामध्ये ह्या सर्व व्यक्तींवर, कर्मचाऱ्यांवर जो अन्याय झालेला आहे तो दूर करण्याचा आमचा पूर्ण प्रयत्न असेल. मी या संबंधित लवकरच आठ दिवसामध्ये महापौर दालनामध्ये या विषयी सन्मा. सदस्य लिओ कोलासो साहेबांनी ही मागणी केली त्याप्रमाणे मिटींग लावण्यात येईल. सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ७५, श्री. ओमप्रकाश गंगाधर अग्रवाल ह्यांचा प्रश्न आहे.

**मिलन पाटील :-**

सचिव साहेब, अर्धा तास झाला ना.

**नगरसचिव :-**

५ मिनिटे आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

५ मिनिटामध्ये हा विषय होणार नाही. त्यामुळे पुढच्या वेळी घ्या.

**नगरसचिव :-**

मा. महापौर मॅडम यांनी तशी रुलिंग द्यावी.

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील कामकाजाला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

या सभेकरिता एक लक्षवेधी आलेली आहे. सुचक - श्री. मदन उदितनारायण सिंग व अनुमोदक- शिवप्रकाश भुदेका आहेत. मी ती लक्षवेधी मा. महापौर मॅडम यांच्याकडे सुपूर्द करित आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मदन उदितनारायण सिंग ह्यांनी एक लक्षवेधी सभागृहापुढे आणलेली आहे. ह्या लक्षवेधीवर १५ मिनिटे चर्चा करण्याकरिता देत आहे.

**रिटा शाह :-**

मॅडम, त्याच्या अगोदर हे १ करोड ४० लाख रुपयाचे बोर्ड सभागृहामध्ये दाखवणे योग्य आहे का? आणि आणले आहे तर त्याचा अर्थ काय आहे?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, उनसे पुछलो यह १ करोड ४० लाख रुपये क्या है? मतलब क्या है? यह आज पहलीबार लग रहा है।

**रोहित सुवर्णा :-**

आप जिन कर्मचारीयोंके प्रमोशन की बात कर रहे है उन्होने महानगरपालिका को पैसा देने का बाकी है। डॉ. बावस्कर १ लाख ४० हजार रुपये लेके गए है। उन्होने अभी तक उसका हिसाब नही दिया। कुछ कर्मचारीयोंने ॲडव्हान्स लिया है। वह आज तक दिया नही है। आप उन लागो को बोलिए की, इसका हिसाब इन कर्मचारीयोंसे लिजिए।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, लक्षवेधी पुकारलेली आहे ती लक्षवेधी काय आहे हे आम्हाला वाचून सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णाजी आपला बोर्ड आणि बोर्डावर जी सुचना आहे ती सर्व सदस्यांनी पाहिलेली आहे. ह्याच्यावरसुध्दा आपण चर्चा करणार आहोत. आपण बोर्ड खाली घेतला तरी चालेल.

**रोहित सुवर्णा :-**

बरोबर आहे. धन्यवाद मॅडम, आपण कधी कधी बोलायला वेळ देत नाही म्हणून हे पण करावे लागते.

(मा. महापौर मॅडमच्या परवानगीने नगरसचिवांनी सभागृहासमोर लक्षवेधीचे वाचन केले.)

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर महोदया, यह लक्षवेधी के हिसाब से मैं मा. महासभा का लक्ष इस तरफ खिंचना चाहता हूँ की, आज इस शहर में क्या हो रहा है? आज शहरमें अतिक्रमण कही भी कुगडमत्ते की तरह हो रहा है। फुटपाथपर दुकान हो रहे है, रस्तेपर गाला हो रहा है। कहीभी बिल्डिंग बन रही है। उसमें अपने महापालिकामें जो अतिक्रमण विभाग है, मैं सबसे पहले अतिक्रमण विभागसे पुछना चाहता हूँ की, अतिक्रमण विभाग का काम क्या है? अतिक्रमण को बढावा देना या अतिक्रमण को रोकना इसका जवाब दिया जाए।

**मा. महापौर :-**

संबंधित विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांनी या प्रश्नाचा खुलासा करावा.

**अजित पाटील :-**

अतिक्रमण विभागाचे काम आहे की, त्यांनी शहरामध्ये सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक जागेवर जे अतिक्रमण रोखण्याचे काम अतिक्रमण विभागाचे आहे.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर महोदया, अतिक्रमण अधिकारीने अपनी मा. महासभा, पत्रकार और सभी पब्लिक के सामने कहा की, अतिक्रमण विभाग का काम रोकना है। लेकिन मैं देख रहा हूँ और शायद मा. महासभामे बैठे सभी सदस्योंको इसका अनुभव होगा की, जिस किसी अतिक्रमण के बारे में सदस्यने अगर अतिक्रमण विभाग को कंप्लेंट किया है तो वहाँ अतिक्रमण जरुर हो गया होगा और मैं बताना चाहता हूँ की, जैसे आज जो बायपास रस्ता जेसल पार्क चौपाटी से घोडबंदर और रेल्वे स्टेशन से घोडबंदर की चौपाटी आरक्षित है। इसमें जितने अतिक्रमण हो रहे है। मैं करिब ३-४ सालसे इसके पिछे मेरे कम से कम २० लेटर है। लेकिन किसीपर भी कार्यवाही नही हुई है और अतिक्रमण बिनधास्त हो रहा है। इसके बारेमें उनका क्या कहना है? मा. महापौर महोदया, संबंधित अधिकारी इसका जवाब दिजीए। इसपर कार्यवाही क्यों नही हो रही है?

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य, आपण विचारलेली जी लक्षवेधी आहे त्यामध्ये उपस्थित केलेले जे मुद्दे आहेत त्याबद्दल आपण बोलत आहात ना?

**मदन उदितनारायण सिंग :-**

त्याच मुद्याबद्दल बोलतो आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्यांच्या मनात जे आहे ना, त्या दोन्ही मुद्दयाबाबत बोलू द्या ना. तुम्ही उत्तर दिलेले आहे. हे सभागृहाचे कामकाज चालते. तुमच्या मनात जी शंका आली आहे त्याचा ही मी खुलासा करतो ना. दोन्ही मुद्दे विचारतोय. जेव्हा ९० फुटीचा रस्ता आहे हा पुर्ण शहराच्या दृष्टीने, शहरातल्या रस्त्यावर महापालिकेने खर्च केला. त्याच्यावर झोपड्या होतील. तिथे जे बांगलादेशी आहेत त्यांच्यावर पोलिस कारवाई करतील आणि महानगरपालिका ही बघ्याची भुमिका घेणार का? ओशिएन पॅलेसजवळ पॅक केलेल्या, भरणी केलेल्या जागेवर झोपड्या झाल्या. त्यातले बांगलादेशी पकडली, नेली, पोलिस रेकॉर्ड बनला. आम्ही काहीही करणार नाही. एक नगरसेवक बोलतो म्हणजे संत आहे शांत आहे म्हणून आपण त्याची समजून काढून बसवायचे? तुमच्या मनात जर शंका आली पण, त्यांनी विचारले होते की, टॅक्स पावती कोणाची आहे? त्या ठिकाणी कार्यालय झाले. ते राष्ट्रवादीचे कार्यालय झाले? काय कशापद्धतीने कामकाज चालले आहे? आणि मी एकटा बोलतो असे नाही.

**महेंद्रसिंग चौहान :-**

ऐसा हमलोग तो आजतक कभी बोला नही। किसी पार्टीने लगाया है। राष्ट्रवादी का कोई भी बोर्ड लगा ले, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील के लिए सब्जेक्ट मिल जाता है। राष्ट्रवादीका कोई बोर्ड कहीपर भी नही लगा है। अभी मैं बताउ, इस तरह इस संदर्भ मे देखिए, नगरपालिकाके काम जैसे अभी अधिकारीने बताया की, अतिक्रमण रोकनेका है। सही मायने में अतिक्रमण रुक रहा है। रोकने का काम है लेकिन कभी कभी अधिकारी महोदय, शिकायत करनेके बाद अगर ढाई घंटेमे परमिशन मिल जाती है अधिकारीसे, मा. आयुक्त के सिग्नेचर से एक लेटर मिल जाता है अनधिकृत काम का कितना गलत और शर्म की बात है। साडे ग्यारह, बारा बजे मेरी कंम्प्लेट आती है प्रभाग अध्यक्ष के नाते की यह काम गलत हो रहा है। वह नही होना चाहिए। ठिक साडे पाँच बजे आयुक्त महोदय के सिग्नेचर का लेटर आ जाता है की, इसको वेदरशेडस् की परमिशन दि गई है। कैसे शहर का भला हो सकता है आप बताईए। बिल्डिंग बनी हुई है, अभी फिलहाल एक साल से और उसको वदरशेडस् का परमिशन मिल जाता है। कभी कभी हम अपने स्वार्थ के लिए दुनिया, शहर खराब कर देते है। आपने देखा होगा, राष्ट्रवादी का पर राष्ट्रवादी का कोई बोर्ड कहीपर नही है। यह मैं आपसे बोलता हूँ लेकिन मेरी भी शिकायत है, आयुक्त महोदय को साडे बारा बजे मेरी ऑफिशिअल शिकायत आती है। ठिक साडेपाँच बजे बा-कायदा इनका लेटर आ जाता है की, इनको वदरशेडस् क्यो दि गई? वदरशेडस कौनसा? अभी कौनसी बरसात हो रही है? कौनसा तुफान आ रहा है? १६ तारिख का लेटर और १८ तारिखको परमिशन दी जाती है। मेरा कहनेका मतलब है की, अनधिकृत काम को रोका जाए। सुभाषचंद्र बोस स्टेडियम, मैने गार्डन बनाने के लिए जगह माँगी। मैंने बोला दो कॉर्नर खाली है तो कम से कम गार्डन बनाया जाए। अपना पैसा बेकार चला जाता है। अभी पैसा बेकार था, २५ लाख

रुपये दुसरी जगह ट्रान्सफर किया गया। उनसे गार्डन बन सकता था लेकिन किसी के कान पर जू नही रेंही की, वह गार्डन कॉर्नर बना दिए। उनमे और बीस झोपडी बन गयी। सुभाषचंद्र बोस स्टेडियम जहाँपर सारे बडे बडे लिडर आकर चले गए। आयुक्त महोदयने कभी नही सोचा की, इसतरह का, आप उसके अध्यक्ष है। मै बराबर चिल्लाता हूँ। लेकिन नही सोचा। यहा गाडीयाँ पास हो गयी। मा. सिटी इंजिनिअर इनको पुछिए, श्री. खांबित को पुछिए एक ठराव पास हो गया की, मिट्टी डाली जाए लेकिन मिट्टी नही डाली गयी। वहाँ झोपडे और बन गए। कहनेका मतलब अतिक्रमण विभाग है लेकिन उस काम करने के लिए कही ना कही से रुकावट है। यह रुकावट क्यो है? क्या हममें सक्षमता नही है। हम नगरसेवक ऐसे ही बोलकर चले जाते है। चाहे वह सन्मा. सदस्य रोहिदास पाटील हो, कैलासबेन जानी हो। हम सब लोग करते तो शहर की भलाई ही है। हाँ ठिक है अगर कोई भी अपनी भलाई करता है तो उसे रोकिए ना। आप वह नही रोकते हो। वह हममे आप उसमे लगा देते हो। वह नगरसेवक यह करता है। जो काम है, जो कायदा है उससे नही चलते है। साडे पाच बजे ढाई घंटेमें परमिशन मिल जाता है। मैं तो एक परमिशन मांग रहा हु मुझे चार साल हो गये मुझे परमिशन नही मिली। एक गाला उठानेकी। एक आदमी जो दुखी है। उसे सहानुभूती नही मिलती और मैंने देखा की, ढाई घंटेमें आयुक्त महोदय का सिग्नेचर साडे पाच बजे उसको परमिशन मिल जाती है। परमिशन कैसे मिल गई। पुछो, इनक्वयरी करिए। जो सच्चाई है वह मैंने बता दी।

**परशुराम पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, आता जो झोपडपट्टीचा विषय आलेला आहे. घोडबंदर ते चौपाटी या विषयी मेन मुद्दा असा आहे की, सगळ्या नगरसेवकांच्या निदर्शनास यायला पाहिजे होते की, सुभाषचंद्र बोस मैदानाच्या येथे डिवायडरमध्ये जी बांधकाम आहेत तिथे १५ ते २० झोपड्या होत्या आणि त्या झोपड्या आता टेंबापर्यंत गेलेल्या आहेत. म्हणजे आपली शान, तिथे मैदान झालेले आहे. तेथून मुंबईवाले जा-ये करतात. त्याठिकाणी आयुक्तसाहेब, पाणी किती? मुलं किती? ड्रायव्हिंग शिकण्याकरिता वाहने येतात ती त्यांनी कशाप्रकारे चालवावीत? असे तिथे त्रासदायक झालेले आहेत. त्या डिव्हायडरमधल्या आत्तापर्यंत कशासाठी तर, आपणाला तिथे डिव्हायडर चांगले बनवायचे आहे. त्यासाठी आपण त्या झोपड्या तिथे कशासाठी ठेवल्या आहेत. आपल्याला तिथे काय अडचणी आलेली आहे आणि ते कधी हटविल्या जातील? त्या अताच्या झोपड्या आहेत त्या १९९०-९५ च्या झोपड्या नाहीत तर आयुक्त साहेब, आपण त्यांच्यासाठी काहीतरी करायला पाहिजे.

**दिनेश नलावडे :-**

आपण विषयांतर करु नका.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, लक्षवेधी कोणाची आहे?

**परशुराम पाटील :-**

आयुक्त साहेब, ज्यापद्धतीने लक्षवेधी आणलेली आहे. त्याच पद्धतीने जो नवीन रस्ता आहे त्याठिकाणी जर अशा पद्धतीने डिव्हायडरमध्ये झोपड्या झाल्या तर त्यांना आपण काढू शकाल का? आपण त्यांना का रोखत नाही. त्यांच्या झोपड्या का हटवू शकत नाही? त्यांच्यावर कडक कारवाई व्हावी आणि सुभाषचंद्र बोस मैदान जिथे आपले चांगले प्रोग्राम होतात त्या तिथे आपल्याला काहीतरी गंभीर कृती बघायला मिळतात. तिथे कार्यवाही व्हावी अशी आपल्याला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहात शांतता ठेवा. सन्मा. सदस्य यांनी आपली लक्षवेधी व तसेच, इतर सदस्यांनीही शहरात होणाऱ्या झोपडपट्टीचे अतिक्रमण हटवा अशी मागणी केलेली आहे. संबंधित अतिक्रमण विभागाचे जे अधिकारी आहेत, तर ह्या झोपडपट्ट्या का वाढत आहे आणि त्या का हटवल्या जात नाही ह्याचे काहीतरी कारण असेल आणि ते ह्या विषयावर नक्कीच खुलासा करतील.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आता हा जो विषय आलेला आहे हा आमच्या ८ नंबर प्रभागातील आहे. पवन पॅलेस व ओशियन पॅलेस त्याठिकाणी चिंतामणी नाला वगैरे आहे. त्याठिकाणी नविन झोपडपट्टी बनलेली आहे. वारंवार आम्ही तोंडी तक्रारी केल्या, लेखी तक्रारी केल्या तरी त्याच्यावर अधिकाऱ्यांनी अजून काहीही कार्यवाही केलेली नाही. महाराष्ट्र शासनाचा परत जी. आर. निघेल २००० पर्यंतच्या झोपड्या परत इललिगल त्या लिगल करुन टाका. त्यावेळी हे दावा करतील की, आमच्या झोपडपट्ट्या ह्या सन २००० च्या अगोदरच्या आहेत किंवा नंतरच्या आहेत. त्यांच्या टॅक्सच्या पावत्या तिथे पोहचलेल्या आहेत. किंवा नंतरच्या आहेत. त्यांच्या टॅक्सच्या पावत्या तिथे पोहचलेल्या आहेत. ह्या महानगरपालिकेत जे होत नाही ते होऊन जाते. आता आमच्या प्रभागामध्ये ऑफिस बनले आहे. गटाराच्या नाल्यावर आता सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जे बोलले ते बरोबर आहे. तिथे राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बोर्ड लागला. गटार बंद झालेले आहे. त्या गटारातून पाणी निघणार नाही. भाईंदर इस्टच्या राष्ट्रवादीचे ते अध्यक्ष आहेत आम्ही सांगितले आणि कमिशनर साहेबांनी ते का थांबले हे माहित नाही. कमिशनर साहेब, मी पण एक सदस्य आहे. जेव्हा आम्ही सदस्य म्हणून आपल्याला सांगतो त्यावेळेला आपल्या अधिपत्याखाली जे काही घडते. ते तुम्ही करायला पाहिजे. नाहीतर तुम्ही परत कधीतरी

कार्यवाही करतो, बघतो, होईल, तुम्हाला दुसरेही कोण काही सांगत असतील. परंतु, ह्या शहरामध्ये जर असे काही चालले तर मा. महापौर मॅडम, आज अधिकारी बाहेरचे येतील आणि परत निघुन जातील पण या शहराचे काय? तुम्हाला आणि आम्हाला ते बघायचे आहे. त्या गाळ्यावर अगोदर टॅक्स पावती लावली. पण गटारावर गाळा नाही, काही नाही व टॅक्स पावती तिथे तयार आहे. हा काय प्रकार आहे? आम्ही सांगून देखील काय होत नाही. श्री. अजीत पाटील साहेब तिथे जावून आले आणि त्यांनी स्वतः पाहणी केली, तिथे काही नव्हते आणि आज त्या गाळ्यामध्ये ए. सी. लागली. फोन आला, पंखे लागले, लाईट लागली व तिथे सगळे बसायला लागले. श्री. अजित पाटील साहेब, यावर खुलासा करा ना. काय प्रॉब्लेम येतात ते सांगा. झोपडपट्टी का उठत नाही? ते अजून वाढवायचे आहेत का? रस्ते बंद करायचे आहेत का? उद्या जी चौपाटी बनणार आहे तो रोड ही बनणार नाही. उद्याला जर हे झोपडपट्टीवाले कोर्टात गेले व स्टे आला तर कमिशनर साहेब हात उंच करतील की, स्टे आलेला आहे आम्ही झोपड्या उचलू शकत नाही. मा. महापौर मॅडम, हे सर्व आपल्या कारकीर्दीमध्ये घडत आहे. कृपया, आपण या संपुर्ण कामाचा खुलासा करावा.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा, महापौर मॅडम, आपने मुझे इस विषयपर चर्चा करनेके लिए १५ मिनिट का वक्त दिया है। मुझे दिया है, यह सब को नही दिया है। तो वह टाईम मुझे वापस मिलना चाहिए। मैने तीन मिनिट बोला है। बारा मिनिट बाकी है। वह मुझे मिलना चाहिए।

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी सदस्य झाल्यापासून पहिले लेटर माझे टाऊन पार्क शिपला आहे. टाउन पार्क शिप आपल्याला विकसीत करण्यासाठी माझे पहिले लेटर आहे. तिथे पहिले २०-२५ झोपड्या होत्या आणि आता तिथे २०० झोपड्यांच्या वर झोपडे झालेले आहेत आणि त्या झोपड्यांना १९९५ पूर्वीचे कार्ड पाच-पाच हजाराला गेलेले आहे. तुम्ही विचार करा. पुन्हा ती लोक कोर्टात जातील आणि तिथे संबंध अधिकारी त्या रोडने जातात. आता पुर्वी जेंव्हा प्लांट चालू होता त्या प्लांटला ओलांडूनसुद्धा नविन नविन झोपड्या त्या रस्त्यावर होउ लागल्या आहेत. तुम्ही अधिकारी रोज त्या रस्त्याने जाताना बघतात पण सगळे अधिकारी त्याबाजूच्या काचा वर करतात. सरळ निघून जातात. हे कोणालाही लक्षात येत नाही. आमच्या कारकिर्दीचे थोडे दिवस उरले आहेत. आम्हाला टाउनशीप पार्क बघायचे आहे. तर ते विकसीत करण्याकरिता आपण बघा आणि जेवढे अतिक्रमण आहे तेवढे हटवा. आपले सिक्युरिटी येथे चार चार थांबतात. जिथे जरुरी नाही तिथे पाच-पाच जण थांबतात. त्यातले सिक्युरिटी तिथे पाठवा. हे काय चालवलेले नाही. तिथे अजिबात कोणी नाही.एवढ्या झोपड्या रोज होतात आणि आपले लोक ५ - ५ हजाराला १९९५च्या पुर्वीच्या झोपड्या म्हणून त्याला मान्यता देतात. हे काय चालले आहे. पहिले २५ झोपड्या होत्या. शहरातीलच नगरसेवक आहेत त्यासर्वांनी बघितले असेल. त्यावेळेला तिथे २५ झोपड्या होत्या आता तिथे किती झोपड्या झाल्या आहेत ते बघा. या शहराला कुठेतरी एक मोठ उद्यान तरी असू द्या. या शहराला ते उद्यान आवश्यक आहे. आणि ते सेंटर आहे. आज मिरा रोडची एवढी वस्ती वाढत आहे, भाईंदरची वस्ती वाढते. कुठेतरी एक मोठ उद्यान असू द्या. या अधिकाऱ्यांना वाटत नाही का, या शहराला आपण काहीतरी मोठे उद्यान द्यावे. आपल्याकडे एवढे आहेत. १०० - २०० तिथे डे - नाईट १० सिक्युरिटी लावा ना. मॅडम, आपण रुलिंग द्या आणि तिथे पहिल्यांदा सिक्युरिटी बसवा. येथे कोणी चोरायला येत नाही. पण तिथे २ - २ चार सिक्युरिटी डे - नाईट ठेउन द्या.

**प्रभात पाटील :-**

सन्मा. सदस्य मदनसिंग ह्यांचे कौतुक करावे की, अभिनंदन करावे ते खरच पात्र आहेत. त्यांनी एक चांगला विषय येथे आणला. भाईंदर ते ठाण्यामधले अंतर कमी करणारा रस्ता म्हणून आपण ज्याच्याकडे नेहमी पाहिले. ज्याच्यावर आपण लाखो करोडो रुपये खर्च केले. ते कोणासाठी? म्हणजे आपण आपल्या फायद्यासाठी केले? की, नागरीकांच्या सोयी सुविधांसाठी केले की, त्या झोपडपट्टीवाल्यांसाठी केले? हा पहिला प्रश्न विचार करायला लावण्या सारखा आहे की, करोडो रुपये नागरिकांच्या खिशातले आपण घालवायचे आणि कोणीतरी बांगलादेशी येउन तिथे झोपड्या बांधायच्या, जी हालत आज तुमची येथे होते इतका चांगला रस्ता आपण दिला. संपुर्ण काशीमिरा रोड ते एस्सेल वर्ल्डकडे जाणारा रस्ता आज सुभाषचंद्र बोस मैदानाच्या इतक्या झोपड्या झाल्या आहेत की, इतक्या वर्षांनंतर आपण त्यांना हटवू शकत नाही. उद्या आपण तो रस्ता डेव्हलप करायला घेतला तर त्या झोपडपट्टीवाल्यांना हटविण्याची ताकद आपल्याकडे आहे का? आपण तेवढी ताकद घेउन चाललो आहे का? हे कधीतरी आपण केव्हाच आवर घालायला पाहिजे होता. मला असे वाटते की, आता आपल्या आवक्याबाहेर केस गेलेली आहे. मागच्या सभेमध्ये आपण श्री. अजित पाटील यांचे कौतुक केले. मी मा. महापौरांना आणि कमिशनर साहेबांना विनंती करते की, त्यांना पुर्ण अधिकार द्या त्यांना महापालिकेचे सुवर्ण पदक देउ या. त्यांनी त्या झोपड्या हलवून दाखवाव्यात. पुर्ण ताकदीनिशी आपण प्रशासन अधिकारी आणि आम्ही शासन, पुर्णपणे आम्ही त्यांच्या पाठिशी उभे राहू. त्यांना पुर्ण अधिकार द्या आणि पंधरा दिवसाच्या आतमध्ये त्यांनी ते करुन दाखवावे. आपण त्यांना सुवर्ण पदक देउ अशी मी सभागृहाला विनंती करते.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, मैने यह जो लक्षवेधी लाया इसमे......

**प्रभात पाटील :-**

सुवर्ण पदक आम्ही आमच्या खर्चाने देवू. नगरसेवकांच्या खर्चाने देवू.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे. बऱ्याचशा वेळेला या सभागृहांमध्ये मागच्या वेळेलासुद्धा मा. महासभेमध्ये असाच प्रश्न आला होता त्यावर मा. महापौरांनी रुलिंग दिली होती की, त्या रस्त्यामध्ये असणारे जे अनधिकृत झोपडपट्ट्या आहेत, डिव्हायडरमध्ये असणाऱ्या झोपडपट्ट्या आहेत त्या उठवल्या जातील. पण आजतागायत त्यावेळेला पावसाळा होता म्हणून १ महिन्याची थांब मिळाली पण आज पावसाळा जाउन हिवाळासुद्धा आहे व उद्याला उन्हाळासुद्धा चालू होणार आहे. आजपर्यंत त्या झोपड्या तेथून हटल्या नाहीत. प्रत्यक्षात त्या झोपड्या वाढत जात आहेत पण हटण्याचे नाव नाही. बघा कदाचित त्याच रस्त्यावर यदाकदाचित ॲक्सीडेंटमध्ये कोणी मेलं तर, त्या रस्त्याने मुलं धावताहेत. त्याचे खापर कोणावर? या महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेवकांवर की, कोणावर? प्रशासन जाणूनबुजून ह्याच्यावर दुर्लक्ष करत आहे. आज बांगलादेशियांचे मोठे मोठे अड्डे भाईंदरमध्ये उभे राहत आहेत. भाईदरमध्ये फक्त एकाच ठिकाणी झोपडपट्टी वाढत नाही. निरनिराळ्या विभागामध्ये झोपड्या आहेत तिथे वाढत आहेत. ह्याच्यावर लक्ष केंद्रीत करायचे कोणी? प्रशासनाने करायचे, लोकप्रतिनिधींनी करायचे, का कोणी? प्रशासन ढिम्म झाले आहे. जरासुद्धा लक्ष देत नाही आणि सत्ताधाऱ्यांचे तर त्याच्या वर लक्षच नाही. अंकुशच नाही. प्रत्येक वेळेला आम्ही त्याच्यावर बोलायचे. या शहरामध्ये अनधिकृत बांधकामे, अनधिकृत झोपडपट्ट्या वाढत आहेत. आज आपण ४० कोटी रूपये खर्चुन जो रस्ता बांधलेला आहे. त्या रस्त्यावर बघा, सगळे टेम्पोवाले, गॅरेजवाले आणि भंगारवाले माल माल टाकुन आहेत. आपण कशासाठी खर्च करतो आहे. नागरिकांचा आपण जो पैसा वापरतो आहे ते कशासाठी? कोणासाठी हे करतो आहे? आपण त्याच्यावर का काय कार्यवाही करत नाही? का फक्त नुसती आश्वासन दिली जातात की, आम्ही कारवाई करु? आज या शहरामध्ये निरनिराळे अड्डे आहेत. आज फक्त नुसते आतंकवाद्यांचे अड्डे तर आहेत. बांगलादेशियांचे अड्डे सुद्धा उभे राहिलेले आहेत. ह्याचा बिमोड करा.

**प्रभात पाटील :-**

सत्ताधाऱ्यांना जे म्हणतात त्याच्यावर माझा आक्षेप आहे. कारण आता सत्ताधाऱ्यांपैकी सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि मी तर या विषयाला धरुन बोललो आणि स्थायी समितीमध्ये टेम्पोंचा विषय.......

(सभागृहात गोंधळ)

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावे.

**रतन पाटील :-**

याबाबत मा. महापौर मॅडमनी रुलिंग दिले होत.

**महेंद्रसिंग चौहान :-**

सत्ताधारी हमेशा विरोध करते है और यह काम सिर्फ शिवसेनेका है। सिर्फ शिवसेना पार्टी अपने हिसाबसे काम करती है। सत्ताधारी हमेशा विरोध करते है।

**रतन पाटील :-**

पण ही वस्तुस्थिती आहे आज आपली आरक्षणे आहेत त्यावर अनधिकृत बांधकाम होत आहेत हे कोणाचे काम आहे.

(सभागृहात गोंधळ )

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आपण हा गोंधळ थांबवा ना.

**मा. महापौर :-**

सन्मा सदस्य रतन पाटील ह्यांनी जे शब्द वापरलेले आहेत ते सचिवांनी कामकाजातुन वगळुन टाकावेत.

**नितीन ठाकुर :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग क्र. ३ मध्ये जिथे आपले कार्यालय आहे तिथे शॉपिंग गाळे काढलेले आहेत. तिथे मेन रोडला महानगरपालिकेचे गाळे आहेत. तिथे शाखा बांधलेली आहे त्याला आपण परवानगी दिलेली आहे का? शिवसेनेने शाखा बांधलेली आहे आणि जेव्हा चार दिवस महानगरपालिका बंद होती तेव्हा त्या शाखेचे बांधकाम चालु होते तर मला माहिती पाहिजे.......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आयुक्त महोदय को लोगो ने शिकायत की, उस जगह पर अनधिकृत काम किया और यही सन्मा. सदस्य रतन पाटील बोले , चौहाण साहब शिकायत मत करीए। हमारा ऑफीस अनधिकृत बन रहा है। और इनको बोलनेका इतना नही आता।

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य महेद्रंसिग चौहाण साहब, आप एक जेष्ठ नगरसेवक है। वहा आपके एक ऑफीस था।

**दिनश नलावडे :-**

सन्मा. सदस्य यह ऐसा । बरोबर नही। एक बाजु यहा बोलने का की इनलिगल बांधकाम तोड दो। एक बाजु बचानेका........

(सभागृहात गोंधळ )

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्यांनी खाली बसावे आणि सभागृहात शांतता ठेवा एका एका सदस्यांनी बोला.

**शुभांगी नाईक :-**

इनको झुठ बोलने की, आदत है।

**नितीन ठाकुर :-**

मा. महापौर मॅडम, जी शाखा बांधलेली आहे........

**महेद्रंसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, मैंने सुबह शिकायत की और शाम तक इनका ऑफीस बन गया यह अनधिकृत नही है क्या?

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, विषय अतिशय चांगला आहे या शहरामध्ये किती झोपडपट्या व्हाव्यात किती कराव्यात हे आता तुमच्या हातात राहिलेले नाही. ह्याच्यामध्ये राजकीय नेतेही गुंतलेले आहेत. मी सरळ आरोप करतो कारण पुढच्या सहा महिन्यामध्ये येणाऱ्या निवडणुकां मध्ये डोळा ठेवुन कोण कार्यालय उभारतो आहे. कोण झोपडपट्या बनवीत आहे. मॅडम आपल्याला एक आठवण करुन देतो. तीन महिन्या पुर्वी एका अनधिकृत कार्यालयाच्या उद्घाटनांसाठी भुमीपुजनासाठी आपण गेला होता. आपल्याला माहित असायला पाहिजे असे अनधिकृत बांधकाम करायला जर एखादा पदाधिकारी गेला, एखादा नगरसेवक गेला तर अनर्थ आहे. डिसक्वॉलिफिकेशन ॲक्टमध्ये ते आहे. आणि त्या सभेमध्ये आम्ही होतो. आमच्य वाचनालयाचे उद्घाटन होते. तुमच्या दुदैवाने तिथे पाच लोक जमली होती. तो वेगळा भाग आहे. तुमच्या ज्योती पार्कमध्ये आमच्या प्रभागामध्ये सन्मा. सदस्य लिला पाटील आमच्य सोबत होत्या. ज्योती पार्कमध्ये आपण आलात आमच्या वाचनालयाचे तिथे उद्घाटन चालु होते आपण आलात आम्ही प्रत्यक्ष पाहिलेले आहे आणि आपण खुप विचारपुर्वक तिथे यायला हवे.होते आणि अजुनही तिथे ते स्ट्रक्चर पडलेले आहे.

**मा. महापौर :-**

भुमिपुजन नव्हते.

**जयंत पाटील :-**

मॅडम, आम्हाला माहिती आहे ना. तिथे काही कार्यक्रम नव्हता. एका अनधिकृत टपरीचे भुमिपुजन होते त्या भुमिपुजनाला आपण ........

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण हे उल्लेख करता ना ते कार्यक्रमासाठी गेले होते. भुमीपुजन मी गेल्यानंतर केले भुमिपुजनाला मी नव्हते.

**जयंत पाटील :-**

कसला कार्यक्रम होता?

**मा. महापौर :-**

तिथे बौध्द पंचायतीचा कार्यक्रम आपल्या त्या बाजुला होतो.

**जयंत पाटील :-**

बौध्द पंचायतीच्या कार्यक्रमाला आम्ही तिथे होता.

**मा. महापौर :-**

त्याच कार्यक्रमाला आपण एकत्र होतो तिथे भुमिपुजन वगैरे काहीच झालेले नाही.

**जयंत पाटील :-**

तिथे चार लोक होती तिथे अनधिकृत बांधकाम झालेले आहे ते तोडण्याचे आपण आदेश द्या. अनधिकृत झालेल्या बांधकाम तोडायला सांगा.

**मा. महापौर :-**

आपण तिथे कार्यक्रमाला एकत्र होतो.

**जयंत पाटील :-**

त्या कार्यक्रमाचे फोटो माझ्याकडे आहेत. आपण तिथे नारळ फोडला.

**लिला पाटील :-**

मॅडम, आपण तिथे भुमिपुजनालाच गेला होता. आमच्या वाचनालयाचे तिथे ओपनींग होते.

**मा. महापौर :-**

आपण ज्याप्रमाणे येथे बोलत आहात आणि जर तिथे भुमिपुजन झाले असेल आणि ते अधिकृत नसेल तर त्याच्य वरही कार्यवाही करु.

**जयंत पाटील :-**

आपण ते तोडण्याचे येथे आदेश द्या.

**मा. महापौर :-**

.त्याबद्दल आयुक्त साहेबांबरोबर चर्चा केलेली आहे त्या विषयावर आयुक्त साहेब स्वतः खुलासा करतील.

**जयंत पाटील :-**

एका ठिकाणी गटारावर आपण म्हणता आमचे कार्यालय आहे ते मंजुर आहे. पण हे कार्यालय तिथल्या श्री. शर्मा नावाचा माणुस त्याचे नाव ही मी आपणाला सांगतो. त्यांने तुम्हाला निमंत्रण केले होते. आम्ही तिथे कार्यक्रमात होतो आणि आम्ही प्रत्यक्ष पाहिले. पाच फुटांवर आपण आमच्या पासुन उतरलात आणि अनधिकृत बांधकामाला आपण अशा पध्दतीने पाठीशी ठेवु नका. त्यामुळे या शहरातले अनधिकृत बांधकाम आपण कसे तोडु शकणार? एका ठिकाणी आपण ते वाचवतोय एका ठिकाणी आम्ही ते करायला लावतोय. एका ठिकाणी आपण झोपडपट्या काढुन टाका. कोणाचे पायबंद करु नका. येथे संपुर्ण पणे बिजनेस चालु आहे. एका ठिकाणी व्यापारी करण चालले आहे. कोणीतरी जागा विकतो कोणीतरी झोपड्या विकतो दुसरीकडे सहा महिन्यात येणाऱ्या निवडणुकीकरिता आम्ही आमचा मतदार संघ तयार करतो. या शहराचे काय करायचे हे सांगायला आम्हांला अभिमान वाटला पाहिजे. आम्हांला ठाणे करायचे आहे की, भिंवडी करायचे आहे. आपण हे ठरवा आम्हाला माहिती आहे की, साहेब, टी. चंद्रशेखर बनु शकणार नाही. पण थोडेसे जवळपास जायला त्यांना काय हरकत आहे? थोडेसे जवळपास जाउ द्या ना. या शहरात सुंदर बगीचे व्हावे, श्वास घ्यायला तरी लोकांना जागा ठेवा. हे काय चालले आहे. सगळा गोंधळ चालु आहे. मला वाटते अतिक्रमण विभाग बंद करण्याची वेळ आलेली आहे. आम्ही अतिक्रमण विभागाकडे तक्रार केल्यानंतर ही कूठल्याही तऱ्हेने हालचाल होत नाही.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, श्री. शर्मा नावाचा तोच गृहस्थ तिथे राष्ट्रवादीचा ऑफीस झालेले आहे आणि राष्ट्रवादीचे तिथे पैसे खर्च करुन झालेले आहे. पण तोच गृहस्थ आज ते ऑफीस विकायला निघालेला आहे दिड लाखात बांधले आणि आठ - नउ लाखात विकायला निघाला आहे या विषयावर सभागृह नेत्यांबरोबर माझे सकाळी बोलणे झालेले आहे. अशा लोकांना तुम्ही जवळ कशाला घेता? आणि विशेष म्हणजे सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांचा तो खास माणुस आहे.

**मा. महापौर :-**

सभागृहात शांतता ठेवावी. सन्मा. सदस्यांनी लक्षवेधीवर बोला.

**हंसुकूमार पांडे :-**

मा. महापौर मॅडम, यह जो ऑफीस के बारे मे बातचीत चल रही है की, अनधिकृत - अनधिकृत तो वह वाकही मे अनधिकृत है। इसका सर्व्हे श्री. अजित पाटील साहबने किया। प्रभाग समिती के कम्प्लेंट के उपर सर्व्हे किया और उन्होंने एकबार जाकर तोडा। दुसरी बार जिसने यह ऑफीस बनाया उस लेडीने श्री. अजित पाटील को फोन लगाकर दिया और बोला ले तेरे बाप से बात कर तो मै सुनना चाहता हु अजित पाटील साहब से की उनका बाप कौन है? उन्होंने किसको फोन लगाकर दिया? मैं अधिकारी साहब को पुछना चाहता हुँ की, उन्होंने जो शब्द प्रयोग किया उस वक्त हमारे लोग वहा मौजुद थे। वह बोल रहे है की, ले तेरे बाप से बात कर तो उनका बाप कौन है? ऐसे बोलके चलता है क्या? और अधिकारी चुपचाप वहा से निकलकर आए वह किसका फोन था और किसके दबाव के निचे आजतक उसपर कार्यवाही नही हुई। मै मानता हु, वह लोग मा. महापौर साहेबा के साथ घुमते है उसके खास है, राष्ट्रवादी के खास है लेकिन इस तरीके का धंदा करना यह उचित नही है। यह ऑफीस आज राष्ट्रवादी पॅनल के निचे बनाया गया। कल उठकर इसको गाला बनाकर बेच दिया जाऐगा। तो क्या यह आपको अच्छा लग रहा है क्या? शहर का विकास थम रहा है। गटर मे जो नाले साफसफाई होने के लिए रस्ते नही है। सन्मा. सदस्य असिफ शेख ने जाकर वहापर सर्व्हे कर आए। आपके सन्मा. नगरसेवक आसिफ शेख यह प्रभाग समिती के अध्यक्ष थे उन्होंने जाकर सर्व्हे कर आए थे मा. श्री. गिल्बर्ट शेट के बोलने से उसके बावजुद यह चीज तुटी नही हमने उसका पहिले का फोटोग्राफ निकालकर दिखाया।उसके बावजुद कमिश्नर साहब ने उसपर ॲक्शन नही लिया। कमिश्नर साहब बोलते है की, मै बिझी था। उनके कुछ फॅमिली प्रॉब्लेम थे। वह भी मै मानता हु। पर जब इस तरीके से वक्तव्य किया जाता है की, तुम्हारे बाप से बात करो तो यह दादागिरी की बात सन्मा. अधिकारी के साथ मे हो गयी है तो फिर अधिकारी काम कैसा कर रहा है। अधिकारी को बताना चाहिए इस बात की पुलिस कम्पेंट होनी चाहिए की हमारे उपर ऐसा ऐसा किया हमको अधिकारी को चप्पल से मारनेके लिए लोग दौडते है ऐसा क्यो? जब गलत होता है फिर भी पार्टी के बॅनर के निचे ऐसा गलत काम किया जाएगा तो कैसा होगा? अधिकारी काम कैसे करेंगे?

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब एका अधिकाऱ्याला तर मारलेले आहे. मग काम कोण पाहणार आहेत?

**चंद्रकांत वैती (मा. उपमहापौर सो. ):-**

मा. महापौर मॅडम आणि सन्मा. सभागृह सन २००० च्या जनगणनेनुसार या शहरातील या शहरातील झोपडपट्ट्यांची संख्या होती २७ आणि लोकसंख्या होती ३७,५०० आज या झोपडपट्टीची संख्या ३० झालेली आहे आणि लोकसंख्या दिड लाखाच्या घरात गेलेली आहे. आयुक्त महोदय सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेता मा. महापौर मॅडम, आपण आदेश द्यावे. व आयुक्त महोदय यावर निश्चितच कार्यवाही केली पाहिजे. श्री. अजित पाटील सारखा सक्षम अधिकाऱ्यावर आरोप होत आहेत. अधिकाऱ्यांना आणि सभागृहाला माझी विनंती आहे की, झोपडपट्ट्यांवर आता सध्या जे अतिक्रमण चालु आहे. नविन झोपडपट्ट्या बनत आहेत त्यावेळी अतिक्रमणचे पथक कारवाई करायला गेल्यावर माझे असे मत आहे की, प्रत्येक नगरसेवकांने असा एक दंडक पाळायला पाहिजे या शहराचे भवितव्य मला बनवायचे आहे. आपण कोणीही त्याच्यामध्ये इंटर फेअर करु नये आणि आयुक्त महोदय सभागृहातील सर्वाची भावना लक्षात घेता जर कदाचित ही मिटींग सकाळी सुरु झाली असती तर अजुन पर्यंत हा विषय संपला नसता. एवढ्या गंभीर विषयावर चर्चा चालु आहे. आयुक्त महोदय, आपण या विषयी निश्चितपणे धोरण जाहिर करावे आणि आजच्या मा. महासभेसमोरच धोरण जाहिर केले तर सर्व सभागृह आपला आभारी राहिल.

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर साहेबा, यह जो मेरी लक्षवेधी है, यह एक तो झोपडो का विषय है और जैसे सन्मा. सदस्य हंसूकूमार पांडेजी इन्होंने जो बोला की, सामनेवाला दादागिरी करके बोलता है की, तेरे बाप से बात कर '' वही बात मेरे साथ हूई है। कमिश्नर साहब भी इस बात के गवाह है। जेसल पार्क चौपाटी आज भाईंदर पूर्व की शान है। वहापर एक बिल्डर व्दारा कलेक्टर की जगह को अतिक्रमण किया गया। उसकी मैंने पहिले ही दिन कम्प्लेंट की, आयुक्त साहब भी जानते है लेकिन उसकी कम्प्लेंट के बावजूद भी वह काम क्यो होता है। आज यह प्रशासन आयुक्त विभाग किसके दबाव मे काम कर रहे है? मैं इसबात की जानकारी चाहता हू। कम्प्लेंट करनेके बावजूद भी कार्यवाही क्यो नही होती है और कैसे होगी? इसका जवाब दिया जाए?

**हंसूकूमार पांडे :-**

साहब, ऐसे जगह पर टॅक्स लगाया जाता है जहापर ना कोई माँ है ना बाप है। वह टॅक्स अधिकारी कौन है? अधिनियम १९५६ के अनूसार उसके उपर कारवाई की जानी चाहिए और मैं तो बोलता हू की, ऐसे अधिकारी को सस्पेन्ड किया जाए जो पैसे खाकर टॅक्स लगाते है।

**मदन उदितनारायण सिंग :-**

मा. महापौर महोदया, यह जो चौपाटी पर सेठ बिल्डरव्दारा अतिक्रमण की बात कर रहा हू। उस जगहपर चार साल पहिले दिवार बनायी गई थी और उसको तत्कालिन उपायुक्त श्री. शिवमूर्ती नाईक साहब ने तोडा था। अगर श्री. शिवमूर्ती नाईक साहबने यह बांधकाम तोडा तो क्या वह गलत थे। आज के अतिक्रमण विभाग या कमिश्नर सही है। आज वह सही है या गलत है इसका जवाब मुझे दिया जाए और अगर सही है तो उसपर कारवाई कब होगी इसका मुझे जवाब दिया जाए और अगर सही है तो उसपर कारवाई कब होगी इसका मुझे जवाब दिया जाए। यह अतिक्रमण हो रहा है तो वह क्यो हो रहा है। इसपर कारवाई कब होगी?

**मा. महापौर :-**

संबंधित लक्षवेधी सन्मा. सदस्य मदनसिंग ह्यांनी मांडलेली आहे आणि या अतिक्रमण विषयावर सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता यावर लवकरात लवकर कारवाई झाली पाहिजे असे पडसाद सभागृहातून मागणी झालेली आहे. त्या संबंधित आयुक्त महोदयांशी चर्चा केल्यानंतर त्यांनी सांगितले की, उद्यापासूनच झोपडपट्टीवर कारवाई केली जाईल. शहरातील जे अतिक्रमण आहे. जे आरक्षण आहे म्हणजे सोमवार ऑफिशियली दिवस सोमवार पासून या विभागामार्फत ज्या ज्या ठिकाणी झोपडपट्टी वाढलेली आहे ती अनधिकृत आहे. अशा झोपडपट्टीवर कारवाई केली जाईल आणि अतिक्रमण वाढलेले आहेत. अशा अतिक्रमणावर कारवाई करुन आपल्याला आठ दिवसामध्ये ह्याचा रिपोर्ट मिळेल.

**मदनसिंग :-**

मा. महापौर मॅडम, मैं यह जानना चाहता हू की, अगर कही अतिक्रमण हो रहा है। हमलोगों ने कम्प्लेंट किया उसके उपर भी कारवाई नही हो रही है तो हमको क्या करना चाहिए। इसका जवाब दो। हम क्या लेटर डालते रहे और लक्षवेधी लाते रहे और लाकर घरमें जाकर सो जाए। क्या करना चाहिए और अतिक्रमण विभाग क्या करेगा? अतिक्रमण विभाग सक्षम है या नही? या आयुक्त सक्षम है या नही, अतिक्रमण को तोडने के लिए। यह लक्षवेधी लाने का मतलब क्या? इसको तो फाडकर फेक देना चाहिए अगर कारवाई नही हूई तो।

**मा. महापौर :-**

आपल्या लक्षवेधीवर रुलिंग दिलेले आहे त्याच्यावर कारवाई होईल आपण ते प्रत्यक्ष बघा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम,

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपल्या सर्वांना चचा्र करण्याकरिता वेळ दिलेली आहे. आपण बसून घ्या. सचिवांनी पुढील विषयाला सुरूवात करा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी यावर एक शब्द ही बोललेलो नाही.

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम, आज आपल्या सभागृहापुढे मा. उपमहापौर वैती साहेब बोलले की, हा वेळ जर सकाळपासून मांडला असता तर हा विषय संपला नसता. आपल्या समक्ष सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलले की, तिथे इललिगल काम चालू आहे. आमच्या प्रभागमध्ये तर झोपडपट्या झाल्या आहेत. गटारावर ऑफीस बनत आहे. सर्वांच्या समस्या आहेत. सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब बोलले की, २५ झोपडपट्या होत्या आहेत तिथे आज २०० झोपडया झाल्या आहेत. आपल्यासमोर सन्मा. सदस्या प्रभात पाटील ह्यांनी सांगितले की, बांग्लादेशमध्ये आज त्या रोडची अशी हालत आहे की, आम्ही जेव्हा फ्लाय ओव्हर ब्रीजवरून काशिमिरापासून येतो त्यावेळी आम्हाला एकदम आनंदी आनंद होतो. पण त्या रोडमधून जाताना मात्र फार विचित्र होते. मुलं ॲक्सीडेंटमध्ये त्याठिकाणी जाऊ शकतात. अशी अवस्था याठिकाणी आहे. मा. महापौर मॅडम, आपण अशी कडक ऑर्डर द्या, ह्या शहरासाठी आणि तुमच्या आमच्यासाठी की ही महानगरपालिका आणि हे मिरा भाईंदर शहर स्वच्छ आणि सुंदर राहण्यासाठी आपण फक्त बाहेर बोर्ड लावतो. झाडे लावा, झाडे जगवा. सुंदर भाईंदर, स्वच्छ भाईंदर. पण आपण जर अशापद्धतीने राहिलो तर स्वच्छ आणि सुंदर भाईंदर हे होऊ शकत नाही. धारावी होण्यासाठी हे पाच वर्षे भरपूर होतील म्हणून आपण स्ट्रीक ऑर्डर आपल्या अधिपत्याखाली द्या की ह्या झोपडपट्या आणि इललिगल काम ह्यापुढे कोणाच्याही दबावाखाली न होता हे शहर आपल्या नेतृत्वाखाली चांगले राहावे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, फक्त गोष्ट विचारतो हे झाले अनधिकृत बांधकाम, रस्त्यावर तबेला आहे ते कोणाच्या अधिकारामध्ये आहे. अतिक्रमणाच्या की, दुसऱ्या कोणाच्या डिपार्टमेंटमध्ये हा मा. महासभेमध्ये विषय झाला. रस्त्यावर सात गाई रोज बांधतो आणि आमच्या प्रभागाचे अध्यक्ष तिथे गेले की ते स्वतः बघतात. मग ते अतिक्रमण कोणाच्या अधिकारामध्ये येते? मी ज्यावेळेला कम्प्लेंट केली तर त्या गाईंची जबाबदारी कोणीही घेत नाही. ते भर रस्त्यामध्ये आहे. ते कोणाच्या अधिकारामध्ये येते?

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी मांडलेल्या वेगवेगळया सुचनांवर सोमवार पासूनच कारवाई करण्यांत येईल.

**ओमप्रकश अग्रवाल :-**

मॅडम, पण तबेल्याबाबत सांगणार की तो माझा अधिकार नाही आणि तो सांगणार माझा अधिकार नाही. रस्त्यावरचा तबेला कोण बघणार? गाई पकडण्याचे काम आहे, आरोग्य खात्याचे. अतिक्रमण हटविण्याचे काम आहे अतिक्रमण विभागाचे. मग गाई उचलल्यानंतर अतिक्रमण हटते की, अतिक्रमण उठल्यानंतर गाई हटणार.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या प्रशासनाकडून एक पत्र आले होते त्याला पंधरा दिवस किंवा एक महिना झाला असेल. महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्याकरिता तुमच्याकडे काही स्त्रोत असतील किंवा काही विषय असतील तर सांगा. कमिशनर साहेब, आपल्याला सुद्धा मी माझ्या वतीने सांगते की, ह्या संपूर्ण शहरामध्ये रिक्षावाल्यांचे जेवढे गॅरेजेस आहेत त्यांचे मासिक भाडे आपण फिक्स करा. तर आपल्या उत्पन्नाचे स्त्रोत एकदम उंचावून जाईल की, आपल्या जकातीचा प्रश्न पडणार नाही की, जकात आपल्याला बंद करावी, इतका आपला स्त्रोत वाढेल. त्यांच्यावर आपण काहीच कार्यवाही करत नाही तर त्यांच्यावर मासिक भाडे लावून उत्पन्नात भर करता येईल. पाच मिनिटांवर गॅरेजेस आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मॅडम, भूईभाडे वसूल होत नाही आणि तुम्ही उत्पन्नात काय वाढ करणार आहात?

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, संभ्रमात आहेत. मी महापौरांना धन्यवाद देतो.

**लिओ कोलासो :-**

साहेब, आमचे ऑब्जेक्शन आहे. मा. महापौर साहेबा संभ्रमात आहेत ह्या गोष्टीला आमचा आक्षेप आहे.

**रोहिदास पाटील :-**

आक्षेप आहे. ठिक आहे. मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, तुम्ही एक संधी घालवली. सन्मा. नगरसेवक एस.ए.खान साहेब ही होते. सुंदर सत्र होते. केंद्राकडून आले होते. आपल्याला आमंत्रण दिले होते. आपण एक ही अधिकारी पाठविला नाही. गांधी सेंटरच्या कार्यक्रमाला आम्ही तुम्हाला विनंती केली.

**मा. आयुक्त :-**

माझी अडचण होती असे मी तुम्हांला सांगितले होते.

**रोहिदास पाटील :-**

मी, याच्यासाठी विषय आणला की, आयुक्त साहेबांकडचे सरक्युलर सगळ्या अधिकाऱ्यांकडे गेले होते. पण कोणीही अधिकारी आला नाही. आम्ही कसे बरे बोलायला लागलो तर तेही बरे बोलले असते ना. मॅडम, बऱ्या बोलतात. मी ही बरा बोलतोय.

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११० चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

पान क्र. ४७ माझे वक्तव्य ४६ वरून ४७ वर आले आहे. त्यामध्ये जे आपण बोलत रहाल त्या स्वतःच्या निर्णयावर बोलतात तिथे बोलत रहाल असे पाहिजे. आपण ठाम रहाल अशी आपल्याला विनंती आहे. त्यानंतर क्रिमीनल प्रोसिजरच्यामध्ये क्रिमीनल प्रोसीजरनुसार त्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे असे माझे वक्तव्य होते. क्रिमीनल प्रोसिजर कोड. पान क्र. ५२ वर माझ्या नावासमोरच त्या समितीमध्ये कोण असणार? जर चुका करणारे असतील तर ते योग्य ॲक्शन व निर्णय घेणार नाही. सॅक्शन लिहिले आहे तिथे ॲक्शन करावे व पान क्र. ५३ मध्ये माझ्याच वक्तव्यामध्ये जर विषयाची वाट लावायची असेल तर समिती नेमायची, कुठला विषय सोडवायचा नसेल तिथे असेल झाले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

पान क्र. ६१ मध्ये सेकेंड लास्ट लाईनमध्ये हायकोर्ट आले आहे तर तिथे जिल्हा न्यायालय असे पाहिजे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

पान क्र. ४३ मध्ये १ करोड असे आहे.

**रिटा शाह :-**

पान क्र. ९७ मध्ये त्याच्यामध्ये मागच्या मा. महासभेमध्ये सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी ह्यांनी गोकूल व्हिलेज ते चौकाला लिटर फ्लॉवर द्यायचे असे सुचविले होते ते ह्याच्यामध्ये आलेले नाही. सन्मा. सदस्य शशिकांत शाह ह्यांची ही सुचना होती ती ही त्याच्यामध्ये इनक्यूड करुन घ्यावी.

**शशिकांत भोईर :-**

त्याचप्रमाणे त्या ठरावामध्ये माझी सुचना आहे की, आमच्या नर्मदा कुंज बिल्डिंग ते नाकोडापर्यंत आम्ही गटारावर गार्डन बनविलेले आहे. कुंद म्हणून त्याचे नामकरणाचे नाव दिलेले नाही. नर्मदा महादेव म्हणून गार्डनचे नाव लिहायचे आहे हे नमुद करून घ्यावे.

**रोहित सुवर्णा :-**

नगरसचिवजी पान क्र. ९६ मध्ये सिरीयल नं. १० बघा. त्याठिकाणी अमर मौलाना अबूल नाही तर अब्दूल असे पाहिजे. मौलाना अब्दूल कलाम आझाद मार्ग असे पाहिजे आणि तसेच १७ वर भारत रत्न सरदार वल्लभभाई पटेल मार्ग असे पाहिजे. फक्त सरदार मार्ग नाही. तसेच २४ वर बिरला... असोसिएशन मार्ग असे पाहिजे.

(सन्मा. सभागृहनेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. ११० च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**परशूराम पाटील :-**

या ठरावाला माझे अनूमोदन आहे.

**एस. ए. खान :-**

सचिवजी मी देखिल याबाबत पत्र दिले होते तेही यामध्ये घेण्यात यावे.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, जे पहिलेच पान आहे. आयुक्तांकडील पत्र व्यवहार तो आपण निरंक लिहिलेला आहे. पण जिल्हाधिकारी कार्यालयातून दि.११/०१/०७ ला आयुक्तांकडे जमिनीच्या हस्तांतरण संदर्भात एक पत्र आले आहे. हॉस्पिटलच्या जागेच दि. ११/०१/०७ ला पत्र आलेले आहे. मी तिकडची पोच बघितली आहे. त्या महत्त्वाच्या निर्णयाचे आणि आयुक्तांना आलेल्या पत्राचा येथे उल्लेख का नाही?

**नगरसचिव :-**

पुढच्या वेळेला ते पत्र येणार. याबाबत मघाशी चर्चा झाली.

**मिलन म्हात्रे :-**

आपण या २० तारखेपर्यंत पत्र दिली पाहिजेत.

**नगरसचिव :-**

पण, माझ्याकडे ती आलीच नाही ना.

**मिलन म्हात्रे :-**

ते तुम्ही इंटरनल बघा ना. मी दि. ११/०१/०७ चे सांगत आहे. म्हणजे सात दिवस झाले. जिल्हाधिकारी कार्यालयातूनच आपल्या महानगरपालिकेला ११ तारखेला पत्र सुटले ते येथे १२ किंवा १३ तारखेला आले असेल. तुमच्याकडे ते पाच दिवस अगोदर आले असेल ना.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून माझ्याकडे आलेले नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांनी तुमच्याकडे ते दिले पाहिजे. ते तुम्ही बघा आणि याबाबत मला माहिती आहे व तुम्ही सरळ निरंक लिहिता. त्याबद्दल आपण काय करता ते बोला आणि ह्याचा निर्णय द्या व नंतर इतिवृत्तांला मंजूरी द्या. त्या न्यायालयीन बाबीला थोडे घाबरा. येथे सर्व वाचवतील तिथे कोण नाही. तिथे सर्व टांगवतील. उल्हास नगरच्या आयुक्तांचा पगार बंद झाला हे माहित आहे ना. थोडेसे सिरीयसली घ्या.

**उमा सपार :-**

सचिवजी नूपूर नगर मार्ग म्हणून आमच्याकडे अजून झालेले नाही. पत्र ही दिलेले आहे.

**एस. ए. खान :-**

सचिवजी माझे ही पत्र दिलेले आहे. इमाम नगर चौकचे दिले होते ना.

**मिलन म्हात्रे :-**

आयुक्तांच्या नावाने ११ तारखेला आपल्याकडे पत्र पाठविले. मी जिल्हाधिकारी कार्यालयात तिथला जावक नंबर बघून आलेलो आहे. तुम्ही तुमचे रजिस्टर चेक करा. कारण जिल्हाधिकारी आयुक्तांच्या नावाने पत्र पाठवलेले आहे.

**दिपक खांबीत :-**

शासकिय परिपत्रक आणि शासन जी.आर एवढेच पत्र घ्यायची असतात.

**मिलन म्हात्रे :-**

असे कसे? आयुक्तांची पत्रे म्हणून येथे दिलेले आहे. आयुक्तांकडील पत्र आणि कामकाज. मग ते कामकाज आणि पत्र नाही का? तुम्ही जी.आर. असे लिहा आणि उद्या महत्त्वाचे एखादे पत्र आले तर तुम्ही सभागृहाला दाखवणार नाही का? हे आता प्रतिनियुक्तीसाठी येथे चार तास गोंधळ झाला होता ते तुम्ही दाखवणार नाही का? असा कोणता नियम बोलतो की, आयुक्तांना आलेले पत्र हे गोपनिय आहे व ते सभागृहाला दाखवायचे नाही. तुम्ही काहीतरी फाटे फोडू नका व निराळा विषय आणू नका. आयुक्तांना आलेले जे पत्र आहे त्याचा तुम्ही ह्याच्यामध्ये उल्लेख करुन घ्या. जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्तांना ११ तारखेला पत्र दिलेले आहे त्याच्यावर जे श्री. मुंडे म्हणून चिटणीस आहेत. त्यांची खाली काउंटर सिग्नेचर आहे व ते पत्र ११ तारखेला आपल्याकडे पाठवले आहे. मी ती पोच बघून आलेलो आहे. त्या पत्राचे फक्त बोला. त्याचा खुलासा करा आणि ते पत्र नसेल तर त्याचा विषयपत्रिकेत उल्लेख करून घ्या. दि. ११/०१/०७ जमिनीच्या हस्तांतरणाबाबत आणि नसेल तर नाही म्हणून सांगा. म्हणजे मग जिल्हाधिकाऱ्यांकडून काय करायचे आहे ते मी करतो.

**मा. आयुक्त :-**

सन्मा. सदस्य आयुक्तांकडील पत्रे व कामकाज याठिकाणी निरंक आहे. तर आपण केलेल्या सुचनेप्रमाणे जमिन हस्तांतरणाचे जे पत्र हॉस्पिटल संदर्भात आलेले आहे. हे कामकाजात घेतले जाईल.

**प्रकरण क्र. ११० :-**

दि. १२/१०/२००६ रोजीच्या मा. महासभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ८६ :-**

दि. १२/१०/२००६ रोजीच्या मा. महासभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १११ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सदर विषयी मला असे वाटते की, मागच्या मा. महासभेत आपण तीन महिन्याचा ठराव वार्डनिहाय साफसफाईसाठी दिलेला आहे. मग आता परत परत ते विषय आणणे योग्य नाही आणि घनकचऱ्याचा जो विषय आपण आणलेला आहे त्याबद्दल मी बोलू इच्छिते की, घनकचरा प्रकल्प आपल्याला

राबवायचा आहे आणि सुरू ही करायचा आहे व संपवायचा ही आहे. परंतु, घनकचरा प्रकल्पासाठी आपण गाडी कुठून आणणार? गाडी कोण घेणार? गाडीचा खर्च किती? ठेकेदाराला किती खर्च येणार ते सर्व व्याप करायची आपल्याला गरज नाही. आपण सरळ टेंडर काढा. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानूसार ज्याच्याकडे इक्वीमेंट असेल, तयारी असेल तो भरणार आहे. मला वाटते ह्या विषयाकरिता आपण टेंडर काढायला पाहिजे होते. आपण ह्याच्यामध्ये ठेकेदाराला किती खर्च येणार? गाडीभाडयाला किती पैसे लागणार? आपण सर्वांनी तोच व्याप घेतलेला आहे. आपण कशाला ठेकेदाराची चिंता करायला पाहिजे.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, मागच्या मा. महासभेमध्ये सदर विषयी सभागृहामध्ये चर्चा झाली. त्यावेळेला सदर बाबतीमध्ये संकल्पचित्र तयार करून परिपूर्ण प्रस्ताव मा. महासभेसमोर आणावा असे या सभागृहाने त्यावेळेला ठरवलेले होते. मला असे वाटते की, सन्मा. सदस्या रिटा शाह ह्याचे वक्तव्य थोडेसे डिफर होत आहे. त्यावेळेला हेच सदस्य ह्याच बाबतीमध्ये त्यांनी चर्चा केलेली आहे.

**रिटा शाह :-**

मी आज ही बोलते की, संकल्पचित्र तयार करणे हे बरोबर आहे. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार संकल्पचित्र सहा वर्षापूर्वीच तयार झालेले होते. परंतु, ते संकल्पचित्र करताना जो कोणी टेंडर घेणारा आहे त्याला संकल्पचित्राचा व्याप करायचा आहे. त्याला किती खर्च लागणार? लॉरी कुठून आणणार आणि बंद कसे होणार तो व्याप आपल्याला नाही आणि खर्चाची त्याची तयारी असेल तर तो टेंडर भरेल. संकल्पचित्राचा अर्थ असा नाही. आजही मी बोलते, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार संकल्पचित्राच्या अनूसार हा घनकचऱ्याचा प्रकल्प आपल्याला राबवायचा आहे. परंतु, टेंडर भरणार तो सक्षम आहे की नाही तो त्याचा व्याप आहे. तो आपला व्याप नाही.

**धनराज अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, प्रभाग निहाय साफसफाई व घनकचरा व्यवस्थापन करण्यास कामास मंजूरी देणेबाबत. मागच्या सभेला आपण डिसकस केले होते. परंतु, जर आपण आकडेवारी बघितली तर सन २००३ मध्ये आपले तीन करोड चार लाख रुपये साफसफाईसाठी लागत होते. सन २००३-०४ मध्ये ५ करोउ ४० लाख रुपये होते. सन २००४-०५ मध्ये साडे सहा करोड होते. सन २००५-०६ मध्ये ९ करोड ७६ लाख रुपये झाले. झपाटयाने अमाऊंन्ट एकदम वाढत गेले आहे. आपला महानगरपालिका क्षेत्र ७९ चौ.कि.मी. एवढाच आहे. थोडेसे बांधकाम वाढले आणि वस्ती वाढलेली आहे. पण साफसफाईचा ठेका एकदम जास्त १० करोडच्या वर जाणे हे चुकीचे आहे. आता घनकचरा व्यवस्थापनसाठी होणारा खर्च ही तुम्ही ६ करोड ७९ लाख रुपये म्हणजे ५ करोड रुपये तुम्ही ह्याच्यामध्ये एक्स्ट्रा आणले. १० करोड प्लस ५ करोड रुपये म्हणजे १५ करोड रुपये गेले. म्हणजे काय तर हे लुटायचे काम चालले आहे. ह्यांनी जे जिथे सांगितले की, जे.सी.बी खरेदी करणेकरिता ७ लाख ३४ हजार रुपये आणि लोन पेमेन्ट तो कसा करेल हे आपणच बघत आहोत. एकूण वाहन-२, वार्षिक खर्च आपण बघतो १४ लाख रुपये म्हणजे एक वर्षामध्ये लोन फिटला पाहिजे म्हणजे आपण ठेकेदाराची तरफदारी करतोय ते लोन कसे फिटणार? तो कसा करणार? गर्व्हमेंटने जी ठेका पद्धत चालू केली ते चांगल्या कामासाठी, स्वस्थ कामासाठी पण आपल्या अधिकाऱ्यांना चांगले काम नको आणि जास्तीत जास्त महागात काम कसे होईल याचा प्रस्ताव आणलेला आहे. जर आपण इथे बघितले तर आपले अधिकारी लिहितात की मूळ वेतन कंत्राटाचे मासिक वेतन, विशेष भत्ता, तासानुसार निर्गमित केलेले विविध भत्ते, भत्ते जे आहेत त्याची काय जरुरत आहे? कॉन्ट्रक्टरला आपण भत्ते देतो का? मिनिमम वेज्स दिले पाहिजे हे आम्हाला मंजूर आहेत. पण कॉन्ट्रक्टरचं भत्ते आपण देतो का? येथे भत्त्याचेही ९४० रुपये लिहून घेतलेले आहेत. एकूण वेतन जे ४,४३१ रु. आपल्याला द्यायचेच आहे. मग महानगरपालिकाच कर्मचारी ठेवत नाही. कॉन्ट्रक्टरला देवून काय फायदा? जर महानगरपालिकेने पूर्ण वेतनच द्यायचे आहे तर महानगरपालिका आपला कर्मचारी ठेवू शकतो ना. हमलोग कॉन्ट्रक्ट क्यों देते है। क्योंकी हमको सस्ता काम चाहिए। इसलिए हमलोग कॉन्ट्रक्ट देते है। यहाँपर जो जितना भी विषय लाया है। कॉन्ट्रक्टरको ज्यादा से ज्यादा फायदा होगा उसके लिए विषय लाया गया है। इसलिए मैं आपको, यह जो ठराव है, वह तीन साल का ठराव गलत है। हमलोग एक साल के प्रस्ताव को इसका समर्थन करेंगे और वह भी कम बजेट मे टेंडर निकालके एक साल का प्रस्ताव लाया जाए।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सदर प्रभाग निहाय साफसफाई....

(सन्मा. सदस्य श्री. धनराज अग्रवाल ह्यांनी प्रकरण क्र. १११ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमलोग पहिले चर्चा तो कर ले ना। आपको मौका दिया, पर हमलोगोंको तो मौका भी नही दिया।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज तक ऐसा ही हूआ है।

(सभागृहात गोंधळ)

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पहिले चर्चा होने दिजीए। ठराव पढनेकी क्या जरुरत है। हमको पहिले चर्चा मे तो भाग लेने दो।

**शिवप्रकाश भुदेका :-**

साडे चार वर्ष से हमलोग यह तो चिल्ला-चिल्लाकर बोल रहे है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी चर्चा झाल्यानंतर आपण ठराव मांडा. आपण बसा. ठराव मांडा.आपल्याला वेळ दिला जाईल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आज नविन पद्धत कशी आली?

**मा. महापौर :-**

नेहमीचीच पद्धत आहे. आपण बसून घ्या.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आतापर्यंत आम्ही बोंबाबोंब करायचे की, ठरावावर चर्चा करु दया आणि आज नेहमीचीच पद्धत झाली.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, नेहमी सभागृह नेते ठराव वाचतात आणि अनुमोदन दिले जाते.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह जो सब्जेक्ट है इसके बारे मे मैं कहता हू, आप सुनिए, शहर को इसकी बहूत बडी आवश्यकता है। फिलहाल मैं आपके नोटीस मे ला दू। अभी सभी कॉन्ट्रक्टर को दो महिने से पगार नही मिला है। अगर शहर मे पंधरा दिन साफसफाई न होगी तो यह जो ज्यादा बोलनेवाले लोग है क्या इनको दिखाई दे रहा है की, कॉन्ट्रक्टरको ज्यादा फायदा हो रहा है। यही नगरसेवक...

(सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल ह्यांनी प्रकरण क्र. १११ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**शिवप्रकाश भुदेका :-**

अनुमोदन है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

इनको ही परेशानी भुगतनी पडेगी। अभी दो महिने जो किसी भी कॉन्ट्रक्टर के कर्मचारी को पगार नही मिला है।

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल ह्यांनी मांडलेल्या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

पगार क्यो नही मिला इसको रिझन है। आपके बजेट मे प्रोव्हिजन नही है। कही ना कही इनको पैसा नही मिल रहा है। लेकिन पिछली मिटींग मे जो बात तय हूई थी के, हम इनके लिए सुधारित उनकी गाडीया किस तरह की है, उनको किस तरह से दुसरी जगह जो काम हो रहा है घनकचरा का वह यहा कैसे लाया जाए। गाडी की डिझाईन क्या हो? इसका एक प्रस्ताव इस मिटींग मे लाया जाए। अगर यह मंजूर है या नही मंजूर है। तो उसके उपर चर्चा की बात है। ठराव तो आप कभी भी ला सकते है।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य चौहाण साहब बोलते है की, चर्चा किजीए तो हमलोग साडेचार साल से यही बोल रहे है की, चर्चा करो। पर एकबार भी चर्चा करनेके लिए तयार नही है। सौ चूहे खाकर बिल्ली हज करनेको जा रही है, उसी तरह चर्चा करो ऐसा यह बोलते है।

**महेंद्रसिंग चौहाण :-,**

मॅडम, साफसफाई कर्मचारी का मूळ वेतन उसका जो मूळ वेतन है वह ४,४३१ रु. है। अगर जो अधिकारी बढ गएवह कमसे कम इस बात की खात्री करे को ४,४३१ रु. क्यों नही मिलता है? उसको उतना पैसा मिलना चाहिए और दुसरा जो गोषवारे मे दिया है गोषवारे मे जितने कर्मचारी दिए है वह कर्मचारी मस्टर रोल पे होने चाहिए। यह कर्मचारी वॉर्डवाईस है वह १,७४६ कर्मचारी है। इनकी मस्टर रोलपर सही हाजरी होनी चाहिए। दुसरा जो १० करोड २१ लाख २२ हजार १४३ रु. उनके मूळ वेतन के हिसाब से इतना पैसा कर्मचारी को मिलेगा। तो आपका शहर स्वच्छ रहेगा। तिसरी बात, १४० वाहन तो १४० वाहन है क्या? या १४० चक्कर लगाते है। १४० की संख्या होनी चाहिए वह कौनसे साल का मेक है, कौनसे इयर का है। यह तो नही के २० साल पुराना लाकर आपके रोडपर चला रहे है। १४० वाहन होना चाहिए। वाहन के उपर कर्मचारी १४० है। एकूण वाहन ७० है। कम से कम टेम्पो या ट्रॉली या आपने जो नए वाहन लिए है इसका जो डिझाईन दिया है वह इस हिसाब से होना चाहिए। शहर के स्वच्छता का प्रश्न है। कोई मजाक नही है। जो डिझाईन दी है डम्पर स्टाईल से जो डिझाईन दी है यह चीज आनी चाहिए। मेरे कहनेका तात्पर्य यह है की, शहर को स्वच्छ रखना आवश्यक है। इस तरह की, हमलोग गहन चर्चा करे। कर्मचारी को कम से कम ४००० रु. मूळ वेतन मिलना चाहिए।

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. १११ व प्रभाग निहाय घनकचरा व्यवस्थापन करणेबाबत मंजूरी देणेबाबत. खाजगीकरणातून प्रभाग निहाय साफसफाई करणेबाबत आपल्याकडे जो घनकचऱ्याचा विषय व व्यवस्थापन असे दोन विषय आलेले आहे. सदर विषयाबद्दल वॉर्डनिहाय साफसफाई करणेबाबात एक वर्षाची मंजूरी आणि घनकचरा व्यवस्थापनेसाठी डायरेक्ट टेंडर कॉल करून टेंडर मागवून घ्यावे असा मी ठराव मांडत आहे.

**सुधा गोयंका :-**

अनुमोदन आहे.

**परशुराम पाटील :-**

अनुमोदन आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, आता जो साफसफाईचा खर्च आहे व त्याच्यासाठी जी तरतुद आहे ती संपलेली आहे. परंतु, आयुक्तांनी कुठल्यातरी हेडखाली, ज्या कुठल्या हेडमध्ये बॅलेन्स असेल त्याची ताबडतोब पूर्तता करुन त्यांचा पगार काढावा. नाहीतर, आयुक्त साहेब, हे जर संपावर गेले किंवा बंद झाले तर शहराची एकदम वाट लागेल आणि आता पुन्हा तोंडावर इलेक्शन आलेले आहे. ह्याचा तुम्ही गांर्भीयाने विचार करा आणि ताबडतोब त्या हेडखाली शिफ्टकरून पैशांचा बंदोबस्त करावा ही माझी नम्र विनंती आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, हा जो विषय आहे तो आपल्या सभागृहासमोर तिसऱ्यांदा आलेला आहे. हे शहर स्वच्छ व्हावे अशी प्रत्येकाची भावना आहे आणि हे शहर अस्वच्छ कसे राहिल अशा स्वरुपाचे आपण सभागृहामध्ये गेल्या तीन मिटींगमध्ये वार्ता करत आहोत आणि हा विषय जिथल्या तिथेच आपण थांबून धरलेला आहे. मी मा. प्रशासनाला, मा. महापौरांच्या.....

**रोहिदास पाटील :-**

अस्वच्छ करण्याकरिता आम्ही कसे समर्थन करणार? आम्ही तर स्वच्छ करा म्हणून आग्रह धरला.

**लिओ कोलासो :-**

मी मा. महापौरांच्या माध्यमातून प्रशासनाला विचारतो की, आपण हा प्रस्ताव आणलेला आहे. आपला दृष्टीकोन काहीतरी स्वच्छ असेल की, अशाप्रकारच्या प्रस्तावामुळे या शहराची जो घाण कचरा आहे त्याचे संपूर्ण उच्चाटन होईल. हे शहर आरोग्य संपन्न होईल अशी आपली भूमिका आहे. आपण हे सगळं दबाव तंत्रामध्ये बळी पडत आहात. आपण हे मांडलेले प्रस्ताव आहेत त्याचे समर्थन करायला पाहिजे. इथे भिती दाखवण्यात येत आहे की, आमची टर्म फक्त इन मिन तीन महिन्याची आहे. त्यामुळे आम्ही काय ठराव करु शकतो? येणारे जे प्रशासन असेल, येणारे जे नवे शासन असेल त्याच्याकडे त्याचे दायित्व जाईल. ह्याहून चांगले येईल. प्रभाग रचना बधितल्यानंतर फार चांगले लोक या सभागृहात येणार आहेत हे स्पष्ट झालेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

भारतीय जनता पार्टीचे दिवस चांगले आहेत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला एक चिंता आहे की, आपण म्हणतो की, एक वर्षासाठी साफसफाईचे काम देण्यात यावे आणि घनकचऱ्यासाठी तीन वर्षाचे काम देण्यात यावे. ह्याच्यामध्ये आरोग्य संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांनी आपल्या आणलेल्या प्रस्तावाचे या सभागृहात समर्थन करावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब, मा. महापौर मॅडम, आज चिंतेचा विषय आहे. शहराची सफाई व्हावी मी आयुक्त साहेबांचे लक्ष वेधतो, सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, जसे कचरा उचलण्याचा जो विषय आहे. मी स्थायी समिती सभापती स्टिवन मेन्डोंसा ह्यांना धन्यवाद देईन. स्थायी समितीमध्ये ह्याच्यावर गांर्भीयपूर्वक चर्चा झाली. आपण दरवर्षी नालेसफाईचे टेंडर आपण मे महिन्यात देतो. मे महिन्यात ठेका कोणत्याही ठेकेदाराला दिल्यानंतर त्याच्यावाटेला साधारण एक किमी. चे गटर येते आणि १ कि.मी नाला येतो. त्यांच्यापरिने त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नाने समजा, की प्रयत्न करुन ८० टक्के तो नाला साफ होतो. शेवटचा २० टक्के नाला बाकी राहतो आणि तो नाला साफ न झाल्यामुळे अकाली पाऊस पडला किंवा पावसाच्या सिझनप्रमाणे पाऊस आला तर पहिला पाऊस झाला व मिरा भाईंदर शहर हे बुडले असे पेपरला बातम्या येतात. आम्ही स्थायी समितीमध्ये सर्वांनी ठरविले होते. आयुक्त साहेबांनी ही होय म्हटले होते. पण त्याचा ह्याच्यामध्ये कुठे ही विचार केलेला मला दिसत नाही की, त्याच्यातून पहिल्यांदा फेब्रूवारी, मार्च महिन्यात नाले सफाईचे टेंडर पहिल्यांदा निघायला पाहिजे होते. जेणेकरून ७० ते ८० टक्के नाले समुद्रापर्यंत साफ होतील आणि नंतर उर्वरित नाला जो आहे ते पाऊस पडतेवेळी किंवा पाऊस पडण्याच्या आधी आठवडाभर ते साफ होईल असे नसेल तर आपण पूर्ण पैसे

देवून सुद्धा आपण प्रामाणिक प्रयत्न करुनसुद्धा, ठेकेदारांनी ही प्रयत्न करुन सुद्धा त्याचे रिझेल्ट मिळत नाही. संपूर्ण नागरिक आपल्याला दोष देतात. त्याच्याही पलिकडे सामान्य नागरिकांचे, दुकानदारांचे, व्यापारांचे अतोनात नुकसान होते. कुठे लाखो रुपयाचे होते तर कुठे कोटयवधी रुपयाचे होते. म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, मा. महापौरांना विनंती आहे आयुक्तांना विनंती आहे की, मा. महापौरांना विनंती आहे, आयुक्तांना विनंती आहे की, नालेसफाईच्या बाबतीत आपण योग्य तो निर्णय घ्यावा. मे महिन्यामध्ये ते ठेवू नये. आपण पैसे तर या खात्यातून, या हेडमधून त्या हेडमध्ये आपण घेतच असतो. आता ही आपण घेणार आहोत. जो निधी वापरला गेला नाही. तो निधी आपल्याकडे शिलकी म्हणून आहे. तो शिलकी निधी घेतेवेळी नालेसफाईच्या नावाखाली घ्यावा आणि नालेसाफ करावे ही विनंती.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, याठिकाणी प्रकरण क्र. १११ प्रभाग निहाय साफसफाई घनकचरा व्यवस्थापनचा जो गोषवारा आयुक्त साहेबांनी दिलेला आहे. हया गोषवाऱ्यामध्ये सर्वच मुद्दे कव्हर झालेले आहेत की, प्रशासनाच्यावतीने काय करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी आपणाला त्याच्यावर निर्णय घेणे भाग आहे. मागे याठिकाणी ज्यावेळेला चर्चा झाली तेव्हा एका सदस्याने पी.एफ. वगैरे, सर्व मुद्दे याठिकाणी उपस्थित केले आणि त्या अनुषंगाने गोषवाऱ्यामध्ये देखिल त्याचा उल्लेख झालेला आहे. त्याचप्रमाणे मागच्यावेळी आपण ज्या गाडया वापरणार आहोत, घनकचरा व्यवस्थापनेकरिता कचरा वाहून नेण्याकरिता, त्याची डिझाईन ती देखिल प्रशासनाने याठिकाणी सादर केलेली आहे. हे करत असताना आपण ज्यावेळेला मिरा भाईंदर शहरामध्ये परिवहन सेवा चालू केली त्या परिवहन सेवेमध्ये नविन गाडया असाव्यात हे डोळयासमोर उद्दिष्ट ठेवून आपण त्यांना पाच वर्षाचा ठेका दिला की, परिवहन सेवा ज्या ठेकेदाराला देणार त्यांना पाच वर्ष, कारण त्यांनी नविन गाडया खरेदी केल्यातर आठ वर्षे तर तीन वर्षाची त्यांना पुन्हा मुदत द्यायची आहे. पाच वर्षासाठी दिलेले आहे. मग आता आपण हे जे घनकचरा व्यवस्थापन करणार आहोत. ह्या गाडया आपण ज्या कोणाला ठेक्याने टेंडर काढणार आहोत त्यावेळेला आपण त्यांना नविन गाडया घेण्याचे कम्प्लसरी करणार आहोत. मग त्या ठेकेदाराला एक वर्षासाठी टेंडर दिले तर ह्या गाडया घेणे परवडेल का? हे देखिल प्रशासनाने या गोषवाऱ्यामध्ये त्या गोष्टीचा विचार केलेला आहे. त्या अनुषंगाने त्यांना तीन वर्षाची मुदत, तीन वर्षाचा ठेका द्यावा अशी शिफारस केलेल्या पत्राचा सर्व सभागृहाने ह्याचा विचार करावा. कारण, आपण संपूर्ण पॅक गाडया त्यांच्याकडून मागणार आहोत आणि त्याही नविन चे.सी. मागणार आहोत. नविन गाडया त्यामुळें तीन वर्ष देणं योग्य होईल असे माझे मत आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे त्यांना आपण हे जे ठेकेदार आहेत त्यांना तीन महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे. परंतु, मुदतवाढ दिली असताना, आरोग्य खात्याच्या बजेटमध्ये तरतुद नव्हती. त्यामुळे गेल्या महिन्यापासून कर्मचाऱ्यांचे पगार दिले जात नाही. अशी चर्चा आहे तरी आपल्या महापालिकेत जे आपण नवी मुंबई महानगरपालिकेतून बारवी डॅम्पचे पाणी घेणार होतो. त्यासाठी काही फंड राखून ठेवला होता. जर आपण मार्च महिन्यापर्यंत पाणी घेत नसू तर त्यातला फंड याठिकाणी आरोग्य खात्याला वर्ग करुन या तीन महिन्याचे पेमेन्ट देण्यासाठी त्याचा वापर व्हावा आणि अर्थसंकल्पात पुढच्या वेळेला बारवी डॅमसाठी तरतुद  करुन ठेवा अशी मी याठिकाणी शिफारस करत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, आधी जो विषय निघाला. आपण जे उत्तनचे प्रकल्प दिले होते. त्या ठेकेदारावर हे दाखवतात ना, १ कोटी ४० लाख रुपये त्यामध्ये ३८ लाख रुपये उत्तनच्या प्रकल्पामध्ये त्या ठेकेदारला ॲडव्हॉन्स दिले होते. मशिनरी खरेदी करायला. तो ठेकेदार कुठे आहे आणि ते ॲडव्हॉन्स कुठे आहे? तेही माहित नाही म्हणून आपण ठेकेदाराची सर्व बाजू बघण्याची गरज काय आहे? ते जे १ कोटी ४० लाख रुपयाचे बोर्ड दाखवत आहेत त्यामध्ये ३७ लाख रुपये मागच्या ठेकेदाराने घेतले होते. तो ठेकेदार आहे की नाही? तो प्रकल्प आहे की, नाही? ह्याचे ही अजुन थांगपत्ता नाही म्हणून आपण आम्ही ठेका द्यावा आणि जर चांगले काम असेल तर ठेकेदाराला आम्ही मुदतवाढ देवू ना आणि प्रत्येकवर्षी ठेकेदाराची बाजू आम्ही घेण्याची आपल्याला गरज काय आहे आणि इनवेस्ट केल्यानंतर तो कमावतो. व्यापारी इनव्हेस्टमेंट करतो व त्याला काहितरी मिळते म्हणून तो करतो. ठेकेदाराला गरज असेल तर तो करेल इनव्हेस्टमेंट त्याची काळजी आपल्याला घ्यायची काय गरज आहे?

**केशव घरत :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काकांनी) सांगितले की, नालेसफाई प्रत्येक वर्षी जसे साफसफाईचा ठेका देण्यासाठी प्रत्येकवर्षी आपल्याला मा. महासभेसमोर विषय येतो प्रत्येक वर्षी तसाच विषय नालेसफाईचा सुद्धा येतो. परंतु, तो विषय मार्च महिन्यामध्ये बजेट झाल्यानंतर तो प्रस्ताव मा. महासभेपुढे येतो आणि त्याच्या निविदा मागविणे व मंजुर करणे आणि त्यांनी पुढील सगळे सोपस्कार पुर्ण करण्याकरिता मे महिना उजाडतो आणि ते नालेसफाईचे काम पुर्ण सुरु झाल्यानंतर अकाली जो पाउस पडला तर जे नालेसफाई करायचे आहे ते नालेसफाई करेपर्यंत जे. सी. बी किंवा पोकलन जात नाही  आणि त्यामुळे नालेसफाई अर्धवट होते. तर माझे असे म्हणणे आहे की आता जे उन्हाळ्यात नालेसफाई करता येतील त्या नालेसफाई बाबत (काकांनी ) जे सांगितलेले आहे तो अतिशय चांगला मुद्दा आहे. माझे असे म्हणणे आहे की, सभागृहाचे मी पहिल्यांदा धन्यवाद मांडतो. खार लाईनला ज्या उघाड्या होत्या त्या खार लाईनच्या ताब्यात आहेत आणि त्यासाठी त्यांच्याकडे

निधी उपलब्ध नव्हता तो आपल्या मा. महासभेने मंजुर करुन घोडबंदर येथे दोन दरवाजे आणि चे. सी च्या उघाडीला तीन दरवाजे बांधुन झालेले आहेत आणि चुळशीच्या उघाडीच्या समोर जो बंदारा घाट आहे त्यामुळे खार पाणी आत मध्ये येत नाही. तर माझे असे म्हणणे आहे की, चुळशीची उघाडी आता संपुर्ण सुकलेली आहे आणि ती जी उघाडी आहे ती संपुर्ण बुझलेली उघाडी आहे. आता जर काम सुरु केले तर आता ती उघाडी सुकलेली असल्यामुळे दोन्ही बाजु साफ करता येईल. आणि त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यासाठी फार मोठी मदत होईल पुराच्या पावसाच्या पाण्याचे, तर मी सभागृहाला अशी विनंती करतो की, जे दर २००६ – २००७ साली मंजुर करुन जे. सी. बी पोकलन आणि बोट पोकलन ह्यांचे जे दर मंजुर करुन केलेले आहे त्या मंजुर दराप्रमाणे त्यांना या फेब्रुवारी महिन्यापासुन काम सुरु करण्यास सांगावे की, जेणे करुन जे नाले उन्हाळ्यात साफ करता येतील असे नाले साफ होउन या मिरा भाईंदर महानगरपालिकेत जे पुराचे थैमान असते त्यावेळी पुर सगळी कडे कमी होईल अशी मी सभागृहाला विनंती करतो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, यह जो नाले साफसफाई का काम है वह बांधकाम विभाग करेगा या आरोग्य विभाग करेगा? क्योंकी यह काम पहले बांधकाम विभाग करता था।

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्यांच्या मुद्यांशी मी सहमत आहे. मी आपल्या परवानगीने बोलते पुर्वी आपल्या कडे बांधकाम विभागांन कडे बऱ्याच नाल्यांची सफाई होती आणि मला आतापण असे वाटते की, बांधकाम विभाग हे बऱ्याचे ठिकाणी नव्याने तयार होणारे नाले खोदत ही असतात. तर नाले सफाई आणि नवीन नविन नाले खोदाई ह्यांचे एक संयुक्तिकरीत्या मला वाटते श्री. शिवमुर्ती नाईक साहेब असताना आपल्याकडे मधल्या काळामध्ये हा प्रयोग होत होता त्याचे काय झाले हे माहित नाही. संपुर्ण डायव्हर्शन आरोग्य खात्याकडे दिले कधी कधी आपल्याकडे निधीची सुध्दा कमतरता होते. अशावेळेला बांधकाम विभागाकडे निधी कमी पडतो किंवा आरोग्य विभागाकडे शिल्लक असतो. माझी कमिशनर साहेबांना विनंती आहे की, असे वाटते की, बांधकाम विभागाकडुन काही काम करुन घेतली तर ती चांगल्या रितीने होउ शकेल.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम, तो नाला कधी होणार ते सांगा व जी दिल्ली दरबार ते झंकार कंपनी येथे ब्रिज बनवण्याकरिता तुम्हाला मी जे लेटर दिले होते त्यावर कारवाही केलेली नाही. त्याचा मला खुलासा करुन द्या. हा ब्रिज झाला पाहिजे आपण ते लवकर करुन घ्या व परत परत बोलायला सांगु नका या बाबत मी दोन ते तीन वेळा लेटर दिलेली आहेत. त्याची शहानीशा झाली नाही ह्या वेळेला तो नाला बनविण्यात यावा असे मी तुम्हाला सांगते तसेच लोंकाच्या घर दारांचे जे नुकसान होईल त्याचे जबाबदार तुम्ही आहात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जयाबाई भोईर ह्यांनी विचारलेल्या प्रश्नांचा खुलासा संबंधित अधिकारी करतील.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, हटकेशमध्ये घोडबंदरहुन स्टेशनवरुन येणारी लाईन आणि झंकार कंपनी इथली लाईन ह्या पावसाळयामध्ये दोन्ही लाईन आपल्या ह्या स्टेमच्या ताब्यात आहेत. पुर परिस्थिती निर्माण होते म्हणुन सर्वांनी पाहणी केली आयुक्त साहेबांनी प्रस्ताव दिला आपण प्रस्ताव दिला. स्टेमच्या बैटकीत सर्व प्रस्ताव मंजुर झाले त्यांच्याकडे निविदा प्राप्त झालेल्या आहेत चौकशी केली आहे आणि फक्त येत्या कार्यकारी समितीत मंजुर होतील आणि पावसापुर्वी ते संपुर्ण काम होणार आहे झंकार आणि हटकेशच्या हे दोन्ही काम होणार आहे.

**जयाबाई भोईर :-**

साहेब, ब्रीज बनवण्याचे काय करणार? वरुन मोठा ब्रिज बनला पाहिजे.

**केशव घरत :-**

मा. महापौर मॅडम, बारकुंड साहेबांनी सांगितले की, हटकेश येथील पाईप लाईनची उंची केली जाईल. परंतु , ३१ मे महिन्यामध्ये मंजुर झालेले टेंडर परत रिकॉल झाले आता हे टेंडर परत रिकॉल होणार नाही ह्याची खबरदारी घ्या म्हणजे झाले नाही तर परत तिच परिस्थिती होणार आहे. फक्त मिटींगमध्ये सांगितले जाते.

**जयाबाई भोईर :-**

हे काम आजच्या आज तर केले नाहीतर या पावसाळ्यात लोकांची संपुर्ण घरे बुडतील त्याचे जबाबदार आपणच राहाल.

**दिपक खांबित :-**

बजेट झाले की, आपण लगेचच टेंडर काढणार आहोत.

**जयाबाई भोईर :-**

बजेट येता येता पावसाळा जवळ येईल. आपण असे काहीही करु नका. नउ वर्ष झाले तुम्हाला मी ह्याच्याबद्दल बोलते पण तुम्ही ह्याचा विचार करत नाही तुम्ही लोकांची परिस्थिती बघा ना.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, तुम्ही हे असे चाल ढकल करु नका.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील (काका) तुम्ही नेहमी चाल ढकल ,चाल ढकल काय म्हणता ही मा. महासभा आहे आणि मा. महासभा घेईन तो निर्णय प्रत्येक वेळेस आपण चाल ढकल शब्द वापरता कुठल्या विषयात चाल ढकल केली.

**रोहिदास पाटील :-**

ते खांबित साहेबांसाठी होते.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम, आपण प्रत्यक्ष जागेवर जाउन पाहणी केलेली आहे. तर ह्याचा लवकरात लवकर विचार करावा.

**रोहिदास पाटील :-**

आपण म्हणता की, बजेट प्रोव्हीजन केल्यानंतर बजेट प्रोव्हीजन त्यांनीच करायची आहे. त्याची व्यवस्था करुन पावसाच्या आधी होईल असे उत्तर देणे संयुक्तिक आहे. नाहीतर तसे उत्तर द्यायला बजेट प्रोव्हीजन नव्हती आता मार्च महिन्यमध्ये मिळणार नाही मे महिन्यामध्ये मिळेल तर तुम्ही जुन महिन्यामध्ये काम सुरु कराल का? तर नाही होणार . १५ जुनच्या आधी त्या कामाचे एक्झीबीशन व्हायला पाहिजे. ते काम पुर्ण व्हायला पाहिजे अशी आमची विनंती आहे.

**दिपक खांबित :-**

ठिक आहे. साहेबांकडे तसे मी लगेच पुटअप करतो.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, आधीच पुटअप करायला पाहिजे होते. ते जर केले नसेल तर आता करा अशी मी विनंती करतो.

**दिपक खांबित :-**

स्थायी समितीमध्ये कालचं नक्की झाले ना.

**रोहिदास पाटील :-**

साहेबांनी ही ती बाब आति महत्वाची समजुन लवकर करावी. आम्ही आपल्या चांगल्या कामा करीता धन्यवाद देतो ना. तसेच, तुम्हाला आणखीन एकदा धन्यवाद देतो. तुम्ही ही जी आरक्षणाची सोडत काढली आम्ही व्यक्तिगत तुम्हाला दिले . पक्ष म्हणुन ही दिले या सभागृहात पण आम्ही तुम्हाला धन्यवाद देतो की, हे अख्या गावाने बघितले तुम्ही जे आरक्षण केले ते लाईव्ह दाखविले. त्याबद्दल ही मी धन्यवाद देतो. पुन्हा एक विनंती करतो की, सगळया सभेमध्ये मा. महासभेमध्ये आम्ही तुम्हाला सांगतो या सभागृहाचे कामकाज पण लोंकाना लाईव्ह दाखवा.

**जयाबाई भोईर :-**

मा. महापौर मॅडम, कृष्णास्थळ, मुन्शी कम्पाउंड , मिरा धाम हे संपुर्ण पाण्याखाली येते हे मी तुम्हाला सांगत आहे हे तुम्ही ऐकुन घ्या व लवकरात लवकर ब्रीज बनवा घडीघडी सांगायला लावु नका मी चार वेळा लेटर दिले आहे तरी तुम्ही त्याचा विचार का करत नाही. लोंकाचा विचार करा.

**लिला पाटील :-**

साहेब, मागच्या वर्षी राई - मुर्धा , मोर्वा या खाड्यांची साफसफाई झालेली होती आमच्या येथे पुर्व भागात एका ही खाड्याची साफसफाई झाली नाही. यंदा असे काही करु नका की, पुन्हा जगभर होईल. याची आपण दखल घ्या.

**मा. आयुक्त :-**

नालेसफाईच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. त्याचर्चेच्या अनुंषगाने सभागृहाला सांगु इच्छितो की, मागच्या वर्षी ज्या ठिकाणी पाण्याचा निचरा झालेला नव्हता ज्या ज्या ठिकाणी पाणी साचलेले होते त्याचा संपुर्ण सर्व्हे करण्याकरीता प्रभाग अधिकाऱ्यांना जवळ दोन महिन्या अगोदरच सांगितलेले होते त्यांच्या कडुन माझ्याकडे प्रस्ताव आलेला आहे. तो प्रस्ताव बांधकाम विभागाकडे पाठवुन बांधकाम विभागाने त्याच्यवर डिटेल एस्टीमेंट तयार केलेले आहे. आणि मला वाटते मागच्या गुरुवारच्या दिवशी स्थायी समितीमध्ये सादर केलेले आहे आणि त्या प्रस्तावास मंजुरी दिलेली आहे. तो प्रस्ताव मोठ्या प्रमाणामध्ये आहे. तो आपल्यासमोर ,सभागृहासमोर येणार आहे. फक्त अंदाज पत्रकामध्ये तरतुद नसल्यामुळे आपण त्याचे इम्प्लीमेन्टेशन अजुन केलेले नाही परंतु, ती तरतुद आपण ह्यावर्षी करणार आहोत आणि त्याच्य निवीदा सुचना लवकरच प्रसिध्द करणार आहोत.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने सांगतो की, आयुक्त साहेबांनी खुलासा केला की, बजेट प्रोव्हीजन नसल्यामुळे आपल्याला हा विषय घेता येणार नाही. आमची ह्याच्यावर अशी टिपणी आहे की, बजेट प्रोव्हीजन झाल्यानंतर बाकीचे जे एक्झीक्युशन्स असतात इनवायटींग टेंडर्स , एक्स्पटेन्स ऑफ टेंडर्स ॲण्ड अलॉटमेंट

ऑफ वॅर्क्स, ऑर्डर्स ह्याच्यामध्ये बराचसा वेळ जातो. म्हणुन जे काही आपले एस्टीमेट आहे ते प्रशासकिय आणि तांत्रिक मंजुरीसाठी येणाऱ्या सभेपुढे ठेवावे टोकन प्रोव्हीजन असेल, हल्लीचे जे अनस्पेन्ड आरोग्य खात्यामध्ये जी काही आमाउन्ट उरलेली असेल त्याचा आधाराने एक टेंडर इनवाईट करावे आणि त्याच्यानंतर बजेटला योग्य ती प्रोव्हीजन करावी.

**रोहिदास पाटील :-**

डिझस्टर्ड मॅनेंजमेंटच्या नावाखाली पण तुमचे हेड आहे. त्याच्यासाठी हवे असेल तर खास तर खास सभा घ्या. पण, ह्याला महत्व द्या ह्याच्यमध्ये वेळ काढु नका. एवढी विनंती आहे मी मा. महापौर मॅडम, यांना आणखीन एक विनंती करतो की, तुम्हाला धन्यवाद दिले, आयुक्तांना धन्यवाद दिले, अजित पाटील यांना धन्यवाद दिले अशी मघाशी बरीच चर्चा झाली फेरीवाल्यांसाठी ही स्पष्ट आदेश द्या. त्यांना पुन्हा पुन्हा मानसिक त्रास नको.

**शशिकांत भोईर :-**

मॅडम, त्याच्यावर चांगली रुलिंग द्या. फेरीवाल्यांवर कायमची कार्यवाही झाली पाहिजे तुम्ही रुलिंग द्या. कायम स्वरुपी कार्यवाही झाली पाहिजे त्यांच्यावर बर्डन आले पाहिजे. मध्यंतरी उचलायला लावले त्यांच्यानंतर बंद झाले पुन्हा उचलायला लागले व परत बंद झाले ही अशी प्रोव्हीजन न होता तुम्ही अशी रुलींग द्या की, कायम स्वरुपी प्रमाणे होईल. त्याप्रमाणे आताच आपण नालेसफाई वैगरे ह्याच्या संबंधित विचार केला विषय घेतला. आमच्या केबिन रोड या परिसरामध्ये पाणी तुबंले होते आपल्या कलवटर्स करायचे होते त्याचे काय झाले? कुठपर्यंत झाले? पावसाळया अगोदर होईल की, नाही? ह्याचा ही प्रशासनाने खुलासा करावा. कलवटर्सचे काय झाले ह्याचा प्रशासनाने खुलासा करावा ना.

**मा. महापौर :-**

सध्या तो विषय सुरु आहे त्याची चर्चा पुर्ण होउ द्या मग पुन्हा त्या विषयावर चर्चा करुया.

**मिलन पाटील :-**

मा. उपमहापौर वैती साहेबांना माझी नम्र विनंती आहे की, सभागृहाला माझी नम्र विनंती आहे की आता जो आपल्या गाड्यांचा विषय झाला टेंडर कोणाला द्यावे याबद्दल माझे दुमत नाही. टेंडर कोणाला द्यावे जो कमी दराने टेंडर भरेल त्याला टेंडर द्यावे पुन्हा एकदा मी नम्र विनंती करतो की, एका विशिष्ट पध्दतीने ह्या गाड्या बनवाव्या लागतात. टाटाच्या गाड्या असतात त्या विशिष्ट पध्दतीने ह्या गाड्या बनवाव्या लागतात . हे डम्पर असतात ते कोणीसुध्दा दुसऱ्या ठिकाणी विकु शकेल किंवा इतर धंद्यामध्ये वापरेल. परंतु या विशिष्ट गाड्या बनल्यानंतर या विशिष्ट पध्दतीमध्येच त्या गाड्या राहतील . इतर ठिकाणी कुठल्याही कामाला या गाड्यांचा पुन्हा उपयोग होणार नाही .आता आपण जे भिंवडी महानगरपालिका , ठाणे महानगरपालिका, मंबई महानगरपालिका यांच्य गाड्या कशा बंदिस्त असतात आता आपली कचऱ्याची गाडी बाजुने जाते त्याला भरपुर दुर्गंधी येते याचा सभागृहाने विचार करावा किंवा कोणालाही द्यावे परंतु तीन वर्षाचा जर ठेका दिला तर..........

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ते टेन्शन ठेकेदाराचे आहे. तुम्ही कशाला टेन्शन घेता?

**मिलन पाटील :-**

पुन्हा एकदा मी सांगतो की, ह्या ज्या कचऱ्याच्या गाड्या जातात. आपल्या शहराची दुर्गंधी आहे आणि तेच आपण ठाणे, भिंवडी महानगरपालिकेत बघा, तिथे ही बंदिस्त गाड्या जातात त्याचा कोणालाही त्रास होत नाही. आपले शहर आपण सुधारण्याच्या मार्गावर आहोत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठेकेदाराने इनव्हेस्ट करावे.

**मिलन पाटील :-**

तो व्यापारी आहे कोई बता दे क्या कोई इनव्हेस्टर एक साल के लिए इनव्हेस्ट करेगा क्या?

**शिवप्रकाश भुदेका :-**

व्यापारी के उपर ठेकेदार नही है।

**शशिकांत शाह :-**

मॅडम एक ही विषयपर कितनेबार चर्चा करते है?

**मा. महापौर :-**

सचिवजी दोन्ही ठरावाचे वाचन करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १११ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक - ओमप्रकाश अग्रवाल व अनुमोदक - धनराज अग्रवाल व दुसरा ठराव सुचक - रिटा शाह व अनुमोदक - परशुराम पाटील असे दोन ठराव आलेले आहेत. मी दोन्ही ठराव सभागृहाला वाचून दाखवित आहे.

(नगरसचिवांनी दोन्ही ठरावाचे एक-एक करून सभागृहासमोर वाचन केले.)

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व धनराज अग्रवाल ह्यांनी मांडलेला ठराव व सन्मा. सदस्या रिटा शाह व सन्मा. सदस्य परशुराम पाटील यांनी मांडलेला ठराव असे दोन्ही ठराव सारखेच आहेत.

**धनराज अग्रवाल :-**

दोन्ही ठराव क्लब करून घ्या आणि एकच ठराव करा. टेंडरचे आहे ते ह्याच्यात लिहिले आहे की, भत्ता वगैरे हे सर्व मिळून त्याची काय गरज आहे? तुम्ही टेंडर काढा म्हणजे बस झाले? एका वर्षाचे टेंडर आम्हाला मंजुर आहे.

**मा. उपमहापौर :-**

दोन्ही ठराव क्लब करता येण्यासारखे नाही आपण जो ठराव मांडला त्याच्यामध्ये लेखाशिर्ष २००६-०७ ह्याच्यातुन रक्कम वजा करावी असे होते.

**रोहिदास पाटील :-**

चुकभूल द्यावी घ्यावी.

**मा. उपमहापौर :-**

आणि दुसऱ्या ठरावामध्ये लेखाशिर्ष २००७-०८ असा फिगर आहे तर ते क्लब होणार नाही. एक ठराव रितसर आपल्याला मागे घ्यावा लागेल.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आमचा ठराव मागे घेतो.

**मा. महापौर :-**

प्रभाग निहाय नालेसफाई व घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या कामास मंजुरी देणेबाबत दोन ठराव आले होते. परंतु, सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल व धनराज अग्रवाल व दुसरा ठराव हा सारखा असल्यामुळे त्यांनी आपला ठराव मागे घेतलेला आहे. सन्मा. सदस्या रिटा शाह व सन्मा. सदस्य परशुराम पाटील या सदस्यांनी मांडलेला ठराव कायम करण्यात आलेला आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, मी जो कलवट बद्दल खुलासा मागितला आहे.

**प्रकरण क्र. १११ :-**

प्रभागनिहाय वॉर्ड साफसफाई करणे व घनकचरा व्यवस्थापन करण्याच्या कामाच्या प्रस्तावास मंजुरी देणेबाबत.

**ठराव क्र. ८७ :-**

**अ) खाजगीकरणातून प्रभागनिहाय साफसफाई करणे :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात प्रभागनिहाय साफसफाईची कामे समाधानकारक करण्याच्या दृष्टीने कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे सोयीस्कर होण्यासाठी महापालिका क्षेत्राची एकूण १६ गटात विभागणी करून रस्ते सफाई, गटारे सफाई, आदी साफसफाई कामे खाजगीकरणातून करण्यात येणार असून याकामी आवश्यक लागणारे एकुण १७४६ मजुर व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आवश्यक मजूर घेण्यात यावे. सदर कामगारांना कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्यानुसार मुळ वेतन, दर सहामहिन्यांनी वाढणारे दर, शासन नियमानुसार देण्यात येणारे विविध भत्ते आदी देण्यात यावे तसेच खाजगी करणामार्फत वॉर्ड साफसफाई कामाच्या प्रस्तावास मान्यता देत असून याकामी येणारा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साफसफाई व सोयी अंतर्गत वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

**ब) घनकचरा व्यवस्थापन :-**

शहरात मोठ्याप्रमाणात नागरीवस्ती, औद्योगिक परिसर, व्यापारी संकुले, बाजार परिसर, दवाखाने, दुकाने त्याचप्रमाणे नव्याने होत असलेले नागरीकरण आदीमधून सध्या दररोज सुमारे ४०० मेट्रीक टन ओला व सुका कचरा निर्माण होत आहे. सदर कचऱ्याचे व्यवस्थापन करणेकामी १६ गटाकरिता आवश्यक असलेली वाहने सध्या कार्यरत असलेल्या पद्धतीनुसार भाड्याने घ्यावी व त्यावर आवश्यक लागणारे कामगार किमान वेतन कायद्यानुसार कंत्राटदाराकडून घेण्यास व याकामी येणारा खर्च सन २००७-०८ या आर्थिक वर्षात साफसफाई व सोयी अंतर्गत वॉर्ड साफसफाई या लेखाशिर्षातून करण्यात यावा.

वरील दोन्ही प्रस्तावित कामाच्या निविदा एक वर्षाकरिता मागविण्यात याव्यात व याकामी येणाऱ्या खर्चास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मंजूरी देत आहे. सध्या कार्यरत असलेल्या निविदाकारांचे देयके अदा करणे कामी आरोग्य विभागात तरतुद उपलब्ध नसल्याने सदरची तरतुद मनपा च्या इतर विभागातील अखर्चीत लेखाशिर्षातून वर्ग सोबत तक्त्याप्रमाणे करणेस हि सभा मंजूरी देत आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**नमुना क्र. १० (आरोग्य विभाग)**
**नियम ३० (३) पहा**

| अ.क्र | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | जानेवारी अखेर २००६ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००६) पर्यंत | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष | मुळ तरतुद | नोव्हेंबर अखेर २००६ पर्यंत झालेला खर्च | होणारा अंदाजित खर्च (माहे मार्च २००७) पर्यंत | प्रस्तावित वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** | **१०** | **११** |
| १ | नविन पाणीपुरवठा योजना (मोरबे धरणासहीत) | ५,००,००,००० | ० | ० | ५,००,००,००० | वॉर्ड साफसफाई | १०.५४,००,००० | १०,५३,५७,७२३ | ३,३३,४८,०२३ | ३,३३,००,७४६ |
| | | | | | | एकात्मिक डास निर्मुलन | १,७०,००,००० | १,५२,८४,५०० | ५९,५५,००० | ४२,३९,५०० |
| | | | | | | | | | **एकूण** | **३,७५,४०,२४६** |

**शेरा :-** महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागात ब भांडवली खर्च अनुक्रमांक ०६ नविन पाणी पुरवठा योजना (मोरबे धरणासहीत) या लेखाशिर्षाखाली रू. ५ कोटी अखर्चीत तरतुद उपलब्ध असून सदरच्या तरतुदी मधून आरोग्य विभागास वॉर्ड साफसफाई कामी रू. ३,३३,००,७४६/- व एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम करणे कामी रू. ४२,३९,५००/- या लेखाशिर्षा करिता वर्ग करणेस शिफारस असे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **सही/-** | **सही/-** | **सही/-** | **सही/-** | **सही/-** |
| **कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग** | **वैद्यकीय आरोग्य अधिकरी** | **मुख्य लेखा परिक्षक** | **मुख्य लेखा अधिकारी** | **आयुक्त** |

**सुचक :- श्रीम. रिटा शहा.　　　　　अनुमोदन :- श्री. परशुराम पाटील.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सुवर्ण जयंती अंतर्गत सर्व्हे झालेला आहे आणि केलेला सर्व्हे आम्हाला मान्य आहे. परंतु, माझी एक सुचना आहे की, आमच्या वॉर्डात आणि मला असे वाटते की, प्रत्येक नगरसेवकाच्या वॉर्डात कोण ना कोण राहून गेलेला आहे. मग नक्की पत्रव्यवहार केला व आम्ही पत्रामध्ये लिहून दिले आहे ते इनक्ल्यूड करून घ्यावे.

**एस. ए. खान :-**

माझे त्याला अनुमोदन आहे व त्यामध्ये जे राहिले आहे ते इनक्ल्युड करून घ्यावे ऑलरेडी सर्व्हे झालेला आहे पण काही राहिले असतील तर ते त्याच्यामध्ये इनक्ल्युड करून घ्यावे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, हा जो सुवर्ण जयंती शहरी रोजगार अभियान अंतर्गत जो सर्व्हे झालेला आहे. यामध्ये जे लोक सर्व्हे करायला गेले होते. खास करून माझ्या वॉर्ड मध्ये, त्यावेळेला काही दारूडे लोक सुद्धा ह्याच्यामध्ये नेमले गेले होते. त्यामुळे तो सर्व्हे करताना घरातल्या महिला त्या माणसांच्या जवळसुद्धा उभ्या राहू शकत नव्हत्या आणि तशा परिस्थितीत त्या माणसांनी सर्व्हे चुकीचा केला. त्यानंतर निराळी दुसरी एक बाई नेमली अनावधाने त्यावेळेला माझ्या वडीलांचे निधन झाले तो सर्व्हे चालू असताना त्यामुळे मला महिनाभर बाहेर पडता आले नाही. तर ह्याच्यामध्ये खरोखर जे बाधित आहे जे आपण म्हणतो ज्याच्याकरिता आपण सर्व्हे केलेला आहे. दारिद्र्य रेषेखाली लोकांकरिता म्हणजे तो जो रेशिओ आहे पाचशे दोन रूपये पर हेड त्यामानाने त्याचे कॅल्क्युलेशन असते ते त्या माणसाने त्यावेळेला लावले नाही. त्यामुळे काही कुटुंब अशीच राहिली. ते आम्ही या सभागृहापुढे आणले. आम्ही तर आमच्या सुचना करणार त्यानंतर काय प्रोव्हीजन आहे ते आपण नंतर बघू या. तर अशी काही राहिलेली कुटूंब असतील. आपल्या नोटीसा या महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डावर लागतात. बऱ्याचशा गेल्या वर्षापासून ती कागदपत्रे नोटीस बोर्डावरची काढली गेलेली नाही. म्हणजेच नविन काही नोटीस लागलेल्या आहेत त्या आमच्या सारख्याला कळत नाही आणि काही हुशार अधिकारी असतात काही मागच्या मिटींगमध्ये पान क्र. १८ वर सिरियल नं. १२३१ पाटील अनंत रामचंद्र ही व्यक्ती कोण? पत्ता लिहिलेला आहे. राई - शिवनेरी मी कुठे बोलतोय त्यांचे नाव आहे. मिलन म्हात्रे वीस आहेत. मी मिलन वसंत म्हात्रे आहे.

**अनंत पाटील :-**

अनंत रामचंद्र पाटील नावाचे आमच्याकडे चार लोक आहेत. शिवनेरी नगर......

**मिलन म्हात्रे :-**

मी कुठे नाही बोलतो आम्ही तुम्हाला कुठे बोलतो? मी काहीही बोललेलो नाही. कृपया आपण बसून घ्या.

**अनंत पाटील :-**

सभागृहाचा गैरसमज होउ नये म्हणून मी बोललो.

**मिलन म्हात्रे :-**

सचिव साहेब, १८ नंबर पानाची यादी त्यानंतर राईच्या जागी राडी केलेले आहे. आपल्या स्थानिक कर्मचाऱ्याने ही यादी बनविलेली आहे. त्यांना राई गावाचे नाव बरोबर माहित नाही. शिवनेरीच्या ठिकाणी ही केले आहे आणि जवळ जवळ भाईंदर फक्त भाईंदर असे हजारो नाव भाईंदरमध्ये नोंदविलेली आहेत. म्हणजे ही टायपिंग मिस्टेक नाही ना. कारण आमच्याकडे तुमच्याकडे ज्यांनी ज्यांनी नाव नोंदविली तर संपुर्ण पोस्टल ॲडरेस सकट पिन कोड नंबर सकट आपल्याकडे ४०११०१ आहे ४०११०५ आहे असे अलग अलग आहेत. फक्त भाईंदर या सदराखाली जवळ जवळ बहूतेक हजारो नाव नोंदविली गेली आहेत. आता समजा यदा कदाचित मिलन म्हात्रे माझे नाव आहे. भाईंदर केवढे मोठे आहे. त्यात १०-१५-२०-२५ मिलन म्हात्रे आहेत. पण त्याचा ॲडरेस नाही? गावाचे नाव बरोबर नाही. गावाचे प्रोनाउन्सेशन बरोबर नाही. हे समोर आहे. म्हणजे राई गावाचे नाव जर राडी केले असेल तर अनेक लोकांची नाव ही त्याच्यात बदलली गेली आहेत. या सभेमध्ये आपण रूलिंग द्या तुमची जी ही यादी आहे ती डिफॉल्टी यादी आहे. ही यादी व्यवस्थित अद्यावत करा. ज्यांची नाव चुकली असेल नंतर परत एखाद्याने जर लोनला अर्ज केला की तुम्ही, स्पेलिंग आणि स्पेलिंगवर लक्ष ठेवता. एक जरी स्पेलिंग जसे राईच्या ऐवजी राडी झाले व त्याठिकाणी जर बाईचे नाव असते तर सरळ सांगणार की, आम्ही देणार नाही. ह्याचे मला आयुक्त साहेब प्रशासनाच्या वतीने तुमच्याकडून रूलिंग पाहिजे. नाहीतर, ह्याचे जे कोणी सचिव आहेत. त्यांच्याकडे आम्ही आपली तक्रार करू. आम्हाला

तक्रार करायला लावू नका. ही जी मिस्टेक झाली आहे व आपल्या अधिकाऱ्यांनी ते का केले? भाईंदर म्हणजे काय? भाईंदर पश्चिम, पुर्व, खारी गांव वगैरे आहेत का नाही? पोटगाव आहे का नाही नुसते भाईंदर. भाईंदर वेस्ट ही नाही. भाईंदर ईस्ट ही नाही. भाईंदर वेस्ट आणि भाईंदर ईस्ट असे प्रकार आहेत. या यादीमधल्या त्रुटी कोण उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांनी चेक केले का? आपण ह्याचा रिपोर्ट घेतला का? आपण सभागृहापुढे आमच्यापुढे आणले आपण स्वतः रेशिओ घेतला का, की सेंट्रल गर्व्हरमेंट आणि स्टेट गर्व्हरमेंटच्या विद्यमानातून पुढे ह्याच्यात लोकांना लोन मिळणार आहे. पाच दहा ते पंचवीस लाखापर्यंत लोनची या लिफ्टवर प्रोव्हीजन आहे. हे खायचे काम नाही. उद्या जर त्यांनी एवढे डॉक्युमेंट चेकआउटला मागितले तर तुमची यादी ही डिफॉल्टी नसावी. माझे मुळ गावंच तिथे लिहिलेले नाही. नाव तर दुर राहिले. मेहेरबानी करून त्यावेळेला जो सर्व्हे झाला. त्यावेळेला आयुक्तांचे लक्ष नव्हते. ती दारूडी व्यक्ती मी तुमच्या महानगरपालिकेच्या कार्यालयात घेउन आलो. त्यांच्यासमोर वाद झाला आणि नंतर त्या माणसाच्या जागी दुसरी बाई नेमली. पण त्या माणसाने जवळ जवळ तीन महिने हा सर्व्हे केला होता आणि तो सर्व्हे चुकीचा केला म्हणून त्याच्यामध्ये ही आता मंजुरी व माझे हे ऑब्जेक्शन आहे आपण त्याच्यावर काय निकाल देता ते बघा मला योग्य वाटला तर आम्ही तुमचा निर्णय स्विकारू अन्यथा पुढे जाण्याचा मार्ग मोकळा आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला ह्याची माहिती मिळावी. मी हे जाणू इच्छितो की, आता ह्याच्यावर काय निर्बंध आहेत का? ह्याच तारखेला हा तुम्हाला सर्व्हे रिपोर्ट पाठवायचा आहे. असे काही निर्बंध आहेत? मा. महापौर मॅडम, आपण हा जो विषय येथे दिलेला आहे ही यादी ह्या तारखेपर्यंत अमुकच मुदत आहे असे निर्बंध आहेत का?

**मा. आयुक्त :-**

२६ जानेवारी पर्यंत ही यादी पाठवायची आहे.

**रोहिदास पाटील :-**

ही एवढी मोठी योजना आणि ह्या योजनेचे फायदे, तोटे, उपभोक्ते कोण ह्याचे सर्वेक्षण अनेक वर्षे केले आणि सहा दिवस आधी जर आपण आणतो त्यात तुम्ही लिहिलेले आहे. मी चौकशी केली. कोणत्याही महापालिकेच्या नोटीस बोर्डावर केलेली नाही. सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे ह्यांच्या हातात केवढा मोठा बन्च आहे तो कुठेही लागला नाही जशी अन्य कामे आपण अवलोकनार्थ आणतो तसे हे......

**मा. आयुक्त :-**

लावलेले होते व त्याची प्रसिद्धी दिलेली होती.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, सगळ्यांची यादी दिलेली नाही.

**रोहित सुवर्णा :-**

ही यादी आम्ही मागून घेतली होती.

**रोहिदास पाटील :-**

.ह्याच्यामध्ये आपण जी नाव घेतलेली आहेत ती दोन वर्षापुर्वी तीन वर्षापुर्वी घेतली त्यांच्या घरात आज टी.व्ही. आहे. त्यांच्या घरात सोफा आहे. त्यांच्या घरात फ्रीज आहे अशी नाव ह्याच्यामध्ये आहेत. अजून तुम्ही छानणी करा. पण एवढे मोठे कोट्यावधी रूपयाचे काम, गोरगरिबांच्या भल्यासाठी असलेले काम आपण इतक्या उशिरा करतो आणि शेवटचे सहा दिवस बाकी असताना ती यादी आपल्याकडे येते आणि तुम्ही सभागृहाची मान्यता घेता हे कशासाठी करता? हा विषय उगाच लोकांना मिळतो. तुमचा हेतु शुद्ध, सभागृहाचा हेतु शुद्ध म्हणून आम्हीही कुठेतरी संमती देतो आणि तुम्ही ही संमंतीसाठी आणता असा ह्याच्यामधून मॅसेज जातो.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

सर्व्हेक्षण प्रायव्हेट लोगोसे भी करवाया था ना। उनके लिये पेमेंन्ट दे दिया क्या? पेमेंन्ट क्यो नही दिया गया? यह मुद्दा यहा लाने की क्या जरूरत? अभी जब आपने उनको पेमेंन्ट नही दिया वह पेमेंन्ट कहा रूका है?

**वाकोडे (सुवर्ण जयंती) :-**

गर्व्हमेंटने.......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

गर्व्हमेंट का ठिक है। तुमने यह लिस्ट बनाई, सर्व्हेक्षण किया और उसका पेमेंन्ट क्यो नही दिया?

**मिलन पाटील :-**

मॅडम हे अधिकारी कोण आहेत? ह्यांनी तुमची परमिशन घेतली का? तुम्हाला बोलता येते का? पहिल्यांदा मा. महापौरांची परमिशन घ्यायची मग तुम्ही बोलायचे तुम्ही डायरेक्ट कसे काय बोलता? प्रोटोकॉल काय आहे की, नाही? तुम्हाला सभागृहाचा नियम समजतो की नाही?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप इनको जरा पुछिए की, कितने लोगो को पेमेंन्ट नही दिया गया है। इनको पेमेंन्ट कबतक दिया जायेगा यह आप बताईए।

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने बोलतो की, या सर्व्हेक्षणासाठी आपण ५० प्रगणकांची नेमणूक केली होती आणि त्यांना प्रति फॉर्म चार रूपये आपल्याला द्यायचे आहेत व हा जो सर्व्हे आहे याला अंतिम मंजुरी मा. महासभेत दिल्यानंतर त्यांना ते पेमेंट केले जाणार आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

तो इतना लेट क्यो किया गया?

**तुळशीदास म्हात्रे :-**

शेख साहेब, आपण महासभेची पैसे देण्याकरिता मंजुरी घ्या व जो सर्व्हे झालेला आहे तो सर्व्हे बरोबर झालेला नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांनी सांगितले की, त्यांच्याकडे टी.व्ही. आहे तर त्यांच्या दोन दोन माळ्याच्या बिल्डींग आहेत. अशांनाही तुम्ही दिलेले आहे नावासहित तुम्हाला सांगतो.

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण शहरामध्ये जो सर्व्हे केला होता त्यामध्ये ११ हजार आठशे ७६ कुटुंबांचा सर्व्हे केलेला आहे आणि त्यामध्ये ९७०२ इतके बिलो पॉवरही लाईन मधले कुटुंबे सापडलेल्या आहेत आणि आपण हे सर्व्हे करताना आपले सर्व सन्मा. सदस्य गटनेते आणि वर्तमानपत्रामध्ये ह्याला प्रसिद्धी दिलेली आहे व आपल्या नोटीस बोर्डावर ही प्रसिद्धी दिलेली आहे आणि आपल्याकडे ३५ झोपडपट्ट्या आहेत व प्रत्येक झोपडपट्टीमध्ये आपला प्रगणक जावून त्याठिकाणी सर्व्हे करण्यात आलेला आहे. आणि शासनाच्या अशा सुचना होत्या की, झोपडपट्टया व्यतिरिक्त ज्या लोकांचे अर्ज येतील त्यांचे प्रत्यक्षात सर्व्हे करून घ्यावा त्याप्रमाणे आपण त्यांचा सुद्धा सर्व्हे करून घेतलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आता सन्मा. सदस्य जोजफ घोन्सालवीस नाही. पण त्यांनी सभागृहात विषय आणला होता की, ज्यांच्याकडे .........

**अनंत पाटील :-**

अनंत पाटील ह्यांचे नाव होते तर त्यावर चर्चा झाली त्यांच्या नावाचा खुलासा आपण करणार का?

**रोहिदास पाटील :-**

अनंत पाटील कहीक असतील.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, शेख साहेब यांचा निष्कर्ष आपण कसा लावला? हे जे दारिद्रय रेषेखाली आहत त्यांचा निष्कर्ष तुम्ही कसा लावला? हे किती वर्षापासून आपल्याकडे होते?

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सर्व्हेसाठी शासनाने काही निकष ठरवून दिलेले आहेत. त्यांनी जवळ जवळ नउ प्रकारचे निकष ठरवून दिलेले आहेत. त्या निकषाप्रमाणे आपण घरोघरी जावून सर्व्हे केलेला आहे. आणि त्या सर्व्हेमध्ये प्रति व्यक्ती ज्यांचे उत्पन्न ५९१ रू. ७५ पैसे याच्यापेक्षा कमी येते त्याला आपण बीपीएल च्या यादीमध्ये घेतलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, इसमे ऐसा आदमी भी है जो लार्सन ॲन्ड टुब्रो मे कामपर है।

**मिलन पाटील :-**

ती व्यक्ती जर दोन महिन्यापुर्वी इतर राज्यातुन आली असेल. समजा, सोलापुर किंवा नागपूर वरून आली असेल तर त्या व्यक्तींची नावे सुद्धा ह्याच्यामध्ये आहेत. चार महिने, सहा महिनेपुर्वीची लोक आहेत. असे लोक पण तुम्ही पकडले आहेत ते चुकीने पकडले आहेत का, ते आपण बघून घ्या. त्या लोकांचे झोपडे त्यांच्या नावावर आहेत का?

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील साहेब, आपण जो सर्व्हे केलेला आहे व शासनाने जे निकष दिलेले आहेत त्या निकषामध्ये ते जर कुटूंब बसत असेल तरच आपण त्याला घेतलेले आहे.

**मिलन पाटील :-**

शेख साहेब या लिस्टमध्ये पहिल्या पानावरच तिसऱ्या नंबरपासून वडिलांचे नावच लिहिलेले नाही. मी नाव वाचून दाखवतो सिंग हरेंद्र आणि हरेंद्र जर चार असतील तर आपण काय बघायचे? म्हणजे आपण जे फॉर्म घेतलेले आहेत ते बरोबर घेतलेले नाही.

**अजिज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण त्यावेळेला सर्व्हेक्षणासाठी प्रगणकांना पाठविले होते......

**प्रभात पाटील :-**

ज्याचे मासिक उत्पन्न ५९१ रुपये आहे असा माणूस इतरठिकाणी सुद्धा सापडणार नाही. भिकाऱ्याचे सुद्धा उत्पन्न ५९१ रूपये रोजचे आहे.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, तुम्ही रूलिंग द्या हा सर्व्हे जर त्यांनी केलेला आहे हा बरोबर असला तर ठिक आहे. अगर जर चुकीचा असला तर ह्याच्यावर तुम्ही अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही करणार ते सांगा. हा शासनाचा पैसा आपला पैसा आहे असे समजा. तर ह्याच्यावर कार्यवाही काय करणार आहात ह्याचे आम्हाला ठोस उत्तर द्यावे की हा जो सर्व्हे झालेला आहे तो बरोबर आहे. आपण रूलिंग द्या की, ह्याच्यावर कोणती कार्यवाही केली जाईल.

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवा.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, यांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, याठिकाणी दारिद्र्य रेषेखालील यादी आपल्या सभागृहापुढे अवलोकनार्थ आपण ठेवल्याबद्दल प्रथमतः आपले आभार मानतो......

**मिलन म्हात्रे :-**

चुकीची यादी आहे ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

लार्सन ॲन्ड टुब्रोममध्ये कामाला आहेत त्यांचे नाव आहे.

**मिलन म्हात्रे :-**

त्यांचा सत्कार करा. चांगल्या कामाचे आभार माना. आम्ही तुमच्या बरोबर आहेत. एकीकडे आम्ही चुका काढतोय त्या थोड्या आहेत........

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी माझे वक्तव्य पुर्ण केलेले नाही आणि हे सन्मा. सदस्य मध्येच इंटरअप्शन करत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

त्या माणसाच्या वडीलांचे नाव लिहलेले नाही आणि आपण आभार कसले मानता?

**लिओ कोलासो :-**

सन्मा. सदस्यांचे म्हणणे आम्ही ऐकलेले आहे. आम्हालाही आमचे विचार मांडू द्या.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे एक सदस्य बोलत असताना त्यांचे वक्तव्य पूर्ण होउ द्या. त्यानंतर तुम्ही बोला.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी आपल्याला यासाठी धन्यवाद देतो की ..........

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, हम लोगोने यह शिक्षा इनसे ही लिया है।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, मी आपल्याला मुद्दामहून यासाठी धन्यवाद देतो की, या शहरात गरीब माणसे आहेत. या शहरात दारिद्र्य रेषेखालची माणसे आहेत. त्यांना आधार देण्यासाठी आपण एक चांगले काम केलेले आहे. मी तुम्हाला धन्यवाद देतो, प्रशासनाला धन्यवाद देतो. प्रशासनामध्ये अनंत चुका होत असतात आणि त्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी आपल्याकडे हे अवलोकनार्थ आलेले आहे. ह्याच्यामध्ये काय चुका आहेत हे मा. महापौर साहेबा मी आपल्याला निदर्शनामध्ये मुद्दामहून आणून देवू इच्छितो. ही यादी बनवताना, सभागृहापुढे ठेवताना किंवा नोटीस बोर्डावर लावताना या यादीमध्ये गावनिहाय किंवा पाडानिहाय माहिती दिली असती किंवा सांख्यिकी दिली असती तर फार बरे झाले असते. ते दिलेल नाही. त्याचसोबत मी ज्या भागाचे प्रतिनिधीत्व करत आहे त्याठिकाणच्या चुका आहेत. त्या काय चुका आहेत? एका सदस्याने सांगितले की, लार्सन ॲन्ड टुब्रोमध्ये कोण आहे त्याचे नाव जरुर कट करायला पाहिजे. त्याची बाजू घेण्यासाठी कोणीही येथे बसलेले नाही. परंतु, यादीमध्ये आमचा जो या परिसरामधला मासेमार आहे, शेतकरी आहे, ख्रिस्ती समाजाचा दारिद्र्य रेषेखालील माणूस आहे त्याचे ९५% नाव या यादीमध्ये चुकवलेले आहे. त्याच्या स्पेलिंगची सगळी वाट लावलेली आहे म्हणून या स्पेलिंग प्रथमतः दुरुस्त करायला पाहिजे. मी मुद्दामहून आपल्या निर्दशनास आणून देवू इच्छितो की, याठिकाणी जसे लार्सन ॲन्ड टुब्रोचा उल्लेख झाला त्याप्रमाणे ६,२४८ नंबरच्या लाभार्थीचे नाव आलेले आहे तो मनुष्य सहा वर्षापूर्वी मरण पावलेला आहे. ते नाव यादीतून डिलाईट व्हायला पाहिजे. त्याचबरोबर ६,५८३ ते ६,५८८ ह्यांचे पत्ते चुकवलेले आहे. त्याचप्रमाणे ६,८०६ ते ८,००६ ८,०६९ चा पत्ता चुकलेला आहे. त्यानंतर ७,१२६ ते ७,१७८ चा पत्ता चुकलेला आहे. बाकीची काही नावे आलेली आहे. ६,७११

ते ६,७२०, ६५३६, ते ७५४३, ७८४२ ते ७८७५ आणि ९०४३ ते ९०५२ ही नाव इथे तिथे घुसवलेली आहेत. ती रोमध्ये आलेली नाही. तर एवढ्या दुरुस्त्या त्या यादीमध्ये आपण घ्याव्यात अशी मी आपणाला विनंती करतो.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, इसमे हम लोगोको ऑब्जेक्शन लेने को टाईम दो।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर मॅडम, चर्चा मे भाग लेनेवालो जिन सदस्योने ऑब्जेक्शन लिया है उनके नाम दुरुस्त करके सुधारीत नाम फिर आपके सामने लाया जाए।

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, पहले तो हम सभी सदस्यको यह यादी दो और उसके बाद मे ऑब्जेक्शन लेने के लिए टाईम दो।

(सन्मा. सदस्य श्री. महेंद्रसिंग चौहाण यांनी प्रकरण क्र. ११२ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, हमको चर्चा करने दो।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आम्हाला चर्चा करु द्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

यह यादी ५० टक्का खोटी है।

**रोहित सुवर्णा :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाणजी अभी क्यो बोल रहे हो, ठराव मांड रहे हो।

**परशुराम पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

इतर सदस्यांना बोलायला दिले आहे. आपण सर्वांनी बसून घ्या.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य महेंद्रसिंग चौहाणजी अभी आपने ठराव क्यों पढा?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, केंद्र सरकार व राज्य सरकारने तसेच, प्लानिंग कमिशनने नियोजन आयोगाने जे निकष आपल्याला दिलेले आहेत. त्या निकषाप्रमाणे सर्व्हे झालेला नाही. कारण आत्ता ज्याप्रमाणे सन्मा. सदस्य अनंत रामचंद्र पाटील यांचे नाव घेण्यात आले तेव्हा सन्मा. सदस्य उभे राहिले. पण मी आपल्याला ठामपणे सांगू शकतो की, या सभागृहाच्या नगरसेवकाचे नाव त्या यादीमध्ये आहे. पण जो नगरसेवक आज येथे नाही म्हणून मी त्यांचे नाव घेत नाही. पण मी आपल्याला सांगेन, आपल्याला दाखविन त्या नगरसेवकाकडे एक नाही तर दोन गाड्या आहेत. एक-एक, दोन-दोन दुकाने आहेत. त्यांचे धंदे आहेत. त्यांच्याकडे कलर टी.व्ही आहे, फ्रिज आहे, त्यांच्या हातात दोन दोन मोबाईल आहेत. अशा नगरसेवकांचे नाव देखिल याच्यामध्ये आहे. महानगरपालिकेचे कॉन्ट्रॅक्टर आहेत मी पाहिजे तर आपल्याला सिरीयल नंबर सांगेन. कृपया, आपण ती यादी बघावी. नगरसेवकाचे नाव मी सांगेन.

**मिलन पाटील :-**

नाव घ्या ना.

**रोहित सुवर्णा :-**

ते सन्मा. सदस्य याठिकाणी नाही. मा. महापौर मॅडम, नेहमी आपण बोलतात सभागृह नेते बोलता. जो नगरसेवक सभागृहामध्ये हजर नाही त्याचे नाव घेउ नका. म्हणून मी नाव घेत नाही. पण मी आपल्या दालनामध्ये येईल आणि आपल्याला सांगेन, आपल्याला दाखविन.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सिरीयल नं. ६०४५, ६०४४.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, आधा घंटा चर्चा के लिए दिजिए। बाकी जैसा आपने बताया की, आधा घंटा जनरल चर्चा के लिए देंगे।

**रिटा शाह :-**

मॅडम, इसमे हमारी एक सुचना इन्क्ल्युड कर लिजिए की, जिनका सर्व्हे बाकी रह गया है उनको भी इसमे इन्क्ल्युड करिए।

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्लानिंग कमिशनने देखिल सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने संबंधी काही गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. त्याचे देखिल उल्लघंन झालेले आहे. हे मी सर्व आपल्या निर्दशनास आणेन कारण

आता फक्त अर्धा तास राहिला आहे. तसेच, नागरिक दारिद्र्य निवारण कार्यक्रमा संबंधी स्थानिक स्वराज्य संस्थेने काही डायरेक्शन, निकष दिलेले आहेत. त्याचे देखिल उल्लंघन झालेले आहे. ज्याप्रमाणे एका कुटूबांमध्ये कुटूंब म्हणजे पती आणि पत्नी आणि त्यांचे जे दोन तीन मुले असतील ते. पण याठिकाणी नवरा आणि बायकोचे नाव वेगवेगळे दाखविण्यात आलेले आहे. एका खाली एक, नव-याचे नाव वर आहे आणि बायकोचे नाव खाली आहे. असे देखिल घरे आपल्या निर्दशनामध्ये सोमवारी आणेन. याच्यामध्ये सन्मा. नगरसेवकाचे नाव आहे आणि जर नसेल तर माझा राजीनामा लिहून मी सोमवारी आयुक्त साहेबांकडे देईन. नाव नसेल तर. त्या नगरसेवकाचे नाव जर ह्याच्यामध्ये नसेल तर सोमवारी मी आयुक्तांकडे राजीनामा देईन. त्यामुळे माझा या यादीला विरोध आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

एक महिने के लिए रहने दो। बाद मे चार महिने के बाद अपने आप हो जाएगा।

**मिलन म्हात्रे :-**

तुमचे नगरसेवक राजीनामा देण्याची नुसती नाटकं करतात. पण आमचे नगरसेवक सांगतात की, आम्ही आयुक्तांकडे राजीनामा देतोय. याचे गांर्भीय आपण लक्षात ठेवा. ही टिंगळ टवाळी करु नका.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप राजीनामा देकर तो देखो।

**मिलन म्हात्रे :-**

जो नगरसेवक का नाम है उसकी बात करो। शायद, आपका ही नाम नही होगा।

**रोहित सुवर्णा :-**

आपके ही पार्टी नगरसेवक का इसमे नाम है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सन्मा. सभागृहातील सदस्यांनी शांतता ठेवा. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत ........

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, या यादीला माझा विरोध आहे. डॉ. आंबेडकर नगर आणि भोलानगर इथल्या लोकांची नाव नाहीत. जे बिचारे गरीब आहेत. जे आपल्या महानगरपालिकेत रोजंदारीने काम करतात. त्यांची नाव नाही. ज्याठिकाणी एका कुटूंबाची व्यक्ती मेली असेल तर तो निकष देखिल याठिकाणी धरलेला नाही. कलम २ मध्ये स्पष्ट लिहीलेले आहे. ज्याठिकाणी स्त्री कुटूंब असते, कुटूंबाची प्रमुख जर एक स्त्री असेल त्या घराचे नाव देखिल ह्याच्यामध्ये आले पाहिजे. या निकषाचे उल्लंघन झालेले आहे. तसेच मुर्धा खाडी येथील बुबू आगार, शिवप्रसाद आगार, जांभळीचे घर, मोठे आगार या ठिकाणी रेवाआगर आहे याठिकाणच्या लोकांची नावे त्याच्यात नाही. तरी कृपया आपण ती नावे शामील करुन घ्यावी.

**मा. महापौर :-**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत सर्व्हेक्षण केलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटूंबांची यादी आज मा. महासभेसमोर ठेवण्यात आली. सन्मा. सभागृह व सदस्यांनी या यादीमध्ये असलेल्या अनेक चुका व ब-याच जणांची या सर्व्हेक्षणामध्ये नावे वगळली गेलेली आहेत. तर ह्या नावाची पुन्हा नोंदणी करुन घेणे व त्यांची नावे या यादीमध्ये समाविष्ठ करुन घेणे हे गरजेचे आहे. कारण मिरा भाईंदर शहरामध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटूंब यांना योग्य न्याय मिळवून देण्यासाठी संबंधित विभागातील नगरसेवक तसेच नेमून दिलेले अधिकारी यांनी त्यांची नावे या यादीमध्ये नोंदणी करुन घ्यावीत व सभागृहातील सदस्यांनी मांडलेल्या सर्व सुचना ........

**मिलन पाटील :-**

जी चुकीची नावे आहेत ती वगळण्यांत यावीत.

**मा. महापौर :-**

सर्व सदस्यांनी ज्या सुचना दिलेल्या आहेत त्या सुचनेसह ........

**रोहिदास पाटील :-**

मॅडम, जी चुकीची नावे आहेत ........

**परशुराम पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा यांनी आता आपल्या समोर जे दारिद्र्य रेषेखालच्या लोकांचा सर्व्हे केलेला आहे .......

**मा. महापौर :-**

सर्व नगरसेवक आले, सर्व सदस्य आले. त्यांच्या सगळ्यांच्या सुचना त्याच्यामध्ये आल्या.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सदस्योको पहले यादी दिजिए।

**परशुराम पाटील :-**

जो सर्व्हे केलेला आहे त्याच्यामध्ये लोकांची नावे नाहीत व जो कोणी ठेकेदार आहे त्याला आपण दारिद्र्य रेषेखाली घेतलेले आहे ह्याचे आपण ..........

**मिलन म्हात्रे :-**

आपण ही जी यादी प्रसिध्द करणार त्याला टाईम लिमिट आहे की, नाही. आम्ही कधीपर्यंत तुम्हाला कळवायचे? हे वर्षभर चालत राहणार. ह्याला टाईम बॉन्ड लिमिट द्या की, एक महिन्यामध्ये आम्ही करायचे की, पंधरा दिवसामध्ये आणायचे. पुढच्या मिटींगमध्ये ठेवणार आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, ठराव पास करनेके पहिले सब सदस्य को इसकी यादी दो और एक महिने का टाईम दो।

**रोहिदास पाटील :-**

आपण ही यादी पुढच्या मिटींगला घ्या आणि लोकांना न्याय मिळेल.

**मा. महापौर :-**

सभागृहाला सांगण्यात येते की, ज्यांची दारिद्र्य रेषेखाली नावे नाही त्यांचे नाव नोंदवून घ्या. त्यासाठी एक महिन्याची मुदत व तसेच, ज्यांची नाव चुकून आलेली आहेत त्यांची नावे वगळण्यात यावीत. अशा आशयासह ठराव पूर्ण मंजुर.

**मिलन म्हात्रे :-**

आणि ती यादी परत दिली पाहिजे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, जो गलत नाम डाला है और उसके उपर सन्मा. सदस्य लिओ कोलासोजीने बोला की, वह अधिकारी पर कारवाई होनी चाहिए।

**मा. महापौर :-**

यादीमध्ये नावे नोंद करु.

**शिवप्रकाश भुदेका :-**

वह अधिकारी पर कार्यवाही होनी चाहिए।

**मा. महापौर :-**

सचिवांनी पुढील विषयाला सुरुवात करावी.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ज्या नगरसेवकाचे नाव त्या यादीमध्ये आहे त्याचे नाव काढणार नाही का?

**मा. महापौर :-**

नगरसेवकांची नावे वगळून.

**प्रकरण क्र. ११२ :-**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत सर्वेक्षण केलेली दारिद्र्य रेषेखालील कुटुंब यादी मा. महासभेच्या निदर्शनास आणून देणे बाबत.

(मा. महापौर सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरील प्रस्ताव तहकूब करण्यात आला.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ११३ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, महाराष्ट्र शासनाचे १८ सप्टेंबर २००१ चे परिपत्रक आहे त्याच्यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, नामफलक इतर कोणत्याही भाषेत असला देवनागरी व्यतिरिक्त तर त्यातील जी अक्षरे आहेत ती देवनागरी म्हणजे मराठी भाषेपेक्षा कमी उंचीची असावीत आणि मराठी राज्यभाषा असल्यामुळे तिला आस्थापनेवर प्रथमस्थान देण्यात यावे. याच्यापुढे मिरा भाईंदर शहरामध्ये कोणत्याही दुकाने, संस्थापकाने बोर्ड, फलक लावत असताना पहिले अद्याक्षर हे मराठीतच असेल आणि इतर भाषेमध्ये असले तर आपल्याला त्याचे काही ऑब्जेक्शन असणार नाही. फक्त मराठी भाषेपेक्षा ती अद्याक्षरे ही लहान टाईपमध्ये असली पाहिजे असा मी ठराव मांडीत आहे.

**संगिता म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, या सुचनेवर शॉप बाय नॅशनल एस्टाब्लिशमेंटचा जो कायदा आहे. त्याच्यामध्ये स्पष्ट तरतुद आहे. आपण ते पुस्तक विधी अधिका-यांकडून मागवून घ्या व त्याच्यातल्या तरतुदी करुन घ्याव्या लागतील.

**प्रभात पाटील :-**

मॅडम, तसे शासनाचे परिपत्रक आहे. ते मी तुम्हाला देते.

**प्रकरण क्र. ११३ :-**

सन्मा. सदस्या श्रीम. प्रभात प्रकाश पाटील यांचे दिनांक १५/०१/२००७ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. - दुकाने व अस्थापना यांच्या नाम फलकावर मराठी भाषेतील अक्षरे सर्व प्रथम लिहिली जाणे आवश्यक करणे बाबत.

**ठराव क्र. ८८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सर्व दुकानांवर असलेले नाम फलक मराठी, हिंदी, गुजराथी, इंग्रजी आदी बऱ्याच भाषा आहेत.

ह्याबाबत महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण १८ सप्टेंबर २००० भाद्र २७ शके १९२२ मध्ये नियम करण्यात आले आहेत. त्यात महाराष्ट्र दुकाने व अस्थापना नियम १९६१ च्या नियम २०(अ) मध्ये विद्यमान परंतुकानंतर काही नवीन भर घालण्यात आली आहे. त्यानुसार देवनागरी लिपी अक्षरे इतर भाषेतील किंवा लिपीतील वापरलेल्या अक्षरांपेक्षा कमी ठळक नसावीत.

तसेच मराठी राजभाषा असल्याने पालिका हद्दीतील दुकाने व अस्थापना यांच्या नामफलकावर मराठी भाषेतील अक्षरे सर्व प्रथम लिहिली जावीत असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील. अनुमोदन :- श्रीम. संगिता म्हात्रे.**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मिलन म्हात्रे :-**

ती कायद्यामध्ये तरतुद आहे आणि आपल्याला तो ॲक्ट करायचाच आहे व ऑलरेडी बी.एम.सी. करते.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सकाळी मी हा विषय काझला होता, सी.ई, झेड. चा विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन, डोगंरी - चौक हा परिसर घेतला गेल आहे आणि अशात-हेने तो गेला आहे की, नाही? त्या संदर्भात आयुक्तांनी तसे निवेदन करावे. अशा त-हेचा शासन निर्णय, प्रत महानगरपालिकेला आलेली आहे. मात्र त्या प्रतीचा नगरसेवकांना कोणत्याही प्रकारचा कानोसा लागलेला नाही. तर आयुक्तांनी तसा खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपण जी सुचना मांडली आहे ती परत एकदा मांडावी.

**अनंत पाटील :-**

महाराष्ट्र शासनाने एस .ई. झेड., विशेष आर्थिक क्षेत्र म्हणून जवळ जवळ ७२ ठिकाणी झोन तयार केलेले आहेत. त्यामध्ये राई, मोर्वा, मुर्धा, उत्तन, डोगंरी - चौक, तारोडी ही गावे त्याच्यामध्ये समाविष्ठ केलेली आहेत. हे समाविष्ठ केलेले आहे की नाही? ते आजतागयात नगरसेवकांना सुध्दा कल्पना नाही. पण तशातऱ्हेचे पत्र मात्र महानगरपालिकेला आलेले आहे. त्याबद्दल खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

एस. ई. झेड. बाबत संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपण इतक्या अनभिज्ञ कशा राहता? गेल्या मा. महासभेमध्ये सुध्दा मी सांगितले होते की, पेपरला जाहिर नोटीस आलेली आहे. त्याच्यामध्ये जिल्हाधिकारी महापालिका कार्यालय, ह्याच्यामध्ये मी नोटीस बघायला मिळेल, नागरिकांसाठी. आता तुम्हालाही माहित नाही. आयुक्तांनाही माहित नाही. आपण तो पेपर लावला नाही. गेली मा. महासभा गेली आणि आज मा. महासभा सुरु आहे व आता विषय येत आहे. तरी त्याच्यावर आपल्याला काय रुची नाही. आपले अधिकार जातात. आयुक्तांचे अधिकार जातात. नागरिकांवर कोणता परिणाम होणार आहे. ज्या नागरिकाचे हिताचे आपण बघतो. त्या नगारिकांचे संपूर्ण अधिकार जातात. जातात की नाही जातात. जर जात नसतील तर त्याचे आपण निवेदन करा. जर जात असतील त्याचे निवेदन करा. नंतर महापालिकेचे किती नुकसान होत आहे त्याचे निवेदन करा. आमच्या माहितीनुसार त्याच्यामध्ये, याच्यापुढे अजून काही सिरीयस झाले नाही. आयुक्तांनासुध्दा कोणताही अधिकार राहत नाही. एक स्वतंत्र राज्यासारखे राज्य तयार होणार आहे. त्याचा विकास ते करतील. त्याचे निर्णय ते घेतील. इतका गांर्भीयाचा विषय असून सभागृहाला किंवा अधिकाऱ्याला माहित नाही.

**अनंत पाटील :-**

आपण आयुक्तांच्या कार्यालयामध्ये हे पत्र पोहचलेले आहे. दि. २१/११/२००० रोजी पत्र पोहचले आहे आणि दि. २१/११/२००६ ला हे पत्र श्री. घेवारे साहेबांनी स्विकारलेले आहे आणि त्यात सर्वच मुख्यमंत्र्यांपासून

जे जे खाजगी सचिव आहेत त्यांनी मिटींगसुध्दा घेतलेल्या आहेत आणि त्याच्यामध्ये महाराष्ट्र शासनाने जी.आर. काढलेला आहे. म्हणजे मिटींग झालेली आहे. त्यात सर्व लिहीलेले आहे. पॅन इंडिया पर्यटन लिमिटेड वतीने अध्यक्ष सुभाषचंद्र ह्यांनी कंपनी आणि एस्सल ग्रुप व महत्वाच्या प्रकल्पाची माहिती दिली. तसेच कंपनी मार्फत मुंबई उपनगरातील मनोरी, गोराई, ठाणे जिल्ह्यातील उत्तन, डोंगरी चौक, तारोडी, पाली, राई, मुर्धा, मोर्वा ही आठ गावं मिळून एकूण दहा गावांमध्ये करमणूक पर्यटन उद्योगावर आधारित विशेष आर्थिक क्षेत्र एस.ई.झेड. उभारण्याचा कंपनीचा प्रस्ताव मुख्यमंत्री यांना आराखडा दाखवण्यात आलेला आहे आणि अशातऱ्हेचे पत्र महानगरपालिकेला ही आलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

आराखडा दाखवून पुन्हा तो त्यांनी मेरीटाईम्सकडे पाठविलेला आहे त्याच्यावर निर्देश दिलेले आहेत. ते ही पत्र आहे. पण माझ्या येथे नाही. ते ही दाखविले असते. मेरी टाईम्स डायरेक्टरांना ते पत्र पाठविलेले आहे. व त्यांना डायरेक्ट हॅन्डओव्हर केलेले आहे. आता फक्त सजेशन - ऑब्जेक्शनचा पिरीयड आहे व पिरीयड संपला की, तुमच्या हातात एक नोटीस मिळेल. तुम्ही तिथे काही करायचे नाही. खर्च ही करायचा नाही व एक ओळीची एन.ओ.सी. ची द्यायची नाही असे तुम्हाला पत्र मिळेल.

**अनंत पाटील :-**

आणि अशातऱ्हेचे पत्र. जिथे गावची मिटींग होती तेव्हा सन्मा. सदस्या नयना म्हात्रे ह्यांना पत्र दिले हाते ते श्री. जगताप नावाच्या सहा. नगररचनेला दिलेले होते. त्याच्यात असा उल्लेख केलेला आहे की.......

(सन्मा. सदस्य श्री. अनंत पाटील ह्यांनी सदर पत्राचे वाचन सभागृहासमोर केले.)

**अनंत पाटील :-**

या क्षेत्रातील सिमामध्ये मिरा भाईंदर महानगरपालिका अधिकार क्षेत्रामध्ये उत्तन, पाली, चौक, डोंगरी या गावांचा समावेश आहे. असे उत्तर तुमच्याकडून त्यांना मिळालेले आहे आणि तसेच उत्तर मला सुद्धा मिळालेले आहे. म्हणजे अधिकारी वर्ग, आमच्या नगरसेवकांना किंवा जबाबदार व्यक्तिंची दिशाभूल करतात की काय? हा प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून हे शासनाकडून पत्र तुम्हाला आलेले आहे. त्या पत्रामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. मुख्य म्हणजे दालनामध्ये झालेल्या मिटींगचा गोषवारा साहेब आपल्याकडे आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

श्री. जगताप आहे त्यांना विचारा ना. अधिकाऱ्यांना विचारा ना. अधिकारी आहेत ना.

**अनंत पाटील :-**

तुमच्याकडे पत्र आलेले आहे?

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, कागदपत्र येईपर्यन्त माझा विषय घ्या. सभागृहाच्या माहितीसाठी सांगते. वृक्षप्राधिकरण समितीचा विषय आहे. इकडे, सदस्य ही आहेत. मा. आयुक्त साहेब, अध्यक्ष आहेत. आम्ही तिथे पाच मिनिटे थोडे उशिरा गेलो. त्यांना शाप, श्रीफळ टोप्या देवून त्यांचा सत्कार केला. आणि आम्ही उशिरा गेलो तर आमच्या हातात नारळ ठेवण्यात आला. आणि एक टोपी दिली. आज तेरा लाख रु. खर्च करुन आपण हा प्रोग्राम आखतो. तर ८४ नगरसेवक गेले असते तर, तुम्ही त्यांच्या हातात काय दिले असते. तिथे बाकीच्यांना फ्लॉवर पॉट, शाल, श्रीफळ टोप्या दिल्या. आणि आम्हाला फक्त एक टोपी आणि हातात नारळ दिला. तर केशवसृष्टी च्या लोकांनी खरोखर ५०० रु. देवून तिथे स्टॉल लावलेले होते. त्यांना पहिजे बक्षिस देण्याच्या अगोदर, विभाग प्रमुख गणेश पाटील साहेब यांच्या बायकोला पहिले बक्षिस देण्यात आले. नंतर मुलीला बक्षिस दिले. परत, तिथे त्याचा सासरा कुठून आला त्यांना ही बक्षिस दिले. तर हे काय चाललेले आहे. याबद्दल मा. आयुक्त साहेबांनी स्वतः खुलासा करावा.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, वृक्षप्राधिकरण समितीच्या सदस्यांना ह्याचा काही उल्लेख केलेला नव्हता. आणि आमची काही मिटींग घेतलेली नव्हती. म्हणजे आपण ह्याच्यामध्ये प्रदर्शन भरले. ते बोलवायला पाहिजे होते. सदस्यांमध्ये ठरवायला पाहिजे होते. तर, त्याठिकाणी आमचा काहीही विचार केलेला नव्हता. आणि स्वतः, बायको, मुले. पूर्ण परिवारांचा सदस्य होता. आणि आपणच पहिले बक्षिस घेवून जातो. आणि बाहेरचे लोक आलेले नव्हते. हे सगळे आपल्या भाईंदरचेच होते. म्हणजे हा ठेकाच झाला ना. आपण ठेकेदारालाच पूर्ण भरती करतो. आणि मा. महापौर मॅडम, १३ लाख रु. च्या खर्चाचा हिशोब द्यायचा आहे.

**लिला पाटील :-**

संध्या नर्सरीला ५ हजार रु. मुलीला दोन हजार रु. आणि त्याच्यात होते काय? सगळ्या विकत आणलेला भाज्या. सगळ्या पेपरमध्ये बातम्या आलेल्या आहेत. आणि प्रशासनाची बदनामी झाले. तर, मा. आयुक्त साहेब याच्यावर तुम्ही खुलासा करा.

**शुभांगी नाईक :-**

मा. महापौर मॅडम, जरा याचा खुलासा करा ना.

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहब ने बोला था की, डायरेक्ट इसको केबल पर रिले करनेका। उसके बारमे आपने क्या विचार किया?

**लिला पाटील :-**

नवशक्ती पेपरला आलेले आहे. वार्ताहर पेपरला आलेले आहे, पुण्यनगरी पेपरला आलेले आहे. प्रत्येक पेपरला आलेले आहे.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, संबंधित अधिकाऱ्यांना विचारा ना. श्री. जगताप साहेब आलेले आहे. त्यांनी ह्याचे उत्तर द्यावे. काय आहे ते.

**लिला पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, खुलासा करतात की नाही.

**मिलन पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, श्री. जगताप साहेब आलेले आहेत तर त्यांना विचारा ना. सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेबांनी पत्राच्या बाबतीत प्रश्न विचारलेले आहे ना. तर त्या पत्राच्या बाबतीत खुलासा करायला सांगा.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य अनंत पाटील यांनी एस्.ई.झेड बद्दल विचारणा केली आहे. डोंगरी , चौक, तारोडी, पाली, राई, मुर्धा, मोर्वा ही आठ गावे यामध्ये समाविष्ट केलेले आहे. असा त्यांनी त्यांचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. आणि ह्याची बैठक मुख्यमंत्र्याकडे झालेली आहे. तर, संबंधित ह्या विषयासंदर्भात या विभागातील जे सर्व नगरसेवक आहेत. परत, सर्व पक्षाचे गटनेते, यांची एकत्रित मिटींग ही मंगळवारी दु. १२ वाजता महापौर दालनामध्ये या विषयावर चर्चा करण्यासाठी ही मिटींग ठेवलेली आहे. तर, आपण सर्व नगरसेवकांनी मिटींगला हजर रहावे.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याचा खुलासा द्या.

**मिलन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, बुधवारी मिटींग ठेवा ना.

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याचा खुलासा हवा.

**मा. महापौर :-**

संबंधित विषयासाठी मिटींग ही बुधवारी ठेवण्यात येईल त्या संबंधी आपल्याला पत्र ही देण्यात येईल.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सन्मा, सदस्य मिलन म्हात्रे यांचा प्रश्न ७९ चा होता. तर, त्यामध्ये प्रशासनाच्या वतीने उत्तर देण्यात आलेले आहे.

**नयना म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, ही मिटींग कुठे लावले?

**मा. महापौर :-**

एका-एका सदस्यांनी बोला.

**प्रकाश दुबोले :-**

सुचक आणि अनुमोदक यांच्या सह्याची आवश्यकता आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी बसून घ्या. सन्मा. सदस्या लिलाताई पाटील यांनी विचारलेल्या प्रश्न असा आहे की वृक्षप्राधिकरण समितीबाबत खुलासा मागितलेला तर त्या संबंधित अधिकारी किंवा मा. आयुक्त साहेब, हे ह्या विषयाचा खुलासा करतील.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त साहेब, इस शहरमें...

**शिवप्रकाश भुदेका :-**

मा. महापौर मॅडम, आपने मा. आयुक्त साहब को खुलासा करनेको बोला था। तो ये आयुक्त है क्या?

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. आयुक्त साहेब, आपण उस समिती के अध्यक्ष है। मैंने आपको उस बारेमे रितसर पत्र लिखा था। आपने उसमे कमिटी बनाई थी और उसमे ५ जजेस थे। ५ जजेस ने निर्णय देके सर्व संमती से एक प्राईज वगैरे निश्चित किए थे। प्रोग्राम बहोत अच्छा हुआ, ॲप्लीसिएशन मिला, ४० पेपर मे न्यूज आई, प्रेस रिले थी। देनेके बाद हमलोग जब स्टेज पे बैठे थे। तभी खतगांवकर साहब भी चले आये। उसके बाद ओव्हर हाऊस जो एक प्राईज होता है। तो एक अधिकारीने आपने परिवार को दिया। उस समय हम पाच लोगो की इतनी

इनसल्ट हूई की, तभी हमको ऐसा लगा जजेस की इनसल्ट करना भी बहोत अजिब सा होता है। और वहाँपर मुझे एक मिनिट रुकना असहनीय हो गया।

**रोहिदास पाटील :-**

तभी रिवाईज कर देने का था।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उस हादसे के बाद मैंने आपको रितसर पत्र दिया मा. महापौर मॅडम, को पत्र दिया। लेकिन स्टील दिस टूडे. अभी तक आपके तरफसे कुछ सुननेको नही आया। अगर, आप इस तरहे से कंट्रोल नही करेंगे तो यह छबी इस स्टाफ की, कैसी बन सकती है।

**सुधा गोयंका :-**

मा. महापौर मॅडम, यह सवाल हमने उठाया और जबाब वह दे रहे है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

उसके प्रुफ देखीए। उन्होने अपने खुद परिवार को प्राईज दिया। और जिनको प्राईज मिला उसके बावजूद भी इनको एक प्राईज मिला। तो यह उचित है क्या?

**लिला पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा कुटूंबाचा प्रोग्राम नव्हता. आणि तिथे तुम्ही आमचा अपमान करायला बोलवले होते काय?

**मा. आयुक्त :-**

वृक्षप्राधिकरण समितीने जो एका प्रदर्शनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या संदर्भामध्ये कमिटीने ज्या तक्रारी दिलेल्या आहेत. त्या कमिटीच्या तक्रारी मी संबंधित जे अधिक्षक आहेत खाते प्रमुख आहेत. त्यांना त्याबाबतीमध्ये कारणे दाखवून नोटिस दिलेले आहे. आणि त्यांना कारणे दाखवून नोटिसचे उत्तर आजच मला आलेले आहे. आणि मी फाईल माझ्या टेबलवर आता आहे. त्या बाबतीमध्ये मी सोमवारी निर्णय घेईल. आणि मंगळवारी मा. महापौर दालनामध्ये जी बैठक आहे त्या बैठकीमध्ये ह्याच्या बाबतीत जो काय निर्णय होईल तो निर्णय आपल्याला त्या ठिकाणी सांगेल.

**शुभांगी नाईक :-**

१३ लाख रु. चा सगळा हिशोब दाखवणार ना.

**रोहिदास पाटील :-**

ह्या बाबतीमध्ये अधिकाऱ्यांच्या बाबतीत निर्णय घेत्यावेळी एखादा सदस्य तक्रार करतो. म्हणून तुम्ही निर्णय घेवू नका. कारण, या सभागृहामध्ये....

**लिला पाटील :-**

साहेब, या अधिकाऱ्यावर काय कारवाई कराल?

**रोहिदास पाटील :-**

या सभागृहामध्ये ह्या कामकाजामध्ये नगरसेवकांनी तक्रार केली की, लगेच तुम्ही निर्णय देता. तर तुमची शहानिशा करुन तुमचा अहवाल तयार करुन घ्या. मी, सभागृहाचे लक्षवेधू इच्छितो. एका नगरसेवकांनी एका प्रामाणिक शिक्षकाची तक्रार केली आणि त्या शिक्षकाची तुम्ही बदली केली तर, साहेब हे अयोग्य आहे. हे तुम्हाला बिल्कूल शोभा देत नाही. शिक्षण क्षेत्र आहे. तर शिक्षण क्षेत्र पवित्र राहिले पाहिजे. नगरसेवकांची, नगरसेविकांची अक्कल कुठपर्यंत असते. हा विषय वेगळा. पण तुम्ही जरासुद्धा शहानिशा केली नाही.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मा. महापौर महोदय, 'काका' बहोत होशियार है बहोत समझदार है। किसी नगरसेवक ने नही की, एक केशवसृष्टी की बी.एम्.एस्. डॉक्टर.......

**रोहिदास पाटील :-**

उनको लिबर्टी दिया है ना। हमे जो अनुभव है वह हमने मा. आयुक्त साहेब को बताया।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप सही है। लेकिन विभाग जहा तक आता है...

**रोहिदास पाटील :-**

मा. आयुक्त साहेब सचमुच उसका निराकरण करना मंगता है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

आप भारतीय जनता पार्टीचे हिसाब से बात मत करिए। केशव सृष्टी की बी.एम.एस. डॉक्टर उसमें बेकायदा लिखा है।

**रोहिदास पाटील :-**

वृक्षप्राधिकरण समिती मे भारतीय जनता पार्टी के सदस्य रहते थे तो यह हालत नही होती थी।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

एक आर्किटेक्ट इंजिनियर है उसने कंम्प्लेट की है की एक नगरसेवक है कहनेका मतलब यह है की इस तरह की ज्ञानता आप इतने होशीयार हूए ऐसी बात क्यो करते है की, एक नगरसेवक की कंम्प्लेंट है। नगरसेवक की इमेज नही है। वॉर्ड जजेस की कंम्प्लेंट है।

**शशिकांत भाईर :-**

मा. महापौर मॅडम, वृक्षप्राधिकरण समितीचा खुलासा आपण करणार आहोत. तर, माझ्या प्रश्नाचे उत्तर प्रशासनातर्फे देताना आपल्याला जे मंचावर कोण कोण बसणार ह्यासाठी अधिकारी वर्ग हे सर्वच्या सर्व बसतात. तर, त्यापैकी नक्की कोण बसणार. त्याचा आपण खुलासा केला नाही. त्याबद्दल मी आपल्याला पत्र दिलेले आहे.

**शिवप्रकाश भुदेका :-**

सन्मा. सदस्य चौहाण साहब भारतीय जनता पार्टी के पक्ष का कोई सदस्य वृक्षप्राधिकरण समिती मे होते तो आपकी इज्जत खराब होने की नौबत आती नही थी। आपकी इज्जत बचाके रखते थे।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, जानेवारी संपत आलेला आहे. आम्हाला अजून डायरी काय मिळत नाही. तर, आम्हाला डायरी कधी मिळतील?

**शशिकांत भोईर :-**

मा. महापौर मॅडम, केबिन रोडला पाणी साचते. आता पाणी जाण्यासाठी कुठे मार्ग नाही. रेल्वेचे काम जोरात चालू आहे आणि तिकडे फक्त सहा इंच जागा आहे त्याच्यातून पाणी निचरा होतो. ह्याच्यापुढे आपण त्याबाबत काही ॲक्शन घेतली नाही तर, यावेळी केबिन रोडला पूर्णपणे पाणी साचून राहिल. तर, त्याबद्दल आपण खुलासा करावा. की, आपण काय कारवाई केली.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहेब यांनी जे सांगितले त्याबद्दल खुलासा करावा. जर ती कर्ल्वट झाली नाही. तर, खरचं केबिन रोड बुडणार आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी केलेली सुचना आहे. त्याबद्दल पुढच्या मा. महासभेमध्ये आपल्याला डायसवर नियमानुसार जे पदाधिकारी बसतात तेच पहायला मिळतील आणि इतर जे अधिकारी आहेत. ते खालच्या रांगेत बसतील.

**शशिकांत भोईर :-**

धन्यवाद मॅडम, नंतर कर्ल्वटसाठी तातडीचा विषय घेणे गरजेचे आहे. तर ह्या पावसाळ्यात आपण कर्ल्वट बांधले नाही. तर पूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये केबिनरोडचा जो परिसर आहे. तो पूर्णपणे पहिल्या माळापर्यन्त घेरू शकते. एवढे तिकडे पाणी साठेल त्याला पाणी निचरासाठी काहीही साधन नाही. कृपया आपण खुलासा करावा की, आपण कोणत्या स्टेजला आहोत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर यांनी कर्ल्वट आणि सभेविषयी आपण जो मागे सर्व्हे केला आणि त्याची नविन वर्षामध्ये आपण त्यादिवशी व्हिजीट केली. त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याने कुठपर्यंत कामकाजाचा पाठपुरावा झालेला आहे. ह्याची माहिती सभागृहाला द्यावी.

**मिलिंद वाणी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. कर्ल्वट आणि सभेच्या संदर्भात आपण त्यादिवशी डी.आर.ए. मालेस्तरांची भेट घेतली. आणि त्यांनी कबूल केली की, नविन वर्षाचा शुभेच्छा म्हणून तुम्हाला लवकरात लवकर मंजूर करुन देवू. तर त्या संदर्भात आपण कंन्टीन्यू फॉलोअप करतो. आपले जे डिझाईन होते ते त्यांनी कर्ल्वटच्या संदर्भात ॲक्सेप्ट केले नाही. त्यांनी त्या डिझाईनमध्ये सुधारणा करायला सांगितलेल्या आहे. आणि ते सुधारणा करुन आपण त्यांना ते पुट-अप करत आहोत.

**शशिकांत भोईर :-**

पुट-अप करायला साहेब पावसाळा यायला ४ महिने राहिलेले आहे. जर पुट-अप केले नाही तर पुढची कारवाई होणार नाही. कारण, मंजूरीला किती वेळ लागतो ते त्यांनी आपल्याला दाखवलेले आहे की, एक महिन्यात किंवा १५ दिवसात मंजूर करुन घेतो.

**मिलिंद वाणी :-**

आणि दुसरे सबवे होते. तर सबवेचा प्लॅन जो होता तो आपण त्यांच्याकडे डिटेलमध्ये सबमिट केला होता. तो प्लॅन त्यांच्याकडून कुठेतरी मिसप्लेस झाला होता. त्याच्यामुळे आपण त्यांना परत तो प्लॅन आणि सगळे डिटेल स्टेटमेंट तयार करून आपण त्यांना दिलेले आहे. आणि आता ते इन प्रोसेस आहे. मागच्या आठवडयात मा. महापौर मॅडम, यांच्याशी बोलण पण झाले. आणि मा. महापौर मॅडम, बोलला की, आपण डी.आर.एम. कडे जावू आणि फोनपण करु.

**शशिकांत भोईर :-**

पण आपल्याला ते कॅरिअर साठी मंजूरी कधी देणार आपला प्लॅन मंजूर झाला. आपण जो प्लॅन दिलेला त्यांनी ना मंजूर केला तर तो पुन्हा बनवणार आहे. मग, त्यासाठी आपल्याला ४ महिन्याचा पिरियड आहे आणि ४ महिन्यानंतर पावसाळा सुरू होईल.

**मिलिंद वाणी :-**

मी स्वतः एकदा जावून आलो या नविन वर्षात आणि मी तिथं धनंजय सिंग ची भेट पण घेतलेली होती. त्याच्यानंतर फॉलोअप करुन आपण त्यांना नविन डिझाईन पण सादर केलेले आहे. त्यांनी मागे सोळा महिने लावले. आपण प्रयत्न करतो की, त्यांनी लवकरात लवकर द्यावे आणि त्या संदर्भात मा. महापौर मॅडम, स्वतः येणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

जर आपण मॅडम यांना नेले तर लगेच तिथे मंजूरी देवून आपण कल्वटच काम सुरू करु शकतो का? याचा पहिला खुलासा करा ना.

**मिलिंद वाणी :-**

सबवेच काम लगेच सुरू होईल. सबवेच्या कामाला किती दिवस लागतील ते रेल्वेच्या प्रशासनावर आहे.

**शरद पाटील :-**

साहेब, तो जर कल्वट होत नसेल तर, त्याला पर्यायी रस्ता काढा ना.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला पर्यायी रस्ता काढून ठेवावा लागेल.

**शरद पाटील :-**

आपण पर्यायी रस्ता बघ शकत नाही त्याच्यावर काहीतरी तुम्ही बघा ना.

**शशिकांत भोईर :-**

पर्यायी रस्ता आपण कुठेतरी काढायला पाहिजे त्याची मंजूरी मिळो अगर न मिळो. पण त्या अगोदर पाणी निचरा होण्यासाठी पर्यायी रस्ता कुठेतरी बघायला पाहिजे.

**शरद पाटील :-**

जर कल्वट झाली नाही तर अतिशय भयानक परिस्थिती होणार आहे.

**सुधा गोयंका :-**

केबिनरोड तो डुबेगा ही डुबेगा। लेकिन पुरे मिरा भाईंदर शहर के उपर असर आयेगा। कारण, वहाँपर ६ इंच ही जगह है। ऐसे सन्मा. सदस्य शशिकांत भोईर साहब ने बताया है। आप अगर मंजूरी का इंतजार करते रहे और अगर एक महिने के अंदर आपने उसपर कार्यवाही नही की तो इसबार मिरा भाईदर शहर डुबनेकी पुरी शक्यता है। तो आप अभी यहाँपर खुलासा करिए की, अगर वो लोग पास नही करेंगे तो हम इस जगह का काम करेंगे। उसका खुलासा करिए ना।

**शशिकांत भोईर :-**

पर्यायी व्यवस्था करनी चाहिए। मा. महापौर मॅडम, त्याच संदर्भात बोलतो की महापौरांच्या क्षेत्रांमध्ये फिर्यादी बसतात. त्याच्यावर कारवाई होते. कारवाई झाल्यानंतर परत अधिकाऱ्यांच्या दबाव येतो. पुन्हा आम्ही अधिकाऱ्यांनी सांगितले की लगेच सुरू होतो. आणि परत, दबाव येतो, तर एकदाच काहीतरी तुमची सुसुत्रता दाखवा. आणि अशी रुलिंग द्या की,ना फेरीवाला क्षेत्रामध्ये बसणाऱ्यांना कायम स्वरुपी हटवण्याचा अधिकाऱ्यांना आदेश द्या.

**रोहिदास पाटिलः-**

मा. महापौर मॅडम, ह्यावर काय चर्चा करायची. तुम्हाला माईक वरुन बोलायचे आहे. मॅडम, ना. फेरीवाल्याबद्दल तुम्हाला चर्चा करायची नाही. तुम्ही सभागृहाला आश्वासन दिले असे सांगा ना की, त्याची सक्त कारवाई करायची.असे बोला ना.

**शशिकांत भोईरः-**

मा. महासभेत हा विषय झालेला आहे. त्याच्यावर साहेब, निवेदन पण झालेले आहे. तर,मॅडम आपण फक्त रुलिंग द्या की, कारवाई कायम स्वरुपी झाली पाहिजे.

**हॅरल बोर्जीसः-**

मा.महापौर मॅडम, घोषित जे ना फेरीवाला क्षेत्र आहे.त्याच्यावरती कारवाई करायला प्रशासनाला अडचण नाही. परंतु, इतर ज्या ठिकाणी जो विषय आहे.त्या संबंधामध्ये मा. आयुक्त साहेबांनी,आपल्याकडे तसे परिपत्रक पाठवलेले आहे.

**शशिकांत भोईरः-**

ना फेरीवाला क्षेत्रामध्ये कारवाई होत नाही. हे पुन्हा सांगतो.

**रोहिदास पाटिलः-**

मी, घोषित साठीच बोलतो.

**शशिकांत भोईरः-**

आम्ही ना घोषितसाठी बोलत नाही. घोषितसाठी बोलतो.

**मा.महापौर :-**

घोषितसाठी केलेले ना फेरीवाला क्षेत्र जे आहे.तिथे अतिक्रमण होते.त्यांना हटवण्याचे आदेश मी प्रशासनाला देत आहे.आणि त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

**शशिकांत भोईरः-**

मा.महापौर मॅडम, कल्वेट बांधले नाही. तर, पर्यायी व्यवस्था काय आहे? त्याचा आपण काहीही खुलासा केला नाही. कल्वेट बनले नाही. तर, पर्यायी व्यवस्था काय आहे? पाणी निचरा होण्यासाठी?

**दिपक खांबितः-**

कल्वेट नाहीच आहे. आतापर्यंत कल्वेट कुठे होते.

**शशिकांत भोईरः-**

कल्वेट नव्हते. पण पाणी जाण्यासाठी जो मार्ग होता तो दिड-दिड फुट होता.आता फक्त सहा इंचच राहिलेला आहे. त्यामुळे पाणी जाणारच नाही.

**दिपक खांबितः-**

त्याच्यावर जी लाइन आहे ती वरती करुन घेतो.

**शशिकांत भोईरः-**

कोणती? कोणताही लाईन वारती करु शकत नाही. कारण,आता पाण्याचे पाईप लाईन टाकण्याचे काम जवळ आलेले आहे.

**दिपक खांबितः-**

स्टेमला आपण जो बेन्ड काढतो.

**शशिकांत भोईरः-**

पाणी पुरवठा विभाग आणि बांधकाम विभाग यांनी दोघांनी सहमतीने खुलासा करावा.

**दिपक खांबितः-**

फाटक जवळच्या कल्वेटच आपण बोलतो ना.

**शशिकांत भोईरः-**

हो, फाटक जवळच बोलतो.

**दिपक खांबितः-**

त्याच्यात फरक काय पडलेला आहे

**शशिकांत भोईरः-**

तुम्ही बघा,आता प्रत्यक्ष बघा.माझ्याजवळ फोटो आहे.कॅमेरातुन काढलेले माझ्याजवळ फोटो आहेत.पाहिजे असेल तर,मी तुम्हाला आणुन देतो.

**हॅरल बोर्जीसः-**

मा.महापौर मॅडम,सभेचे कामकाज संपवण्याच्या अगोदर मी एक मिनीट सभागृहाचा घेउ इच्छितो.आपली जर परवांनगी असेल तर द्या.

**मा.उपमहापौर साोः-**

सन्मा.सदस्य शशिकांत भोईर साहेब,आपण अधिकाऱ्यांना जो प्रस्ताव दिलेला आहे.ह्या विषयावर अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करावी.कारण,त्यांच्या निदर्षणास पुर्ण बाब आलेली नाही.आणि सन्मा.सदस्यांकडुन आपल्याला काही पर्याय होउ शकतो.या बाबत आपल्या स्वतःच्या............

**शशिकांत भोईरः-**

साहेब,याच्यापुर्वी मी प्रशासनाला पत्रव्यवहार केलेला आहे. अजुन मला पत्रव्यवहाराचे उत्तर मिळालेले नाही.

**मा. उपमहापौर साोः-**

आजच्या सभेत आपण बोलल्यावर लगेच निर्णय होणार नाही.

**रोहिदास पाटीलः-**

निर्णय होणार नाही.अधिकारी तिकडे बसलेले आहे. त्यांच्या लेखात काय आलेले आहे ते तिकडेच बसुन आहे.

**मा. उपमहापौर साोः-**

सन्मा.सदस्य रोहित सुवर्णा साहेब, सकाळ पासुन हातात होर्डिंग घेउन बसलेले आहेत. एक करोड चाळीस लाख रुपयाची जी अग्रीम रक्कम आहे. त्याचे उत्तर मा. आयुक्त साहेबांना द्यायचे आहे. नाहीतर त्यांचा समज असा होईल की, माझा प्रश्न जाणीव पुर्वक टाळला.

**शरद पाटील:-**

मा. उपमहापौर साहेब, ठिक आहे.त्यांचे उत्तर देउ दे.पण,आपण ह्याच्यावर लक्षवेधी ठेवली होती. त्याच्यावर तुम्ही काहीच विचार केला नाही. या कर्ल्वटच्या विषयासाठी आपण लक्षवेधी ठेवली होती. तर, त्याच्यावर काहीच विचार केला नाही.

**हॅरल बोर्जीस:-**

मा. महापौर मॅडम, सभेची सांगता व्हायच्या अगोदर आजची मा.महासभा दुपारी लावण्यात आली. प्रशासनावरती पुर्ण सभेमध्ये आरोप-प्रत्यारोप बऱ्याचश्या गोष्टींचे खंडन प्रशासनाला करावा लागला. तरीसुध्दा प्रशासनाच्या वतीने आणि संपुर्ण सभागृहाच्यावतीने मा.आयुक्त साहेबांना एका गोष्टीसाठी धन्यवाद व्यक्त करतो. सन २००७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या आरक्षणाचा जो कार्यक्रम होता. तो आरक्षणाचा कार्यक्रम अतिशय चांगल्या पध्दतीने आपल्या महानगरपालिकेच्या नगरभवन या कार्यालयामध्ये पार पडला. सन्मा. आयुक्त साहेबांनी त्यांची भुमिका अतिशय पारदर्शक रित्या पार पाडली.तर, सभागृहाच्यावतीने मी मा.आयुक्त साहेबांना त्याबाबतीमध्ये धन्यवाद अदा करतो. आणि येणाऱ्या सार्वजनिक निवडणुकीमध्ये............

**रोहीदास पाटील:-**

सभागृह नेते हॅरल बोर्जीस साहेब, तुम्ही त्यांना असे सांगा तुमच्या विनंतीला ते मान ठेवतील.ह्याचा पुढे मा.महासभेचे गावाला लाईव्ह दाखवा आणि सांगा की.............

**हॅरल बोर्जीस:-**

आमची सगळ्यांची सदिच्छा पुर्वक भावना अशी आहे की, साहेबांच्या रिटायरमेन्ट पर्यंन्त साहेबांनी याच महापालीकेमध्ये त्यांचा उर्वरित कार्यकाल पुर्ण करावा.आणि त्यांच्या अधिपत्याखाली येणारी सार्वत्रिक निवडणुक पार पाडावी.अशी मी सभागृहाच्यावतीने त्यांना सदिच्छा अर्पण करतो.

**महेंद्रसिंग चव्हाण:-**

हमने प्रभाग समिती का जो बताया था,हमने भी रिकव्हेस्ट की थी ,की थोडासा काम बाकी है। अभीतक आपने ॲडोप्टमेन्ट नही किया। मॅडम प्रभाग के लीए जो सॅन्शन करनेका था उसकी रिकव्हेस्ट आपसे अंतीम बार कर रहे है। कृमया जल्दी करेगे तो जो फरवरी, मार्च, एप्रील मे हमलोग कमसे कम जनहित का कोईना काई काम कर सकते है। धन्यवाद.

**राहित सुवर्णा:-**

मा.महापौर मॅडम,१९९३ आणि १९९४ पासुन वेळोवेळी मिरा भाईदर तत्कालीन नगर परिषदेचे ऑडिटर.........

**हॅरल बोर्जीस:-**

मागे, मा.महापौर मॅडम यांनी मा.आयुक्त साहेबांना निर्देश दिलेले आहे.

**राहित सुवर्णा:-**

मा.महापौर मॅडम,१९९३ आणि १९९४ पासुन वेळोवेळी तत्कालीन नगरपालीकेचे मुख्य अधिकारी त्यावेळचे ऑडिटर आणि आताचे ऑडिटर देखील दरवर्षी ऑडिट रिपोर्टमध्यें याचा उल्लेख करतात. त्याच्या पुर्ण माहितीचा अधिकाराचा वापर करुन ठाणे माहितीचा अधिकारी जनमताचे समाजसेवक प्रमोद पाटील यांनी ही पुर्ण माहीती मिळवलेली आहे.आपल्याकडे एक मुख्य अधिकारी होते.डॉ.किशोर क्षीरसागर ते आज मुंबई महानगरपालीकेमध्ये आहेत.त्यांचे आपल्याला ५० हजार रु.द्यायचे बाकी आहे.इलेक्शनच्याकामासाठी रमेश म्हात्रे म्हणुन आहे ते आता रिटायर झालेले आहे. त्यांचे देखील ५० हजार रु.द्यायचे बाकी आहे.डॉ.बावस्कर जे आपल्याकडे प्रतिनियुक्तीवर होते. ते १ लाख ७५ हजार देणे बाकी आहे. सुमारे ११ असे अधिकारी आहेत. जे लोक आपल्याला अजुन हिशोब देत नाही.त्यांनी आपल्याकडुन ॲडव्हान्स घेतलेले आहे.मोठया प्रमाणामध्ये अमाउन्ट म्हणजे त्यापैकी संदिप शिंदे मी असा कुठलाही आरोप अधिकाऱ्यांवर करत नाही की,त्यांनी ते पैसे खाल्ले. पण त्यांनी हिशोब दिलेला नाही. ह्याचा अर्थ काय होतो? ॲम्बॅर्समेंट ऑफ फन्ड, मिसॲप्रोप्रिएशन ऑफ फन्ड हा एक कायदा आहे.यात लोकल फंड ऑडीट मध्ये तो ग्राह्य धरला जातो. मा.महापौर मॅडम,सॉलीट वेस्ट मॅनेजमेन्ट आणि पल्स पोलीओ आणि कुटूंब नियोजन फॅमेली प्लॅनींगासाठी सुमारे २७ लाख २१२९३ रु. चा हिशोब संदिप शिंदे आपल्याला अजुन हिशोब द्यायचे बाकी आहे. मिरा भाईदर महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यासाठी कामगार दिवस साजरा करण्यासाठी देखील १५ हजार रु. घेतले होते. त्याचे देखील हिशोब अजून दिलेला नाही. राष्ट्रीय ध्वज विकत घेण्यासाठी देखील ४०००/- रु. ॲडव्हान्स घेतलेला आहे. ते झेंडे आले की नाही हे देवाला माहित.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

मॅडम, यह आरोप रायटींग मे दे सकते है तो दिजिए।

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, मेरे पास है।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

है तो दिजिए ना।

**रोहित सुवर्णा :-**

मेरे पास नगरपालिकेका जवाब है। मा. महापौर मॅडम, माझ्याकडे उत्तर आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

सचिव साहेब, सभेची वेळ पूर्ण झाली.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझ्याकडे उत्तर आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

वह सही है। कार्यवाही चालू है।

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेब, आमच्याकडे पण महापालिकेने दिलेले उत्तर आहे.

**महेंद्रसिंग चौहाण :-**

हमारे पास भी है। लेटर भी है।

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा तुम्हाला उत्तर आम्ही देणार आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मला सभागृहात उत्तर पाहिजे. आणि प्रमोद पाटील यांना दिलेले उत्तर आहे. मग मा. आयुक्त साहेबांनी प्रत्येकावर रुलिंग का देत नाही. नाहीतर, तुम्ही त्यांच्या पगारातून कपात करावी. तुम्ही टॅक्स न भरला तर लोकांचे टी.व्ही. उचलतात.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर साहेबा, सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा ......

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह प्रोसेस चालू है। और १ कोटी ४० लाख वोट यह पब्लिक ने चुनके नही दिया। यह फ्लॉप नगरसेवक है।

**रोहिदास पाटील :-**

ऐसा नही बोलनेका।

**महेंद्रसिंग चौहाण :-**

यह क्या बात करते है? हमारे पास भी इस तरह का लेटर है।

**नगरसचिव :-**

सर्वांनी शांतता राखा. राष्ट्रगीतासाठी सर्वांनी जागेवर उभे रहायचे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा आपण शांत व्हा.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ७.०० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**